म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ५२३
REFBK-0000984

REFBK-0000984

ग्रं. सं. ठाणे
निबंध
५०३

…माला, पुष्प २

श्री.

# निवडक निबंध.

लेखक

भगवंत बळवंत पालेकर.

बडोदें.

किंमत आठ आणे.

## डॉ० धाकजी भानजी सावंत

## यांचा वनौषधी

# सार्सापरिला.

ह्या सेवन केल्यानें उपदंशजन्य व्रण, गंडमाळा, पिनस त्वचेचे रोग इत्यादि विकार थोड्याच दिवसांत बरे होऊन कांति, स्मरणशक्ति व बुद्धि वाढते, रक्तशुद्धि होते व शरीर पुष्ट व निरोगी होतें ह्याची एक बाटली सेवन केल्यानें गुण त्वरित नजरेस येतो किंमत प्रत्येक बाटलीस फक्त रु० १८४, ट. ख. ८४

डॉ० धाकजी भानजी सावंत,

फणसवाडी, कोळ्याची चाळ—मुंबई.

श्री.

[library stamp]

मराठा समाजाच्या शिक्षणासंबंधीं व इतर
विविध विषयांवरील

# निवडक निबंध.

लेखक—भगवंत बळवंत पाळेकर,
प्यालेसरोड—बडोदें.

प्रकाशक—मेसर्स साळवी, सावंत, कालेकर आणि मंडळी,
प्रोप्रायटर्स मराठा मासिक, हुसेनी बिल्डिंग, मुंबई नं. ११.

हें पुस्तक रा. रा. छोटालाल लालभाई पटेल यांनीं बडोदें भाऊ काळे यांची गल्ली
येथें 'लक्ष्मीविलास' छापखान्यांत ता. १६-१२-१४ रोजीं
प्रकाशकाकरिता छापिलें.

सन १९१४.

किंमत आठ आणे.


सर्व हक्क पुस्तककर्त्यानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

हें पुस्तक मिळण्याचीं ठिकाणें:—

भगवंत बळवंत पाळेकर,
प्यालेस रोड--बडोदें.

संपादक मराठा ऑफिस,
हुसेनी बिल्डिंग—मुंबई नं० ११

मराठा ज्ञातीचे पुढारी व कर्त्यांतले कर्ते पुरुष



कै० श्री० रुद्राजीराव राजे महाडीक.

[ मृत्यु ता० २० मे १९१४. ]

श्री.

# मराठा समाजाच्या शिक्षणासंबंधीं व इतर विविध विषयांवरील निवडक निबंध.

## १.—मराठे लोकांतील शिक्षणविषयक जागृति.

[ मराठामित्र-ऑक्टोबर, १९१०. ]

" नीचैर्गच्छत्युपरी च दशा चक्रणेमिक्रमेण " ह्या न्यायानें म्हणा, किंवा पाश्चात्य शिक्षण, सुधारलेल्या व प्रगतिपर लोकांशीं होणारा रात्रंदिवस संबंध, इतर समाजांतील जागृति, जीवनकलहाची वाढती तीव्रता, इत्यादि अनेक कारणांमुळें म्हणा, आमच्या मराठे लोकांत शिक्षणविषयक जागृति उत्पन्न झाली आहे, ही गोष्ट निर्विवाद सिद्ध आहे. या प्रशंसनीय जागृतीमुळें मराठे लोकांच्या परिस्थितींत स्थित्यंतर होत आहे, व सर्व समाजावर त्या प्रगतीच्या लाटा थोड्या-बहुत वेगानें आदळत आहेत. मराठे लोकांची निद्रितावस्था उत्तरोत्तर लय पावत असून, जागृतीच्या प्रभातकालाचीं स्पष्ट चिन्हें दृग्गोचर होत आहेत. व त्यामुळें जनतेचें आलस्य, पुराणप्रियता व चलनवलन करण्याविषयीं औदासीन्य, हे कालाच्या अतर्क्य प्रभावामुळें

मराठ्यांचा हाडींमांसीं खिळून गेलेले दुर्गुण नाहींसे होत चालले आहेत. एवंच, आत्मोन्नतीकरितां मराठे लोक प्रयत्न करीत आहेत, ही अत्यंत समाधानाची व आनंदाची गोष्ट होय. मराठे लोकांची नैसर्गिक पुराणप्रियता नाहींशी होत चालली असून, नवीन परिस्थितीशीं टक्कर देण्याची आवश्यकता त्यांस भासूं लागली आहे. आपलें राष्ट्रीय व ऐतिहासिक अस्तित्व कायम राखून, आधुनिक काळांतील नव्या परिस्थितीनुसार वर्तन ठेवणें हें हल्लींच्या खडतर जीवनकलहाच्या काळांत अत्यंत आवश्यक झालें आहे. या तत्त्वांचा प्रकाश मराठे लोकांच्या मनोभूमीवर पडत चालला आहे, ही अभिनंदनीय गोष्ट होय. पाश्चात्य शिक्षण, पाश्चात्य अधिभौतिकशास्त्र व पाश्चात्य विचारप्रवृत्ति, यांचा हिंदुस्थानच्या लोकांत झपाट्यानें प्रसार होत असून, त्यांचा मराठे लोकांच्या भावी आयुःक्रमावर प्रबल असा इष्ट परिणाम होत आहे, हें आम्हीं वर सांगितलें आहेच. आमच्यांतल्या या जागृतीचें दृश्य फळ **मराठा-शिक्षण-परिषद्** होय. ह्या परिषदेच्या द्वारें आपल्या ज्ञातींत शिक्षणप्रसार करण्याकरितां मराठे पुढाऱ्याचे प्रयत्न चालू आहेत. मराठ्यांची ही शिक्षणविषयक जागृती म्हणजे राष्ट्राच्या सार्वत्रिक जागृतीचेंच चिन्ह होय, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. अज्ञान व सुधारणाविरोध यांचे दिवस आतां गेले असून, नवजीवनकल्पना आमच्यांत रूढ होत चालली आहे. या कल्पनेमुळें नवीन अडचणी उत्पन्न होतील; व या अडचणींस तोंड देण्याकरितां **शिक्षण व समाजसुधारणा** यांची अत्यंत जरूर

आहे. मराठे लोक हे शिपाईगडी आहेत. दारिद्र्य, उपासमार व दुःखें ह्या चांगल्या शिपायांस स्वकर्तव्य शिकविण्याच्या शाळा आहेत, असें नेपोलियन नेहेमीं म्हणत असे. परंतु, पूर्वींचे धामधुमींचे दिवस आतां गेले असून, मराठ्यांनीं आपल्या ह्या बहुमोल गुणांचा–शिक्षणसंपादन करून–राष्ट्रीय आयुःक्रमाकडे उपयोग करणें इष्ट व अवश्य आहे. ब्रिटिश सरकारच्या अमदानींत आत्मसुधारणा व आत्मोन्नति करण्याच्या कांहीं दिशा सर्व लोकांस–तशा मराठे लोकांसही–खुल्या झाल्या आहेत, व त्या दिशेनें मराठ्यांना प्रयत्न करतां येऊन, स्वप्रयत्नानें व सार्वभौम सरकारच्या आणि मराठे संस्थानिकांच्या सहानुभूतीनें आणि प्रत्यक्ष मदतीनें विवक्षित मर्यादेपर्यंत त्यांस आपली उन्नति करून घेतां येईल. मराठ्यांच्या शिक्षणविषयक चळवळींना प्रोत्साहन देणें, त्यांच्या कार्याला मदत करणें, हें सरकारच्या अनेक कर्त्तव्यांपैकींचें एक प्रमुख कर्त्तव्य आहे. तें त्यांनीं अगदीं अवश्य केलेंच पाहिजे, आणि त्यांना केल्याशिवाय सुटका नाहीं. कां कीं, मराठे हे ऐतिहासिक परंपरेचे लोक असून, सरकारच्या लष्करामध्यें आजवर त्यांनीं महत्वाची कामगिरी बजाविली आहे. शिवाय, महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व शेती मराठे लोकांकडेच असल्यामुळें, जमीनमहसुलाच्या रूपानें त्यांचेकडून सरकारला दरसाल लाखों रुपयांचें उत्पन्न होत आहे. या सर्व गोष्टींचा शांतपणें विचार केला तर, मराठे लोकांना शिक्षणसंपन्न करणें म्हणजे राष्ट्राच्या संपत्तींत भर घालणें व पर्यायानें राष्ट्रोन्नतीला मदत करणें होय.

हिंदुस्थान पाश्चात्यराष्ट्रपंक्तींत बसण्यास लायक होण्यास ज्या अवश्य गोष्टी आहेत, त्यांत मागसलेल्या जातींत शिक्षणप्रसार होणें, या गोष्टीचा प्रामुख्यानें समावेश करण्यास हरकत नाहीं. मराठा समाज राष्ट्राचा एक प्रमुख घटक आहे व त्याच्यांत शिक्षणविषयक जागृति उत्पन्न झाल्यामुळें, क्षितिजावर अशासंचारक चिन्हें दिसूं लागलीं आहेत, हें देशाच्या भावी उदयाचें पूर्वचिन्ह होय.

कोणाचाही भविष्यकाळ पुष्कळ अंशीं त्याच्या गतकाळावर अवलंबून असतो. ज्या लोकांचा गतकाल वैभवदीप्तियुक्त आहे, त्यांना भविष्यकाळाविषयीं निराश होण्याचें मुळींच कारण नाहीं. शिवाय, ज्यांचा गतकाल वैभवयुक्त व तेजस्वी असतो, ते लोक आपली पुराणप्रियता सोडून नूतन परिस्थितीप्रमाणें वर्तन करण्याचे कामीं बरेच मागसलेले असतात, असा सर्वसाधारण नियम आहे. हा नियम अर्थात् मराठे लोकांसही लागू आहे. परंतु, हिंदुस्थानच्या पूर्वेतिहासांत ज्यांनीं अद्भुत पराक्रम केले, त्या मराठ्यांस आधुनिक काळाच्या इतिहासांतही आपणांस महत्त्वाची भूमिका स्वीकारावयाची आहे, असें आतां वाटूं लागलें आहे, व इतर प्रगमनशील समाजांबरोबर राष्ट्रोन्नतीचे कामीं प्रयत्न करण्याचें महत्व त्यांस भासूं लागलें आहे. या प्रयत्नांत कांहीं मतभेद होणें अपरिहार्य आहे. हा मतभेद म्हणजे प्रगतिमार्ग आक्रमण करणाऱ्या सैनिकांमधील प्रगमनशील शिपायांच्या स्वरूपासारखा आहे. तेव्हां, या दृष्टीनें विचार केला म्हणजे, हा मतभेद आमच्या जागृतीचें चिन्ह आहे—अतएव आमच्या

शिक्षणविषयक चळवळींच्या जिवंतपणाचें लक्षण आहे—असें म्हटल्याखेरीज राहवत नाहीं. बाकी केव्हांहीं झालें तरी, नदीच्या उगमाजवळ पाणी गढूळ असावयाचेंच. जों जों तिचें पात्र विस्तृत होत जातें, त्या मानानें पाणी स्वच्छ होऊन तें **निर्मल उदक** या नांवाला पात्र होतें. मराठ्यांचे शिक्षणविषयक प्रयत्न आरंभींचे असल्यामुळें, त्यांत कांहीं दोष असणें स्वाभाविक आहे. ते **शिक्षणप्रसारानें** नाहींसे होतील, अशी आमची पूर्ण खात्री आहे.

हिंदुस्थानांतील सर्व लोकांनीं एकदिलानें व परस्परसाहाय्यानें राष्ट्राच्या पुनरुज्जीवनाकरितां प्रयत्न करावेत, ही प्रत्येक राष्ट्रभक्ताची इच्छा असणारच. आणि या दृष्टीनें मराठे लोकांनीं आपल्या इतर देशबांधवांबरोबर राष्ट्राचे प्रगतीकरितां झटावें, हें योग्य आहे. परंतु, या वेळपर्यंत शिक्षणविषयक शर्यतींत मागसल्यामुळें, आजपर्यंत झालेलें नुकसान भरून काढण्याकरितां—प्रथमतः आपल्या उन्नतीकरितां—आपण स्वतंत्र प्रयत्न केले पाहिजेत, असें मराठ्यांना वाटत आहेसें दिसतें, व त्याप्रमाणें त्यांनीं केल्यास कांहीं हरकत नाहीं. कां कीं, विवक्षित मर्यादेपर्यंत मराठे लोकांची उन्नति झाली म्हणजे, ते राष्ट्रीय सभेच्या छावणींत आपोआप होऊनच येतील, यांत शंका नाहीं. मराठे लोकांइतके अधिक राजनिष्ठ लोक सांपडणार नाहींत. परंतु, ते जितके राजनिष्ठ आहेत, तितकेच स्वाभिमानी आहेत. मुसलमान बादशहांच्या अनेक स्वाऱ्या महाराष्ट्रावर झाल्या; परंतु, मराठे लोकांचें स्वत्त्व व राष्ट्रीयत्व यांस धोका न पोहोंचतां तीं

अद्यापपर्यंत कायम व आबाधित राहिलीं आहेत. अनेक स्थित्यंतरें होऊन गेलीं, राज्यांच्या अनेक उलथापालथी झाल्या, व मुसलमान बादशहांनीं आपल्या राजकारणविषयक कौशल्याची, मुत्सद्देगिरीची व सामर्थ्याची कमाल केली. इतकें झालें तरी, त्यामुळें मराठे लोकांच्या धर्मविषयक आणि जातिविषयक अस्तित्वास बाध न येतां, ते पूर्वी जसे होते, तसेच आतांही आहेत. हिंदुस्थानच्या थोर व पूज्य विभूतींचें माहेरघर जें महाराष्ट्र, त्यांतील लोकांत–मराठे लोकांत–शिक्षणविषयक जागृति तर झालीच आहे; व त्यांची योग्य प्रगति होऊन, राजकीय स्वातंत्र्याकरितां–ब्रिटिश छत्राखालीं स्वराज्य संपादन करण्याकरितां–कायदेशीर रीतीनें लढणाऱ्या प्रगमनशील पुढाऱ्यांबरोबर ते प्रयत्न करूं लागतील, तेव्हां, प्रागतिकपक्षाची शक्ति आतांपेक्षां पुष्कळ वृद्धिंगत होईल, यांत संशय नाहीं.

सध्यां आमच्यांतल्या साक्षरवर्गांत शिक्षणाबद्दलची आस्था आणि कळकळ उत्पन्न झाली आहे. या पुढचा मार्ग, साक्षरवर्गाला निरक्षरवर्गाविषयीं सहानुभूति वाटणें व त्याच्या उद्धाराकरितां प्रयत्न करणें हा आहे. आमच्या समाजांतील लहानमोठे, सुशिक्षित अशिक्षित, स्त्रीपुरुष, श्रेष्ठकनिष्ठ, वगैरे भागांत तादात्म्य पावणारे नामांकित ग्रंथकार, कवि, वक्ते, वर्तमानपत्रकार व त्यांची चहा करणारा गुणज्ञ वाचकवर्ग अद्याप निर्माण व्हावयाचा आहे. बहुजनसमाजाच्या मानसिक उद्धाराचा प्रश्न अद्याप आमच्या क्षितिजावर चांगलासा उदय पावला नाहीं, हीही गोष्ट खरी आहे; तथापि, ज्या विश्वंभरानें

आमच्यांत **महाराज सयाजीराव गायकवाडां**सारखे विद्वन्मान्य महापुरुष निर्माण केले, त्याच्याच प्रेरणेनें आमच्यांत ही शिक्षणविषयक जागृति झाली आहे. या जागृतीला कोणत्या प्रकारचें वळण लावून समाज विद्यासंपन्न केला पाहिजे, हें उमरावती येथें भरलेल्या परिषदेकरितां लिहिलेल्या निबंधांत थोडक्यांत स्पष्ट सांगितलेंच आहे. सहाशें वर्षांपूर्वीं पंढरपूरच्या वारकरी युनिव्हर्सिटींतून निघालेल्या नामदेव, तुकारामादि साधुसंतांनीं मागसलेल्या जातींनां शिक्षण द्यावें कीं नाहीं, स्पर्शास्पर्शाचा दोष मानावा कीं नाहीं, स्त्रियांना शिक्षण द्यावें कीं नाहीं, यासंबंधानें ठराव पास केले नव्हते. बोलाप्रमाणें त्यांनीं प्रत्यक्ष कृति करून दाखविली होती. स्पष्ट बोलावयाचें म्हणजे केवळ परोपकारबुद्धीनें नव्हे तर, ज्या समाजांत आपण जन्म पावलों, त्याचें कर्ज आपल्या शिरावर आहे, तें फेडल्याखेरीज गत्यंतर नाहीं, ही दृढभावना मनांत धरून प्रत्येकानें सन्निध असलेल्या साधनसंपत्तीचा उपयोग आपल्या समाजांत शिक्षणप्रसार करण्याकडे केला पाहिजे. ह्या बाबतींत प्रत्येकाला झीज सोसून थोडेंबहुत करतां येण्यासारखें आहे. असें केलें तरच आमच्या शिक्षणविषयक चळवळीला दृश्य फळ येईल. चवथी **मराठा परिषद** येत्या डिसेंबरांत भरावयाची आहे. म्हणून, आमच्यांतला अज्ञजनसमाज सुशिक्षितांच्या शिक्षणविषयक चळवळींकडे कौतुकानें व आशापूर्ण दृष्टीनें पहात आहे. अशा वेळीं "शक्य असेल तें बोलणार व साध्य असेल तें करणार" या तत्त्वाप्रमाणें वागून आमच्यांतले समाजधुरीण या पुढें कांहीं प्रत्यक्ष कार्याला सुरुवात करील, अशी बळकट आशा आहे.

# २.—बडोद्यांतील मराठ्यांचें शिक्षण.

[ दीनबंधु, ता. १९-१०-१९०७. ]

मराठ्यांच्या साम्राज्याच्या काळीं मराठे वीरांनां जें शिक्षण मिळत होतें, त्यामध्यें आणि ब्रिटिश अमदानींत हल्लीं तरुण मराठ्यांना जें शिक्षण दिलें जात आहे त्यामध्यें, जमीनअस्मानाचें अंतर आहे, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. पूर्वींच्या काळीं तरुण मराठ्यांना घोड्यावर बसणें, दांडपट्टा खेळणें, तिरंदाजी करणें, भाला फेंकणें, तरवार, पट्टा, इत्यादि हत्यारें सफाईनें चालविणें, वगैरे प्रकारचें त्या कालास अनुरूप, अशाच प्रकारचें शिक्षण दिलें जात होतें आणि या शिक्षणांत मराठा तरुण प्रवीण झाला, म्हणजे, तो राष्ट्रकार्याकरितां उपयोगीं पडत असे व त्यांतच आपल्या जन्माचें सार्थक्य मानित असे. चार महिने शेती केल्यानंतर देशावरील व घांटावरील मराठे, कोंकणांतील मावळे, विजयादशमीच्या शुभ मुहुर्तानें, श्रीशिवाजीमहाराजांच्या भगव्या झेंड्याखालीं येऊन उभे राहात होते; व स्वराज्य-संस्थापनेच्या कामीं स्वतःचें रक्त ओतीत होते; आणि म्हणूनच, त्यावेळीं प्रत्येक मराठा, तरवार आणि नांगर यांची योग्यता सारखीच मानित असे. या गोष्टीस आज दोन अडीचशें वर्षें होऊन गेलीं. इतक्या अवधींत कालचक्राच्या फेऱ्यामुळें फारच मोठा फेरफार

झाला. मराठ्याच्या मर्दुमकीच्या शिक्षणाचाही लोप झाला! व तरवारीच्या जोरावर नशीब अजमावून पहाण्याचे दिवसही गेले!!

या देशांत ब्रिटिश सत्ता रूढ होण्यापूर्वी देशाची स्थिति विस्कळित अशी झालेली होती. ह्या स्थितींत लष्कर व युद्धविषयक बाबतींत मराठ्यांपुढें एक क्षेत्र उत्पन्न झालें होतें. व ह्यावेळीं विद्यार्जनाचें कार्य यांनीं बहुतेक सोडून दिलें होतें. मराठ्यांच्या बहुजनसमाजाचें हें अज्ञान व वैभवयुक्त गतकालाची स्मृति, ह्यांमुळें शिक्षण संपादण्याची त्यांची इच्छा थंड पडली. शौर्यकाळ लयास जाऊन ज्ञानयुग सुरू झालें. अशा स्थितींत या ज्ञानयुगांतून पार पडण्यास व एकाकाळीं आम्हीं अजरामर कृत्यें केलीं होतीं याची साक्ष जगास पटवून द्यावयाची असल्यास आणि चांगले नागरिक निपजण्यास मराठ्यांस प्राथमिक आणि उच्च प्रतीच्या शिक्षणाची आवश्यकता आहे. आधुनिक जीवनकलहांत, मराठे लोक योग्य रीतीनें केव्हां झगडावयास लागतील, याची कल्पना त्यांच्या सध्यांच्या शिक्षणविषयक परिस्थितींत करणें अशक्य आहे.

बडोदें येथील मराठा शिक्षणोत्तेजक संस्थेचा सन १९०६-०७ सालचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून बडोदें शहरासारख्या सुधारलेल्या व पहिल्या प्रतीच्या संस्थानामध्यें मराठ्यांच्या शिक्षणाप्रीत्यर्थ जितक्या मोठ्या प्रमाणावर प्रयत्न झाले पाहिजेत किंवा फंड जमला पाहिजे तितका झाला नाहीं, याबद्दल दिलगिरी वाटते. या संस्थेच्या चालकांचा मूळ उद्देश, बडोदें येथें मराठे विद्यार्थ्यांकरितां

एक भोजनवसतिगृह स्थापन करण्याचा होता; व त्याची सर्व योजना तयारही करण्यांत आली होती. बडोदें राज्यांतील प्रत्येक सरकारी नोकरीयात मराठ्यानें आपला एक महिन्याचा पगार एका वर्षांत हप्त्याहप्त्यानें पुरा करून द्यावा, व श्री. महाराजसाहेबांच्या मदतीनें हें कार्य तडीस न्यावें. परंतु आमच्या लोकांत शिक्षित– त्यांतून अशा संस्थेची ज्यांना जरूरी भासते अशा–लोकांची संख्या फारच कमी असल्याकारणानें, **मराठा शिक्षणोत्तेजक संस्थे**च्या चालकांस निदान एक लक्ष रुपयांचा फंड जमवितां आला नाहीं, यांत आश्चर्य कोणतें ? ह्याप्रसंगीं कर्तव्यदक्ष, दूरदर्शी आणि विद्याविभूषित लक्ष्मीपुत्रांच्या मदतीची त्यांस अपेक्षा आहे. सुमारें एक लाख रुपयांचा फंड, प्राथमिक व उच्चप्रतीच्या शिक्षणोत्तेजनार्थ ५० हजार रुपयांचा जमाव व भोजनवसतिगृहाकरितां लागणारी इमारत यांची बडोदें संस्थानास फारच आवश्यकता आहे.

हें कार्य एका दिवसांत होणार नाहीं. कित्येक सुशिक्षित तरुण मराठ्यांनीं ह्या कार्यार्थ आपलें तन-मन-धन अर्पण करून अविश्रांत परिश्रम केले पाहिजेत. त्यांना मोठमोठ्या अडचणी दूर कराव्या लागतील. मराठा समाजांतील अनेक प्रकारच्या कल्पना व गैरसमज त्यांना मोठ्या कौशल्यानें व सावधगिरीनें दूर करावे लागतील तेव्हांच वर निर्दिष्ट केलेली भोजनवसतिगृहाची इमारत चिरस्थायी होईल. अशा प्रकारच्या संस्थेच्या योगानें शिक्षणाच्या कार्याचे उत्तरोत्तर शुभदायक व हितकर परिणाम होतील, व त्यायोगें प्रत्येक मराठ्याच्या

घरांत शुभ्र व उज्वल अशा ज्ञानकिरणांचा प्रकाश पडेल. पौरस्त्य शिक्षणाची आवश्यकता मराठ्यांस आतां भासूं लागली आहे, आणि त्याचेंच प्रत्यक्ष प्रमाण **मराठा शिक्षणोत्तेजक संस्था** होय. तेव्हां अशा वेळीं आमचे मराठे बंधु ह्या संस्थेचे नुसते सभासद होतील, इतकेंच नव्हे तर, ते ह्या संस्थेस पुष्टि देऊन तिच्या संस्थापकांनीं चालविलेल्या प्रयत्नांस सर्व ठिकाणचे मराठे दुजोरा देतील, अशी मला आशा आहे. ह्या उपयुक्त संस्थेस आश्रय देण्याची आवश्यकता अद्याप पुष्कळ मराठ्यांस वाटूं लागलेली नाहीं. मराठ्यांची शिक्षणविषयक उन्नति करण्याचे कामीं या संस्थेकडून महत्त्वाची कामगिरी होणार आहे. बडोदें राज्यांत स्थापन झालेल्या ह्या एका संस्थेस महाराष्ट्रांतील सर्व मराठ्यांच्या गरजा भागविता येणार नाहीं. अर्थात् बडोदें, ग्वाल्हेर, धार, देवास व इतर मराठा संस्थानांतून निदान एक एक तरी भोजनवसतिगृह स्थापन करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. आणि अशा रीतीनें ठिकठिकाणीं स्थापन झालेल्या संस्थांत स्पर्धा उत्पन्न होणार नाहीं. ही स्पर्धेची कल्पना मनांतून अजिबात काढून टाकली पाहिजे. मराठा ज्ञातीचा प्रत्येक हितचिंतक, मग तो उत्तरेस अगर दक्षिणेस, पूर्वेस अगर पश्चिमेस कोठेंही राहणारा असो—अशी इच्छा करील कीं, सन्निध असलेल्या साधनसंपत्तीचा उपयोग अशाच पवित्र कार्याकडे करील. कार्य करण्याची वेळ जर केव्हां असेल, तर ती आतां आहे, नाहीं तर कधींच नाहीं.

उत्तरहिंदुस्थानांत नैनिताल येथें थोड्या दिवसांपूर्वी क्षात्रिय कॉन्फरन्स भरली होती. या कॉन्फरन्सतर्फे आग्रा येथें एक हायस्कूल चालू आहे. त्याच्या मदतीकरितां आवागडचे राजे बळसिंगबहादुर यांनीं ५ लाख रुपये दिले असून, कॉलेजफंडामध्यें १ लाख दहा हजार रुपये भरण्याचें त्यांनीं अभिवचन दिलें आहे. तसेंच, थोड्या दिवसांपूर्वी शिरसंगी ,येथील एका लिंगाईत देसायांनीं आपले पश्चात् स्वज्ञातिच्या मुलांच्या शिक्षणाकरितां ५० हजार रुपये वार्षिक उत्पन्नाची इस्टेट बक्षीस दिली. दत्तक घेऊन वंश चालविण्यापेक्षां, स्वतःची सर्व इस्टेट स्वज्ञातीकरितां अर्पण केल्याचें वरीलसारखें दुसरें उदाहरण क्वचित् सांपडेल. मराठे लोकांत श्रीमंत लोक नाहींत असें नाहीं; परंतु अशा सत्कार्यी संचित केलेल्या द्रव्याचा व्यय करण्याचें त्यांच्या मनांत येत नाहीं. अशी स्थिति सदोदित चालू राहिल्यास, आणि श्रीमंत मराठे पुढाऱ्यांनीं त्याकडे दुर्लक्ष केल्यास क्याप्टन नानासाहेब शिंदे यांनीं म्हटल्याप्रमाणें, मराठ्यांच्या पूर्वकालीन वैभवाच्या गोष्टी सांगणारांना पुढील पिढीचे लोक वेड्याच्या हॉस्पिटलमध्यें पाठविण्यास तयार होतील ! मराठ्यांच्या शिक्षणविषयक हितसंबंधांचें संवर्धन करण्याचे कामीं सर्व ठिकाणच्या समंजस मराठे बंधूंनीं अहर्निश प्रयत्न चालविल्यास, त्यांचा भविष्यकाल निःसंशय तेजस्वी व सभाग्य होईल. माझ्या या नम्र सूचनेचा विचार **मराठा शिक्षणोत्तेजक संस्थेचे** चालक, बडोद्यांतील व इतर मराठा संस्थानांतील श्रीमंत मराठे बंधु अवश्य करतीलच.

## ३.—विद्येंत मागसलेल्यांचें हित कसें होईल ?

[ दीनबंधु–ता. १०–११-१९०७. ]

नात्मानमवमन्येत । पूर्वाभिरसमृद्धिभिः ॥
आमृत्योःश्रियमन्विच्छेनेनां मन्येत दुर्लभाम् ॥१॥ –मनु.

**भावार्थ**—आजपर्यंत आपला उदयकाल आला नाहीं म्हणून उमेद खचूं देऊं नये. मरेपर्यंत आपला अभ्युदय करण्याची खटपट करावी, व तो दुर्लभ आहे, असें कधीं मानूं नये. ॥ १ ॥

विद्येंत मागसलेल्या जातींच्या कल्याणार्थ मोठमोठीं कामें करावयाचीं आहेत. त्यांस अनेक प्रकारचें साहित्य पाहिजे. त्यांत मुख्यतः लोकांत ज्ञानाचा प्रसार झाला पाहिजे, लोकांमधलीं दुर्व्यसनें नाहींतशीं होऊन, त्यांचीं मनें नीतिमार्गाकडे लागलीं पाहिजेत, उच्चनीच भेदभाव नष्ट झाला पाहिजे आणि दृढनिश्चय, धैर्य, स्वार्थ-त्याग इत्यादि सद्गुण, समाजांतील प्रत्येक व्यक्तीच्या आंगीं पूर्णपणें बाणले गेले पाहिजेत, असें मला वाटतें.

शिक्षणाच्या बाबतींत जनसमाज मागें पडला आहे त्याचीं कारणें कोणतीं, सामाजिक बाबतींत कोणकोणत्या सुधारणा करणें इष्ट आहे, आपल्या अवनतीचीं कारणें कोणतीं, तीं कारणें शोधून काढा-वयाचीं, त्या कारणांचें निवारण जेणेंकरून होईल असे उपाय शोधाव-

यांचे आणि त्यांस उन्नति प्राप्त होईल असे उपाय योजावयाचे, हें काम जसें अत्यंत आवश्य आणि अत्यंत पवित्र आहे, तसें अत्यंत गहनही आहे, यांत शंका नाहीं.

आणि हें कार्य जरी अत्यंत बिकट आहे, तरी, समाजांत शिक्षण-प्रसार करण्याच्या कामीं दिरंगाई करतां कामा नये. नेपोलियन बोना-पार्टीला कोणी एकानें विचारिलें कीं, "राष्ट्राची उन्नति कशानें होते ?" त्या थोर पुरुषानें उत्तर दिलें, "राष्ट्रांत चांगलीं आईबापें असल्यानें." हा नियम सर्व समाजांस लागू पडतो सर्व सुधारणेमध्यें धैर्यानें, एकनिष्ठेनें आणि सर्व प्रकारची हानि सोसून, स्वार्थत्याग करून, शिक्षणप्रसाराच्या कामीं मदत करावयास तयार, अशा माण-सांची फार आवश्यकता आहे. अशीं माणसें शिक्षणानें तयार होत असतात. म्हणून, तशी प्रजा तयार करणें, हें कोणत्याही समाजां-तल्या आईबापांच्या हातीं आहे. हें काम एका पिढीचें नाहीं. हें पिढ्यानुपिढ्या चाललें पाहिजे. तरी हें केल्याशिवाय सुटका नाहीं. मराठे लोकांस आपली शिक्षणविषयक कॉन्फरन्स भरविण्याची आवश्यकता भासूं लागली आहे, हें सुचिन्ह होय. या पवित्र कार्यास बनेल तितक्या लवकर सुरुवात झाली पाहिजे. पहिली बैठक मुंबईस भरावी असें बहुमत आहे, तेव्हां, अशा वेळीं स्थानिक "मराठा ऐक्येच्छु सभे"च्या प्रयत्नांची व मेहेनतीची विशेष जरुरी आहे, हें निराळें सांगावयास नकोच.

सुदैवानें आपला भाग्यसूर्य लवकर उदयास येईल, अशीं चिन्हें दिसत आहेत. तेव्हां, मराठे लोकांत जी जागृति होत आहे व होण्याचा संभव आहे, तिला, व्यक्तीव्यक्तीच्या उत्कर्षाची व साह्याची फार अपेक्षा आहे, हें उघड आहे. ज्या वेळीं समाजांतील सर्व पुढाऱ्यांचें एकचित्त होऊन, त्यांच्याकडून समाजोन्नतीचीं कार्यें केलीं जातात, तो वेळ समाजाच्या उन्नतीचा उदयकाळ होय. समाजाची उन्नति म्हणजे थोड्या मोठ्या मनुष्यांचे प्रयत्नानें होते असें नाहीं; परंतु ज्या वेळेस हजारों लहान लोक असा यत्न करितात, म्हणजे सर्व समाज आपल्या उन्नतीकरितां यत्न करूं लागतो, तेव्हांच त्याचा उत्कर्ष होतो.

आशा मोठी ठेवावी, आणि ती पूर्ण होण्याचा प्रयत्न करावा; आणि हा प्रकार जसा ज्ञानसंपादनांत साधतां येतो, तसा समाज-सुधारणेंतही साधतां येतो. हीं दोन्हीं अंगें बरोबर चालतात, तेव्हांच समाजाची उन्नति होते. रुसो–जपानी युद्धानंतर जपानसंबंधाच्या ज्या कांहीं अश्रुतपूर्व हकीकती इकडे प्रसिद्ध झाल्या, त्यावरून असें दिसतें कीं, शिक्षण आणि समाजसुधारणा केल्यामुळेंच जपानचा भाग्यसूर्य उदयास आलेला आज आपण पहात आहोंत. सृष्टिक्रम असा आहे कीं, घरांत केरकचरा जसा आपोआप सांचतो, तसे दुर्गुण किंवा वाईट प्रघात माणसांत आपोआप वाढतात. म्हणून ते काढून टाकण्यास प्रयत्न करावे लागतात. दुर्लक्षणांमुळें किंवा दुसऱ्या कांहीं कारणांमुळें न कळत जीं व्यंगें समाजांत

शिरलीं आहेत तीं काढून टाकावयाचीं, आणि त्यांच्या जागीं चांगले प्रघात घालावयाचे, हीच समाजसुधारणेची मुख्य दिशा आहे. कोणत्याही लोकांची उन्नति होण्यास, अगोदर त्यांची सामाजिक स्थिति सुधारली पाहिजे. विद्येंत मागासलेल्या ज्ञातींत प्रथम पुढील बाबतींत इष्ट सुधारणा झाली पाहिजेः—

(१) मुलांच्या शिक्षणाकरितां आणि पोरकीं मुलें संभाळण्याकरितां फंड उभारणें.

(२) लग्नांचे आणि दिवसवाऱ्यांचे खर्च कमी करणें.

(३) मद्यादिकांच्या प्राशनाचा निषेध आणि त्याग वाढविणें.

(४) मागसलेल्या सर्व मंडळींत ऐक्य व प्रेम वाढविणें.

इत्यादि बाबतींचा मागसलेल्या समाजांच्या उन्नतीविषयीं प्रयत्न करणाऱ्या संस्थांच्या चालकांनीं अवश्य विचार करावा. शिक्षण हें सर्व सुधारणांचें प्रधान अंग तर खरेंच; परंतु हल्लीं मराठा ज्ञातींत ठिकठिकाणीं जीं कांहीं थोडी शिक्षित–सुशिक्षित मंडळी आहे, त्यांनीं, वरील समाजहिताच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करतां कामा नये.

लग्नांच्या आणि दिवसवाऱ्यांच्या होणाऱ्या अवाढव्य खर्चांत काट-कसर झाल्यास, आपणांस शिक्षणाकरितां फंड वगैरे जमविण्यास बरीच मदत होईल. नाशिक जिल्ह्यांत कांहीं ठिकाणीं दिवसवाऱ्यांप्रीत्यर्थ बराच खर्च करण्याची चाल आहे. ह्या चालीमुळें गरीब कुटुंबांचें अतिशय नुकसान होत असतें. तेव्हां ही अनिष्ट चाल काढून टाकण्यासाठीं प्रयत्न झाले पाहिजेत. वऱ्हाड प्रांतांत कांहीं ठिकाणीं वरील खर्चांत काटकसर

करून त्याचा विनियोग शिक्षणप्रसाराकडे करण्यांत येत असतो. मद्यप्राशनाचा प्रसार मराठे व इतर लोकांत बराच झाला आहे, व तो त्यांच्या नाशास कारण होत आहे. ज्या वेळेपासून मराठ्यांतील ऐक्य नष्ट झालें, तेव्हांपासूनच त्यांस उतरती कळा लागली, असें इतिहास सांगतो, आणि आज प्रत्यहीं तेंच पाहाण्यांत येत आहे. यासंबंधानें मिल्लसाहेब म्हणतात:—" हल्लीं ज्या समाजव्यवस्थेंत आपण नांदतों, तिच्यांतील व्यक्ति व आपण एकच आहों असें समजून त्यांच्या सुखदुःखाचे पूर्ण वांटेकरी व्हावें, अशी मनुष्य-स्वभावाची वृत्ति होत नाहीं, म्हणून, मनुष्यांचे परस्पर वर्तनांत विरोध दृष्टीस पडतो. " हें अगदीं खरें आहे. परंतु शिक्षणानें आपण व आपले बांधव हे एकच आहों, ह्या भावनेचें बीजारोपण होण्यास बरेंच साह्य होईल; व हाच मतलब धरून आपणांस ' शिक्षणविषयक कॉन्फरन्स ' स्थापन केली पाहिजे. आशा हें तर मनुष्यमात्राचें जीवन आहे. त्या आशेवरच सर्व मदार ठेवून हल्लीं आपण जर योग्य दिशांनीं आपल्या उन्नतीच्या मार्गास लागलों, तर, कालांतरानें आपणांस उन्नतावस्था प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाहीं. बर्कनें म्हटल्याप्रमाणें, भविष्य कालाबद्दल अनावर आशा बाळगण्याला आपल्याला कांहीं हरकत नाहीं; आणि या आशेप्रमाणें मागसलेल्या समाजांस सुस्थिति प्राप्त व्हावी, अशी परमेश्वराची प्रार्थना करून, हा लांबलेला लेख संपवितों.

शिरलीं आहेत तीं काढून टाकावयाचीं, आणि त्यांच्या जागीं चांगले प्रघात घालावयाचे, हीच समाजसुधारणेची मुख्य दिशा आहे. कोणत्याही लोकांची उन्नति होण्यास, अगोदर त्यांची सामाजिक स्थिति सुधारली पाहिजे. विद्येंत मागासलेल्या ज्ञातींत प्रथम पुढील बाबतींत इष्ट सुधारणा झाली पाहिजे:—

(१) मुलांच्या शिक्षणाकरितां आणि पोरकीं मुलें संभाळण्याकरितां फंड उभारणें.

(२) लग्नांचे आणि दिवसवाऱ्यांचे खर्च कमी करणें.

(३) मद्यादिकांच्या प्राशनाचा निषेध आणि त्याग वाढविणें.

(४) मागसलेल्या सर्व मंडळींत ऐक्य व प्रेम वाढविणें.

इत्यादि बाबतींचा मागसलेल्या समाजांच्या उन्नतीविषयीं प्रयत्न करणाऱ्या संस्थांच्या चालकांनीं अवश्य विचार करावा. शिक्षण हें सर्व सुधारणांचें प्रधान अंग तर खरेंच; परंतु हल्लीं मराठा ज्ञातींत ठिकठिकाणीं जीं कांहीं थोडी शिक्षित—सुशिक्षित मंडळी आहे, त्यांनीं, वरील समाजहिताच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करतां कामा नये.

लग्नांच्या आणि दिवसवाऱ्यांच्या होणाऱ्या अवाढव्य खर्चांत काटकसर झाल्यास, आपणांस शिक्षणाकरितां फंड वगैरे जमविण्यास बरीच मदत होईल. नाशिक जिल्हांत कांहीं ठिकाणीं दिवसवाऱ्यांप्रीत्यर्थ बराच खर्च करण्याची चाल आहे. ह्या चालीमुळें गरीब कुटुंबांचें अतिशय नुकसान होत असतें. तेव्हां ही अनिष्ट चाल काढून टाकण्यासाठीं प्रयत्न झाले पाहिजेत. वऱ्हाड प्रांतांत कांहीं ठिकाणीं वरील खर्चांत काटकसर

करून त्याचा विनियोग शिक्षणप्रसाराकडे करण्यांत येत असतो. मद्यप्राशनाचा प्रसार मराठे व इतर लोकांत बराच झाला आहे, व तो त्यांच्या नाशास कारण होत आहे. ज्या वेळेपासून मराठ्यांतील ऐक्य नष्ट झालें, तेव्हांपासूनच त्यांस उतरती कळा लागली, असें इतिहास सांगतो, आणि आज प्रत्यहीं तेंच पाहाण्यांत येत आहे. यासंबंधानें मिल्लसाहेब म्हणतातः—" हल्लीं ज्या समाजव्यवस्थेंत आपण नांदतों, तिच्यांतील व्यक्ति व आपण एकच आहों असें समजून त्यांच्या सुखदुःखाचे पूर्ण वांटेकरी व्हावें, अशी मनुष्य-स्वभावाची वृत्ति होत नाहीं, म्हणून, मनुष्यांचे परस्पर वर्तनांत विरोध दृष्टीस पडतो." हें अगदीं खरें आहे. परंतु शिक्षणानें आपण व आपले बांधव हे एकच आहों, ह्या भावनेचें बीजारोपण होण्यास बरेंच साह्य होईल; व हाच मतलब धरून आपणांस ' शिक्षणविषयक कॉन्फरन्स ' स्थापन केली पाहिजे. आशा हें तर मनुष्यमात्राचें जीवन आहे. त्या आशेवरच सर्व मदार ठेवून हल्लीं आपण जर योग्य दिशांनीं आपल्या उन्नतीच्या मार्गास लागलों, तर, कालांतरानें आपणांस उन्नतावस्था प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाहीं. बर्कनें म्हटल्याप्रमाणें, भविष्य कालाबद्दल अनावर आशा बाळगण्याला आपल्याला कांहीं हरकत नाहीं; आणि या आशेप्रमाणें मागसलेल्या समाजांस सुस्थिति प्राप्त व्हावी, अशी परमेश्वराची प्रार्थना करून, हा लांबलेला लेख संपवितों.

## ४.—लेखक आणि उपदेशक.

[ दीनबंधु–ता. १९–१२–१९०८ ].

स्वतःच्या मनांतील विचार इतरांस समजावून देण्याकरितां मनुष्यास दोन प्रकारच्या साधनांचा उपयोग करतां येतो. लेख आणि वक्तृत्व. लेखांचा उपयोग ज्या लोकांस लिहितां वाचतां येतें, त्यांसच होण्यासारखा असतो. परंतु वक्तृत्वाचा सर्वसाधारण लोकांस सारखाच उपयोग होतो. या जगामध्यें जितकें वक्तृत्वाच्या योगानें कार्य होतें, तितकें लेखांच्या योगानें होत नाहीं; आणि म्हणूनच वक्तृत्वकला हितकारक आहे. ज्यांस चांगले लेख लिहितां येतात, ते उत्तम लेखक म्हणून प्रसिद्धीस येतात, आणि म्हणूनच असले लेखक माननीय होत. हल्लीं मुद्रणकलेंत उत्तम सुधारणा झाल्या-कारणानें उत्तम लेखकांचे लेख पोष्टखात्याच्या सोयीमुळें देशांतरास जातात, आणि शिकलेले लोक, विद्वान् लोकांच्या लेखांचा सदुपयोग करून घेतात. लेखक बनणें आणि उत्तम वक्ता होणें, ह्या दोन्ही कला परस्पर भिन्न आहेत. आणि विशेषेंकरून असें दृष्टीस पडतें कीं, उत्तम लेखक असतात ते उत्तम वक्ते नसतात आणि जे वक्ते म्हणून नांवाजलेले असतात, ते चांगले लेखक नसतात. ह्या दोन्ही कला ज्यांस उत्कृष्ट रीतीनें साध्य होतात, ते भाग्यवान् होत. खऱ्या वक्त्याच्या अंगीं दुसऱ्याचें मन आपल्याकडे ओढून घेण्याची शक्ति

पूर्णपणें वास करीत असते. एका प्राचीन कवीनें म्हटलें आहे कीं, वक्तृत्वकला ही सर्व जगाची राज्यकर्ती होय. सर्व जगाचा इतिहास पाहिला असतां, त्यांत देखील ह्या शक्तीचेंच महत्व दिसून येतें. तेव्हां जगाचा इतिहास म्हणजे वक्तृत्वकलेवर झालेलें एक भाष्य आहे, असें म्हटलें असतां चालेल. हजारों लोकांचा रक्तपात होण्याचे पुष्कळ प्रसंग उत्तम वक्त्यांच्या वक्तृत्वानें आणि लेखकांच्या लेखांनीं टळले आहेत. नेपल्स आणि बलगेरिया येथील कैद्यांची दुःस्थिति सुधारण्याचें अघटित कार्य ग्लाडस्टन साहेबांनीं आपल्या वक्तृत्वानें आणि लेखांनींच केलें. रावणाच्या सभेंत जाऊन अंगदानें जी शिष्टाई केली, तिचें वर्णन रामायणांत आहे. तसेंच श्रीकृष्णानें दुर्योधनाच्या सभेंत जाऊन पांडवांच्या तर्फेनें जो उपदेश त्या गर्विष्ठ राजास केला, तो महाभारतांत वर्णिला आहे.

आज हे विचार सुचण्याचें कारण, मराठे लोकांत शिक्षणप्रसारासंबंधानें उडालेली चळवळ होय. समाजशक्ति उत्पन्न होण्यास वक्तृत्वशक्तीची बरीच मदत होणार आहे. आणि या दिशेनें विचार करतां—मराठे लोकांत शिक्षणाचा प्रसार करण्याकरितां—मराठ्यांची वस्ती आहे अशा प्रत्येक लहानमोठ्या शहरांतून व खेड्यापाड्यांतून हिंडून लोकजागृति करण्याकरितां मराठा—परिषदेच्या विद्यमानें उत्तम उपदेशकांची योजना झाली पाहिजे. ते तयार करण्याकरितां फंडाची आवश्यकता आहे. उपदेशकांची आवश्यकता ज्यांना वाटत आहे, अशा सर्व लोकांनीं या कामीं मदत

करणें अवश्य आहे. रा. बिर्जे यांनीं कांहीं दिवसांपूर्वीं एक उपदेशक फंड स्थापन केला होता. परंतु योग्य मदतीच्या अभावीं तो नामशेष झाला, ही कमी खेदाची गोष्ट नव्हे. आणखी, वक्तृत्वोत्तेजक समारंभ करून उत्तम वक्त्यांना बक्षिसें वाटावीत, त्यांना धन्यवाद द्यावा, आणि त्यांस द्रव्यसाहाय्य द्यावें. लहानमोठ्या खेड्यांपाड्यांतून लोकांत शिक्षणविषयक जागृति उत्पन्न करण्याकरितां, फंड गोळा करण्याकरितां व मराठ्यांना आपल्या स्वत्त्वाची ओळख पटवून देण्याकरितां, अशा उपदेशकांची फार जरूरी आहे. गेल्यासालीं धारवाडास पहिल्या मराठा—परिषदेची प्राणप्रतिष्ठा झाली आहे, व तिच्याद्वारें आपल्या समाजांत शिक्षणाचा प्रसार कोणत्या उपायांनीं करावा, याबद्दल थोर पुढारी विचार करूं लागले आहेत. शिक्षणप्रसाराचा उद्देश सिद्धीस जावा, अशी जर परिषदेची खरोखरच इच्छा असेल—आणि आहे—तर तो उद्देश पार पाडण्याकरितां उपदेशकांची देखील फार जरूर आहे, हें निराळें सांगावयास नकोच. मराठे लोकांत जागृति उत्पन्न करून त्यांस त्यांच्या स्वत्त्वाची ओळख पटवून देण्याकरितां कै. प्रो. राजारामशास्त्री भागवत यांनीं सुमारें दीड वर्षापूर्वीं महाराष्ट्रांत फिरून यासंबंधांत स्तुत्य प्रयत्न चालविला होता. त्याचें योग्य अनुकरण आमच्या समाजांतील समंजस पुढारी करतील व मराठा—परिषदेच्या येत्या बैठकींत याबद्दल विचार होईल, अशी अशा आहे.

## ५.—मराठे लोकांत शिक्षणप्रसार होण्याकरितां काय केलें पाहिजे.

[ धारवाड येथें १९०७ सालीं भरलेल्या मराठा-परिषदेकरितां लिहिलेला निबंध. ]

विद्या हें पुरुषास रूप बरवें, कीं झांकलें द्रव्यही ।
विद्या भोगसुकीर्तिदायक पहा, ते मान्य मान्यासही ॥
विद्या बंधु असे विदेश गमनीं, विद्या महादेवता ।
विद्या पूज्य नृपास, हा नरपशू तीं वेगळा तत्वतां ॥१॥ वामन.

हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत दरवर्षी जैन, मुसलमान, कायस्थ, उत्तर हिंदुस्थानांतील क्षत्रिय वगैरे लोकांच्या शिक्षणविषयक परिषदा भरत असतात. या देशांत जातिभेदाचें तत्त्व प्राचीनकाळापासून रूढ झालेलें असल्याकारणानें, निरनिराळ्या जातींच्या लोकांना आपली उन्नती करून घेण्याकरितां सामाजिक, धार्मिक, नैतिक, शिक्षणविषयक वगैरे बाबतींत पृथक् पृथक् प्रयत्न करावे लागतात. अशा स्थितींत अनुवंशिक संस्कारामुळें ह्मणा, किंवा द्रव्यबलानें ह्मणा, जी जात पुढें आलेली असते, तिच्यांत वर निर्दिष्ट केलेल्या सुधारणा होऊन त्या जातीची उन्नती होण्यास फार काळ लागत नाहीं. या देशांत ब्रिटिश सरकारचें राज्य रूढ होण्यापूर्वी, देशाच्या बहुतेक भागावर मराठ्यांची सत्ता स्थापित झालेली होती. परंतु लढाया आणि दंगेधोपे यांच्यामुळें लष्करी शिक्षणाच्या तालमीशिवाय आत्मिक उन्नतीस आवश्यक असें शिक्षण आह्मी प्राप्त करून घेतलें नाहीं.

परंतु हा काल लोटल्यास बरींच वर्षें झालीं. इंग्रज सरकारचें राज्य आमच्यावर स्थापित झालें. दंगेधोपे आणि अस्वस्थता नाहींशी झाली, व शांततेची वेळ प्राप्त झाली. सर्व जातींना व सर्व लोकांना आपापली उन्नती करून घेण्याचे मार्ग सुगम झाले. परंतु एक वेळ क्षत्रिय ह्मणून नांवाजलेल्या आणि दिल्ली-अटकेपर्यंत झेंडे फडकविणाऱ्या मराठ्यांत हल्लींच्या काळास अनुलक्षून आपली उन्नती करून घेण्याकरितां शिक्षण-परिषदेची स्थापना करून तिच्या द्वारें आपल्या समाजांत विद्येचा प्रसार करण्यासाठीं एकही मराठा पुढें आला नव्हता. परंतु मला फार आनंद वाटतो कीं, धारवाड येथील पुढाऱ्यांनीं **मराठा शिक्षणपरिषद** भरविण्याचें जबाबदारीचें व मोठ्या खर्चाचें शुभकार्य हातीं घेतलें, याबद्दल मी त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करितों व सच्चिदानंद परमेश्वर या त्यांच्या प्रयत्नास पूर्ण यश देवो, असें इच्छितों. ही परिषद दक्षिणेंतील व इतर प्रांतांतील तमाम मराठ्यांत शिक्षणविषयक जागृती उत्पन्न करण्यास साहाय्यभूत होईल, अशी मला आशा आहे. परिषदेचा मुख्य हेतू, विद्येंत मागसलेल्या अशा आमच्या मराठे लोकांत शिक्षणप्रसार कसा होईल, व तो होण्याकरितां काय केलें पाहिजे हा असून, यावर कोणी निबंध लिहून आणल्यास वाचण्यास परवानगी मिळेल ह्या सेक्रेटरी साहेबांच्या आश्वासनावरून, या बाबतींत माझ्या अल्पमतीस सुचलेले विचार आपणांपुढें मांडण्याची परवानगी घेतों.

ज्ञातिबंधूहो! शिक्षणाचें महत्व फार आहे, असें ज्ञाते लोक फार प्राचीनकाळापासून सांगत आले आहेत. मोठमोठ्या तत्वज्ञान्यांचीं शिक्षणासंबंधानें काय मतें आहेत तीं पहा:—

प्लेटो:—" मनुष्यांनीं संग्रहीं ठेवण्यासारखी जगांतील सर्वांत श्रेष्ठ वस्तू ह्मटली ह्मणजे विद्या होय."

मॉंटोन:—" सर्व वाईट गोष्टींचें बीज अज्ञान हें आहे."

फुलर:—" विद्यादानासारखें दुसरें दान नाहीं."

स्वित्सर्लंड देशांतील एका मुत्सद्यानें त्या देशांतील शिक्षण-पद्धतीचें वर्णन करितांना असें सांगितलें कीं, " आमच्या देशांतील बहुतेक मुलें दरिद्रावस्थेंत जन्मतात, पण त्यांनीं अज्ञानदशेंत राहूं नये, अशी आह्मी व्यवस्था ठेवितों."

मासिडोनियाचा राजा फिलीप, याच्या दरबारामध्यें आरिस्टा-टल ह्या नांवाचा एक महातत्त्ववेत्ता होता. त्याचे शिक्षणाखालीं आपल्या पुत्रास ठेवून सिंहासनारूढ होण्यास योग्य करावें असें त्याच्या मनांत येऊन, जगज्जेता शिकंदरबादशहा जन्मल्यावर थोड्याच दिवसांनीं त्यानें त्यास एक पत्र लिहिलें. त्यावरून प्राचीनकाळीं सुद्धां फिलिप राजासारखे राजे आपल्या मुलांच्या शिक्षणासंबंधानें किती काळजी बाळगीत होते, हें दिसून येईल. तें पत्र असें:—"मला पुत्र झाला हें आपणांस कळलेंच असेल. परमेश्वरानें मला पुत्र दिला त्याबद्दल मी त्याचे फार आभार मानितों, हें खरें आहे; परंतु आपण

जिवंत असतां हा पुत्र त्यानें मला दिला, हा त्याचा मजवर विशेष प्रसाद होय, आणि विशेषेंकरून ह्याबद्दल मी त्याचे फार फार आभार मानितों. तो माझा पुत्र आपला शिष्य ह्मणून जगामध्यें शोभावा, असा त्यास आपण ज्ञानप्रवीण कराल, ह्याविषयीं मला तिळभर देखील शंका नाहीं." हें पत्र वाचून कोणा सहृदय पित्यास आनंद वाटल्यावांचून रहाणार नाहीं! फिलीपसारखे राजे ह्मणजे ज्यांची संतती कशीही निपजली तरी तिला कशाचीही वाण पडण्याची भीति नसते, ते देखील आपल्या मुलांच्या विद्याभ्यासाविषयीं इतकी काळजी वाहतात, तर साधारण प्रतीच्या लोकांनीं ह्याविषयीं किती जपलें पाहिजे, ह्याचें अनुमान करितां येतें. ज्ञातिबंधुहो! ह्या बाबतींत आपण सर्वांनीं फिलिप राजाचें अनुकरण करावें. आणि ह्याच हेतूनें हें उदाहरण येथें नमूद केलें आहे. ह्यावरून आधुनिक जीवन-कलहांतून पार पडण्यास आपणांस सध्यांच्या काळीं शिक्षणाशिवाय अन्य मार्ग नाहीं, हें आपल्या लक्षांत येईलच.

महाराष्ट्रांत ५६ लक्षांवर मराठ्यांची वस्ती असून त्यांत सुमारें २० लक्षांवर शेतकरी लोकांची संख्या आहे. ही संख्या फार मोठी असून, या लोकांस विद्येचा गंधही नसल्या-कारणानें त्यांची फार शोचनीय स्थिती झाली आहे. अज्ञानामुळें शेतकरी लोक मारवाड्याच्या तावडींत सांपडतात; अज्ञानामुळें त्यांना शेतकीच्या कामांत सुधारणा करितां येत नाहीं; अज्ञानामुळें स्वच्छ हवा, स्वच्छ पाणी, वगैरे गोष्टींचें महत्त्व त्यांना समजत नाहीं.

सारांश, आपलें हित अगर अहित कशांत आहे, हें अज्ञानामुळें त्यांस कळत नाहीं; यामुळें आपल्या समाजाच्या आणि पर्यायानें देशाच्या उन्नतीस अडथळा येत आहे !

मीं असे पुष्कळ विद्यार्थी पाहिले आहेत कीं, बिचारे दहा वर्षें शाळेंत जाऊन मराठी अर्धें व इंग्रजी दोन तीन पुस्तकें शिकून बाहेर पडतात. त्यामुळें त्यांना धड मराठी येत नाहीं, व धड इंग्रजीही येत नाहीं. याचें कारण, त्यांचा बराच काळ फाजील शिक्षणांत जातो. अगोदर आपल्या लोकांची दरिद्रावस्था; त्यांतून कित्येक व्यसनाधीन झालेले, त्यामुळें त्यांना आपल्या मुलांच्या शिक्षणाची काळजी लागणार कशी ?

ही स्थिती सुधारण्याकरितां, पुणें येथील डेक्कन **असोसिएशन** या संस्थेसारख्या कांहीं संस्था व ठिकठिकाणीं बोर्डिंग स्कुलें स्थापन करण्याची फार आवश्यकता आहे. तसेंच आपल्या समाजांतील अफाट अज्ञजनसमूहाच्या मनांत सुशिक्षणाचें बीजारोपण करण्यास कळकळीचे उपदेशक तयार केले पाहिजेत. व ते तयार करण्याकरितां आपल्या ज्ञातींतील पंचांनीं (ज्या ठिकाणीं मराठे लोकांची वस्ती आहे, अशा मोठ्या शहरापासून तों तहत खेड्यापाड्यांतूनही पंचांची स्थापना केली पाहिजे; व त्या पंचांच्या बहुमतानें खेड्यापाड्यांतील गरीब लोकांच्या शिक्षणाची व्यवस्था झाली पाहिजे ) आपल्या धर्मफंडांतून ज्ञातींतील गरीब मुलांच्या शिक्षणाकडे खर्च केला पाहिजे.

अशा संस्था स्थापन करण्याकरितां, आणि त्यांचा खर्च भागविण्याकरितां, एक मोठा फंड उभारला पाहिजे. फंड जमविण्याकरितां पंजाबांत कित्येक ठिकाणीं चालू असलेली **मुष्टि-धान्य-पद्धती** सुरू करण्याचा प्रयत्न करावा. प्रत्येक कुटुंबानें रोज सकाळीं आपल्या घरीं मूठभर धान्य धर्मादाय ह्मणून एखाद्या मडक्यांत काढून ठेवावें. व तें आठ आठ दिवसांनीं शिक्षण संस्थांचे स्वयंसेवक-उपदेशक-येतील, त्यांस द्यावें अर्थात् हें समाजकार्य व धर्मकार्य आहे, हें विसरतां कामा नये. या पायावर पंजाबांतील दयानंद अँग्लो-वैदिक कॉलेज व हरिद्वार येथील गुरुकुलासारख्या उपयुक्त संस्थांची रचना झाली आहे. इतकें सांगितलें ह्मणजे या माझ्या नम्र सूचनेची उपयुक्तता आपल्या लक्षांत येईलच.

प्राथमिक शिक्षणाकरितां लोकांच्या वस्तीमध्यें शाळा स्थापन केल्या पाहिजेत. श्रीमान् लोकांनीं फी, पुस्तकें फुकट द्यावींत. मराठ्यांची वस्ती आहे, अशा दरेक लहान मोठ्या शहरीं व खेड्यापाड्यांत दर रविवारीं सभा भरवून, विद्येच्या उपयुक्ततेविषयीं व मद्यपाननिषेधाविषयीं उपदेश केला पाहिजे. उपदेशाच्या जागीं म्याजिकलँटर्नसारखे प्रयोग केले पाहिजेत, कीं ज्यांचे योगानें लोकांचें मनरंजन होऊन, त्यांना सभागृहीं येण्याविषयीं उत्कंठा वाटेल.

ज्ञाति बंधूहो ! येथपर्यंत माझ्या अल्प मतीस सुचलेले चार वेडेवांकडे शब्द साधकबाधक प्रमाणानें आपल्यापुढें मांडले. यांतून हंसक्षीर न्यायानें जें ग्रहण करण्यासारखें असेल त्याचा आदर होऊन

विचार होईल, अशी बळकट आशा आहे. आपल्या मराठा समाजांत विद्येचा प्रसार करण्याचें काम किती बिकट आहे, हें मी पूर्णपणें जाणून आहें शेवटीं धारवाडकर मराठे बंधूहो! आपणां सर्वांस माझी इतकीच नम्र विनंती आहे कीं, जो कार्यभार तुम्ही आपल्या शिरावर घेतला आहे, तो उत्तम रीतीनें पार पाडण्यास चुकूं नका. जहाज वादळांत सांपडलें असतां वारा आपणांस आटपत नाहीं, या सबबीवर तें आपणांस सोडून देतां येईल काय? तुमच्यामध्यें जेवढें चातुर्य आणि सामर्थ्य असेल तेवढें खर्चून ही समाजनौका सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करा. समाजांतील ज्या गोष्टींचा कांहीं उपयोग करितां येत नसेल, त्यांपासून दुष्परिणाम तरी होऊं नये, असा प्रयत्न करा. कारण समाजामध्यें नेहमीं निरनिराळ्या मतांचे लोक असावयाचेच. एकंदर लोक चांगले होतील असा दिवस केव्हां येईल तो येवो. सर्व मनुष्यें जसजशीं आपलें कर्त्तव्य करूं लागतील, तसतसा तो दिवस जवळ येईल.

जें जें आपणांस ठावें। तें तें हळूहळू शिकवावें ॥
शहाणे करून सोडावे। सकळ जन ॥ १ ॥

ह्या न्यायानें आपण सर्वांनीं तन-मन-धनें करून स्वोन्नतीप्रीत्यर्थ प्रयत्न केला असतां आपण केवढे सुखी होऊं, याची कोणास कल्पना तरी आहे काय? शेवटीं इतकेंच सांगणें आहे कीं, तुमच्या प्रयत्नास ईश्वर खात्रीनें यश येईल. विद्याप्रसार करणें हें पुण्याचें काम आहे; यांत पापाचा लेशही नाहीं, हें लक्षांत ठेवा. हें काम शेवटास नेण्यास ईश्वर आपणांस सद्बुद्धी देवो!

# ६—मराठा-परिषदेचें अंतिम साध्य व परिषदेच्या चळवळीची आवश्यकता.

[ उमरावती येथें १९०९ सालीं भरलेल्या मराठा-परिषदेकरितां लिहिलेला निबंध. ]

तिसऱ्या मराठा-परिषदेची बैठक ता. २७-२८-२९ सन १९०९ इ. रोजीं उमरावती येथें भरणार म्हणून अत्यंत समाधान वाटत आहे. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें मला परिषदेस प्रत्यक्ष हजर राहातां आलें नाहीं, याबद्दल अत्यंत वाईट वाटतें. तथापि, परिषदेसंबंधानें माझी पूर्ण सहानुभूति आहे. इतकेंच नव्हे तर, मराठे लोकांत शिक्षण-प्रसार करण्यासाठीं कोणते उपाय योजावेत, यासंबंधानें विचार करण्या-करितां उमरावती येथें जमलेल्या तमाम मान्यवंत मराठ्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करून, प्रस्तुत विषयाकडे वळतों.

मराठा-परिषदेची आवश्यकता आहे, ही गोष्ट आतां निर्विवाद सिद्ध झाली आहे. मात्र तिच्या द्वारें शिक्षणप्रसार करण्यासाठीं व परिषदेची चळवळ सतत चालू राहण्याकरितां कोणते उपाय योजावेत, इतकाच कायतो महत्त्वाचा प्रश्न आहे. वास्तविक पाहतां, वर्षाचे कांठीं दोन तीन दिवस एकत्र जमून शिक्षणावर व्याख्यानें दिल्यानें व ऊहापोह केल्यानें आपल्या ज्ञातीसारख्या अवाढव्य आणि अशिक्षित समाजांत शिक्षणप्रसार होणार नाहीं, हें कोणीही कबूल करील. त्याकरितां सतत वर्षभर चळवळ चालू राहिली पाहिजे. राष्ट्रीय सभेच्या

संबंधानें विचार केला असतां आपणांस असें आढळून येईल कीं, ही सभा ज्या प्रांतांत करावयाची असते, त्या प्रांतांतील लोक सतत वर्षभर जेव्हां परिषदेचें काम करितात, तेव्हांच त्या परिषदेची बैठक कोणत्याही प्रकारें अडचण न येतां पार पडते. आपल्या मराठा परिषदेसंबंधानें विचार केला, तर परिषद ज्या प्रांतात भरावयाची असते, तेथील लोक परिषदेबद्दल उदासीन असतात, स्थिति अत्यंत वाईट आहे.

प्रिय बंधु हो ! आपल्या मराठा परिषदेचें काम कांहीं राष्ट्रीय सभेसारखें अवघड नाहीं. आपणांत जहाल आणि नेमस्त असे पक्ष नाहींत. आपणांस हिंदुस्थानांतल्या सगळ्या जातींचीं मनें धरावयाचीं नाहींत. आपणांस राजकीय प्रकरणांत पडावयाचें नाहीं. आपल्या चळवळीचें सगळें क्षेत्र काय तें आपलें शिक्षणविषयक दैन्य दूर करण्यांत आहे. आपणांस कोणा परक्या लोकांचीं मनें वळवावयाचीं नाहींत. मराठा-परिषदेचें कार्य करण्यास आपण आपले पूर्ण मुखत्यार आहोंत. एखाद्या मोठ्या मंगलकार्याच्या संबंधानें कुटुंबांतील सगळ्या लहानमोठ्या माणसांनीं एकत्र बसून जसा विचार करावा, त्यासारखें आपल्या मराठा-परिषदेचें काम आहे. त्यांत वास्तविक पाहिलें असतां फूट पाडण्याचें मुळीं कारणच नाहीं. आपण विद्येच्या कामांत मागें पडलों आहोंत तें कां, हें विचारानें आणि वादविवादानें शोधून काढावयाचें, व त्याच्या निरसनार्थ उपाय योजावयाचे, हें मराठा-परिषदेचें

अंतिम साध्य आहे. यांत कठिण तें काय आहे ? आपल्या मंडळींत ज्ञानाचा प्रसार कमी असल्यामुळें, आपण मागसलों आहों. हें उणेंपण नाहींसें करण्याचा उत्तम उपाय ह्मटला ह्मणजे, आपल्या लोकांत ज्ञानाचा प्रसार करणें हाच आहे. एवढ्यांतच आपल्या मराठा-परिषदेच्या कर्त्तव्याचें सार आहे. ह्या स्वातंत्र्याच्या युगामध्यें ज्ञान-प्रसाराचे उपाय कांहीं झांकलेले नाहींत. पाश्चत्य शिक्षणप्रसारानें ते सर्वविश्रुत झालेले आहेत आणि आमच्यांतल्या सुशिक्षित आणि थोर पुढाऱ्यांस ते उपाय चांगले माहीत आहेत. इतर राष्ट्रांतले मागसलेले लोक कोणत्या उपायानें श्रेष्ठता पावले, हें त्यांना इतिहासावरून चांगलें कळलें आहे. शिवाय, त्यांस आमच्या समजाची अंतर्गत स्थिति चांगली माहित असल्याकारणानें, सांप्रत-काळीं कोणते उपाय कसे चालू करावेत, हेंही त्यांस कळत आहे. तें त्यांस इतरांस विचारावयास नको. सर्वांत अत्यंत मोठी सुदैवाची गोष्ट ही आहे कीं, आपणांस **मराठे** ह्मणविणारे व **मराठा** ह्या शब्दाचा अभिमान बाळगणारे असे चांगले ज्ञानी संस्थानिक आणि राजेरजवाडे आपणांमध्यें आहेत. त्यांजकडे द्रव्याचा तोटा नाहीं. त्याचप्रमाणें आपण मागसलों आहों, ते पुढें गेलों पाहिजे, हेंही ह्मणजे त्यांच्या अंतःकरणांत वागत नाहीं, असें नाहीं. इतक्या सर्व साधनांची अनुकूलता असून, आह्मी मागसलेले कां ? आमच्यांत शिक्षणप्रसार झपाट्यानें कां होऊं नये ? आमच्यांतील कोणत्या वैगुण्यामुळें आमचें शिक्षणाच्या कामांत पुढें पाऊल पडत नाहीं ?

आह्मी कर्तव्यपराङ्मुख कां बनत चाललों आहों ? ह्या सर्व प्रश्नांचें उत्तर एकच आहे. तें कोणतें ह्मणाल तर, आमच्यांत उद्योग नाहीं. आणि उद्योग नाहीं कां ? तर खरी कळकळ नाहीं ह्मणून !

येथपर्यंत केलेल्या विवेचनावरून मराठा-परिषदेची चळवळ सतत वर्षभर चालू ठेवणें किती अगत्याचें आहे, हें सर्वांच्या ध्यानांत येईल. सध्यांची राजवट हें कपिलाषष्ठीपेक्षांही दुर्लभ असें उत्तम पर्व आहे. एवंच, इंग्रज सरकारच्या राज्यांत जो शांततेचा लाभ मिळत आहे, त्याचा फायदा घेण्यास आमचे मराठेजन चुकतील, तर त्यांस अखेरपर्यंत पश्चात्ताप करावा लागेल. जगामध्यें आज आपल्याच समाजास शिक्षणप्रसारासंबंधाचा उद्योग करावयाचा आहे, असें नाहीं. दुसऱ्याही समाजांच्या मागें कमी अधिक प्रमाणानें ही उपाधि आहेच. उद्योगामुळें इतर जातींना सोळा आणे साधलें, तर आपणांस आठ आणे तरी साधावयास नको काय ? पण त्याकरितां दीर्घोद्योग केला पाहिजे, हें विसरतां कामा नये.

आपली मराठा परिषद सध्यां अगदीं बाल्यावस्थेंत आहे. ह्मणजे तिचा जन्म होऊन अदधीं तीन वर्षें झालीं आहेत. तेव्हां, तिचे तात्कालिक आणि आत्यंतिक परिणाम काय आहेत, व भविष्यांत होतील, हें आज कदाचित् अगदीं निश्चयात्मक सांगतां येणार नाहीं. तथापि तिच्या मूलतत्त्वांचा प्रसार करितांना पुढील बाबींचा विचार अवश्य झाला पाहिजे.

परिषदेच्या मूलतत्त्वांची माहिती अगदीं खेड्यापाड्यांतून अशिक्षित अशा शेतकरी वर्गापर्यंत कळवून, तिच्याविषयीं त्यांच्या हृदयांत, निःस्सीम भक्ति उत्पन्न केली पाहिजे. परिषदेची माहिती लोकांस देण्याकरितां प्रांतिक परिषदेची बैठक वर्षांतून निदान एक-दोंतरी भरवावी; व तिच्या शाखा–उपशाखा तालुक्यांतून व शक्य असल्यास खेड्यांतून स्थापन कराव्यात. या सभांतून होणाऱ्या काम-काजांचे रिपोर्ट मुख्य परिषदेपुढें मांडण्यांत यावेत. ज्या जिल्ह्यांत प्रांतिक परिषद् भरेल, तेथील पुढाऱ्यांनीं परिषदेचें धोरण, तिचीं उपयुक्तता, तिच्यापासून होणारे फायदे सामान्य लोकांना समजावून सांगावेत; मराठा ज्ञातींत सरदार जहागीरदार आहेत, वतनदार मिरासदार आहेत, पाटील गांवकर आहेत, सुभेदार सुभेदार मेजर आहेत, व कांहीं व्यापारीही आहेत. शिवाय आधुनिक शिक्षणाचा संस्कार ज्यांच्या मनावर झाला आहे, असेही कांहीं लोक आहेत. ह्या सर्वांनीं मनावर घेतलें, व फंड स्थापन केले, तर थोडक्या कालांतच आपल्यामध्यें सुशिक्षित लोकांची बरीच संख्या दिसूं लागेल. अनेक पदवीधर ज्ञातींत चमकूं लागतील, आणि अर्थात्च चक्रवाढ रीतीनें सुशिक्षितांच्या त्या संख्येंत सारखी भर पडत राहील. प्रत्येक लहान मोठ्या शहरांतून परिषदेच्या शाखा ( जिल्हामंडळें ) पसरल्या पाहिजेत. आणि त्या सर्व शाखा एका संघटनेनें बद्ध झाल्या पाहिजेत. आमच्यांतल्या तरुण व सुशिक्षित पदवीधरांनीं वर्षांतून कांहीं दिवस महाराष्ट्रांत प्रवास करून, लोकांस परिषदेची

आणि शिक्षणाची उपयुक्तता समजावून देण्याचा उपक्रम केल्यास, पुष्कळ कार्यभाग होणार आहे.

तात्पर्य काय कीं, आमच्या मराठामंडळानें स्वस्थ बसूं नये. ह्या आमच्या मराठामंडळाचें सामर्थ्य कांहीं लहान नाहीं. आमची लोकसंख्या पुष्कळ आहे. त्यांतल्या कितीएकांस सद्यःस्थिति चांगली कळून ती सुधारण्याचे मार्ग दिसले आहेत. ह्या मंडळामध्यें **श्री. महाराज सयाजीराव गायकवाड, कोल्हापुर सरकार, अलिजाबहादुर शिंदे सरकार** इत्यादि महाराजे आहेत. त्यांजपाशीं पैशाची कांहीं कमताई नाहीं. ह्या साधनांचा उपयोग करून घेण्यास आमच्यांत कांहीं खरे निर्लोभी, खरे स्वार्थत्यागी, आणि खरे स्वजनहितसाधक लोक पाहिजेत. तेही अगदीं मिळावयाचे नाहींत असें नाहीं. मिळतील; पण त्यांस वर सांगितलेल्या थोर पुरुषांनीं हातीं धरलें पाहिजे. त्यांस प्रथम द्रव्यसाहाय्य केलें पाहिजे. असें केलें तरच त्यांचीं कामें इतर लोकांच्या मनांत भरतील, ते त्यांचें यथाशक्ति अनुकरण करूं लागतील, आणि ही परंपरा वाढत जाऊन, त्यांच्या प्रयत्नांचा वृक्ष चांगला मोठा होऊन त्याला यथाकालीं अति उत्तम मधुर फळें येतील, यांत तिळमात्र संशय नाहीं. ह्याचें सगळें पुण्य आमच्या मुख्य पुढाऱ्यांस मिळेल. याच्या उलट असें आहे कीं, हेच आमचे पुढारी बाहुबलानें आणि ज्ञानानें समर्थ असतां असेच स्वस्थ राहिले, आणि त्यांनीं जर कांहीं हालचाल ह्या दिशेनें केली नाहीं, तर अर्थात् गरीब—म्हणजे अज्ञान आणि निर्धन—अशा आमच्यासारख्या माण-

त्यांच्या हातून काय होणार आहे ? आम्ही आहों तसेच मागसलेले राहूं-किंवा कदाचित् इतर समाज स्वोद्योगानें पुढें गेल्यामुळें आम्ही आहों त्यापेक्षांही अधिक मागसलेले होऊं-आणि ह्या सगळ्या अपयशाचें खापर, अर्थात् आमच्या सध्यांच्या पुढाऱ्यांवर फुटेल.

अर्थात् आम्ही चळवळ-उद्योग-करावयास पाहिजे, हें निराळें सांगावयास नको. आमच्या उन्नतीप्रीत्यर्थ आम्ही करावयाच्या उद्योगास कांहींतरी निराळें वळण लागलें पाहिजे. हें वळण कोणचें, ह्याचें दिग्दर्शन येथें थोडक्यांत केलें आहे. विषय इतका महत्त्वाचा, व्यापक आणि विस्तृत आहे कीं, त्यावर लिहावें तेवढें थोडेंच होणार आहे. तथापि, एका लेखाच्या मर्यादेंत संक्षेपानें जितकें लिहितां आलें तितकें येथें सांगितलें आहे; व त्यापासून आपणां सर्वांपुढें असलेल्या बिकट प्रश्नाचा उलगडा होण्यास जर कांहीं मदत झाली, तर माझ्या लेखाचें सार्थक झालें, असें मी समजेन.



## ७—डिसेंबरांतील महायात्रा.

( बडोद्याच्या परिषदेस अनुलक्षून लिहिलेला निबंध. )

[ **मराठामित्र**—नोव्हेंबर, १९१०. ]

पूर्वीच्या काळीं आमच्या देशांत आश्रमव्यवस्था होती. तींत तीर्थयात्रेचा एक नियम होता. पूर्वीं प्रवासाचीं साधनें हल्लींसारखीं शीघ्र व सुलभ नव्हतीं. हिंस्र पशूंचें व त्यांहूनही हिंस्र अशा ठग, पेंढारी व भिल्ल वगैरे लोकांचें भय, जीवितास व वित्तास असे, यामुळें महायात्रांस जाणें म्हणजे महत्कृत्य समजत, व याच कारणांमुळें काशीयात्रेहून परत आलेल्या मनुष्याच्या पायां पडण्याची चाल पडली असावी. प्रवासाच्या या दुःसाध्यपणामुळें, महायात्रा करण्याचा काल, गृहस्थाश्रमाच्या समाप्तीच्या वेळीं ठरविलेला होता. अनेक तऱ्हेचीं देवालयें, पवित्र स्थलें, नैसर्गिक सृष्टिसौंदर्य व रमणीय, राजधान्या पाहून मनास आनंद होई. अनेक शासनपद्धति, समाजरचना, देशाचार व व्यवहारभेद पाहून ज्ञानवृद्धि होत असे. आश्रमव्यवस्थेचा जसजसा लोप होत चालला, तसतसें महायात्रेचें महत्वही गौण होत चाललें व हल्लीं तर अशा महायात्रांच्या जागीं धर्माच्या नांवाखालीं अनेक प्रकारचे अत्याचार होऊं लागल्यामुळें, त्यांच्यावरील लोकांची श्रद्धाही कमी होत चालली आहे.

परंतु, पूर्वकालीन महायात्रेपासून होणारे फायदे बदललेल्या हल्लींच्या परिस्थितींत **मराठा-परिषदे**च्या महायात्रेपासून होत आहेत. प्रवासाच्या सुगम साधनांमुळें, **मराठा-परिषदे**ची महायात्रा दरसाल महाराष्ट्रांतील निरनिराळ्या ठिकाणीं करतां येते. ऐतिहासिक, पुराणप्रसिद्ध व अर्वाचीन अशीं अनेक शहरें पहावयास मिळतात. विविध अशा सृष्टिसौंदर्याचा व प्रेक्षणीय स्थळांचा दर्शनलाभ अनायासें घडतो. निरनिराळ्या प्रांतांतील मराठे लोकांत ब्रिटिश साम्राज्याच्या एकछत्रीपणामुळें उत्साह, धैर्य, कर्तृत्व, स्वाभिमान व ज्ञात्युन्नतीची कळकळ कितपत जागृत आहे, हें एकसमयावच्छेदें-करून पाहण्याची अपूर्व संधि प्राप्त होते. या तुलनेनें आमच्या समाजोन्नतीची उघड कल्पना मनास पटते. समाजांतील अग्रणी म्हणविणारे सुबुद्ध व चौकस लोक एकाच स्थळीं एकवटल्यामुळें, त्यांच्या दर्शनाचा लाभ मानसिक उन्नतीला साहाय्यभूत होतो. मोठ्या लोकांचे स्नेह संपादन करितां येतात, चिरपरिचित असे अनेक स्नेही व ओळखीचे लोक अनायासें भेटतात. ज्या ठिकाणीं ही महायात्रा दरसाल भरते, तेथील लोकांस तर विद्याभिरुचीचें वळण उत्तम प्रकारें बाणलें जातें. तेथील पुढारी लोकांच्या मनावर-दोन दिवस कां होईना-निरपेक्ष समाजकार्याची कल्पना उत्तम प्रकारें ठसते. हजारों प्रेक्षकांकरितां व शेंकडों डेलिगेटांकरितां राहण्यासाठीं, जेवणाखाण्यासाठीं जे आश्रांत श्रम करावे लागतात, जी झीज सोसावी लागते, जी याचना करावी लागते, जी निरलस कार्यक्षमता

दाखवावी लागते, हे सर्व गुण समाजहिताच्या खऱ्या कळकळी-शिवाय कधींही दृष्टीस पडावयाचे नाहींत. **मराठा–परिषद्** ज्या ठिकाणीं भरते, त्या ठिकाणचे पुढारी लोक या दोन दिवसांच्या प्रपंचाकरितां जे श्रम घेतात, जें ममत्व व स्वकुटुंबीय अगत्य दर्शवितात, जी तत्परता व कळकळ बाळगतात, तीवरून तरी **मराठा–परिषदेनें** जो आपलेपणा, जें स्वत्त्व, जो ऐक्यभाव उत्पन्न करून त्याचा परिपोष केला आहे, त्याची प्रचीति अंतर्यामीं पटते. याचा प्रत्यक्ष अनुभव ज्यांनीं मागील तीन महायात्रांचें पुण्य संपादन केलें, त्यांना अवश्य आला असलाच पाहिजे.

हें ह्या विषयाचें एक अंग झालें. ह्याच्या चांगुलपणाविषयीं आणि उपयोगीपणाविषयीं मुळींच वाद नाहीं. परंतु, ह्याच्या जोडीला दुसरें एक अंग आहे, तेंही तितकेंच महत्त्वाचें आहे. त्याची उपेक्षा सहसा करतां यावयाची नाहीं कां कीं, तें बहुतेक सर्व लहान-मोठ्या माणसांच्या हाडींमांसीं व्यवहारांत अगदीं खिळलेलें आहे. तें हें कीं, परिषदेकरितां कळकळ बाळगणारे लोक वर्षांतील थोडे-दिवस खेरीजकरून बहुतेक वेळ इतर व्यवसायांत गुंतलेले असतात. परिषदेकरितां वाहिलेले लोक बारा महिने तोच उद्योग करणारे असे मुळींच नाहींत, ही मोठी शोचनीय स्थिति आहे. मनुष्य हा स्वभावतःच स्वार्थपरायण आहे. परिषदेकरितां जाणारे लोक आपापल्या गांवीं असतांना पोटापाण्याच्या उद्योगांत बारा महिने गढलेले असतात. सरकारी नोकरींत, व्यापारांत, बारीकसारिक उलाढालींत,

जेणेंकरून आपला योगक्षेम उत्तम प्रकारें चालेल, अशा विवंचनेंत ते व्यग्र असतात; आणि त्यामुळें परिषदेंत पास झालेल्या उपयुक्त ठरावांची सबंध वर्षभरांतही अंमलबजावणी होत नाहीं. वर्तमान-पत्रांच्या वाचनानें स्वार्थाहून श्रेष्ठ अशा ज्ञात्युन्नतीच्या–पर्यायानें राष्ट्रीय उन्नतीच्या–विचारांची झुळूक त्यांच्या मनावरून जात असते, परंतु त्या झुळूकीनें कोणाचीही प्रत्यक्ष उद्योगाकडे प्रवृत्ति किंवा स्वार्थापासून यत्किंचित्‌ही निवृत्ति होत नाहीं. परिषदेच्या महायात्रेंत जेव्हां आपण एका ठिकाणीं गोळा होतों, तेव्हां, चार दिवस स्थानिक उलाढालींतून आपलें मन सर्वथैव निघून आपण या विषयाचा विचार करितों, व त्या वेळेला आपल्या अनास्थेबद्दल लाज वाटून समाजहिताकरितां आपण झटलें पाहिजे, कांहीं परिश्रम केले पाहिजेत, नुसत्या शाब्दिक बडबडीनें उद्दिष्ट हेतु साधारण नाहीं, अशी प्रचीति येऊन क्षणैक आत्मोन्नतीचा अनुभव मिळतो. परंतु या अनुभवाची प्रत्यभिज्ञा किंवा पुनर्ज्ञान होऊन तो अंगीं वळत नाहीं. अशी स्थिति आमच्या समाजांत आहे, इतर समाजांत नाहीं, असें मुळींच नाहीं. कमी अधिक प्रमाणानें ती सर्वत्र आहेच. ही अत्यंत शोचनीय गोष्ट होय !!

यंदाची **मराठा–परिषदेची** महायात्रा अपूर्व अशी होणार आहे. अपूर्व ह्मणण्याचें कारण इतकेंच कीं, ता. १६ डिसेंबर रोजीं आमचे भोजप्रति महाविद्याभिलाषी **महाराज सयाजीराव गायकवाड** हे विलायतेहून या देशांत येणार असल्याची बातमी प्रसिद्ध झाली

आहे. यंदाची महायात्रा त्यांच्याच राजधानींत भरणार असल्यामुळें, अर्थात् हा त्यांच्या घरचाच मंगलसमारंभ असल्यामुळें, तो ते प्रत्यक्ष हजर राहून साजरा करितील, अशी प्रत्येक मराठ्याची सदिच्छा असणारच. ती ईश्वरकृपेनें त्यांचेकडून पूर्ण केली जावो ! व तसें झाल्यास, बडोद्याच्या परिषदेच्या इतिहासांत ही एक आनंददायक गोष्ट नमूद होऊन राहील. दुसरें, देवासचे श्री. तुकोजीराव महाराज यांनीं यंदाच्या अधिवेशनाचीं सूत्रें स्वीकारण्याचें जर उदारपणें कबूल केलें, ( आणि तेच यंदाच्या परिषदेचे अध्यक्ष व्हावेत, अशी पुष्कळांची मनीषा आहे. ) तर मला वाटतें, बडोद्याच्या डिसेंबरांतील महायात्रेचें महत्त्व अनेक दृष्टींनीं विशेषच आहे. परिषदेच्या अध्यक्षाचा मान ज्यांना दोनदां मिळाला व मराठे लोकांच्या हितसंबंधाच्या निरनिराळ्या अनेक प्रश्नांविषयीं आस्थापूर्वक खटपट करणारे असे मे. खासेरावसाहेब जाधव, सार्वजनिक कामांत पुढाकार घेऊन आपल्या ज्ञानाचा लाभ जनांस देणारे व गेल्या परिषदेचे अध्यक्ष असलेले श्री. संपतराव गायकवाड, गरीब विद्यार्थ्यांच्या पोटापाण्याची सोय करून, त्यांना विद्यामृत पाजून, मराठा ज्ञातींतील शिक्षणप्रसाराला प्रत्यक्ष मदत करणारे श्री. नरसिंगराव राजे घोरपडे, मराठे लोकांविषयीं कळकळ बाळगणारे व त्यांच्या उन्नतीकरितां मनापासून झटणारे असे क्या माधवराव जाधव, मे. निंबाळकर, मे. यशवंतराव मोहिते. मेजर शिंदे, मे. यादवराव पवार यांसारख्या उत्साही, खटपटी, धोरणी, मुत्सद्दी आणि

हुशार अशा लोकनायकांनीं या परिषदेची तयारी केलेली असल्या-मुळें, यंदाची परिषद् सर्व दृष्टींनीं अत्यंत महत्त्वाची होईल, असा सर्व लोकांस भरंवसा वाटत आहे.

यंदाच्या परिषदेंत फार महत्त्वाच्या प्रश्नांचा वादविवाद होणार आहे. मुंबईच्या परिषदेनंतर उमरावती येथें जी नियमरचना कर-ण्यांत आली, तीसंबंधानें कांहीं लोकांनीं आक्षेप काढले आहेत. म्हणून **मराठा-परिषदे**च्या नियमबद्ध रचनेचा प्रश्न सहजच पुढें येईल; व त्यास यंदा तरी स्थैर्य प्राप्त होईल, अशी पुष्कळांना आशा वाटत आहे. मराठे संस्थानिकांनीं व सरकारांनीं मराठा ज्ञातींतील लोकांना मोफत शिक्षण द्यावें, अशा आशयाचा एक ठराव गेल्या परिषदेंत पास झाला होता. परंतु मला वाटतें, आतां यापुढें अशा प्रकारचे ठराव पास न करितां, परिषदेचा शिक्षणप्रसाराचा म्हणून निदान कमींत कमी पांचलक्ष रुपयांचा एक फंड स्थापन करून, त्याचा उपयोग प्राथमिक, दुय्यम प्रतीच्या, उच्च प्रतीच्या व औद्योगिक शिक्षणाकडे करण्यांत यावा. या फंडाची उभारणी करण्याकरितां वजनदार मराठे लोकांचें एक डेप्युटेशन मराठे संस्थानिकांकडे पाठ-विण्याबद्दल यंदाच्या परिषदेंत विचार होणें अवश्य आहे. गेल्या-वर्षाच्या बैठकींत तेराव्या ठरावानें अशा प्रकारचा फंड जमविण्या-करितां एक कमिटी नेमण्यांत आली होती. परंतु तिनें कांहीं विशेष कार्य केलें कीं काय, हें प्रस्तुत लेखकास माहीत नाहीं. आमच्यां-तल्या धनिकांनीं मनावर घेतलें, तर, इतका फंड जमणें मुळींच

अशक्य नाहीं, असेंच प्रत्येकास वाटेल. म्हणून, याबद्दलचा विचार परिषदेंत होणें जरूर आहे. व्हेटरनरी, ॲग्रिकल्चर, आर्ट्स्, मेडिसिन् वगैरे कॉलेजांत मराठे विद्यार्थ्यांकरितां मुंबई सरकाराकडून व मध्यप्रांताचे सरकाराकडून कांहीं स्कॉलरशिपा ठेवण्यांत आल्या, ही आनंददायक गोष्ट आहे. तथापि, सरकारानें उदारपणें दिलेल्या या सवलतीचा लाभ, आमच्यांतल्या किती विद्यार्थ्यांनीं आजवर घेतला त्याचीही माहिती यंदाच्या बैठकीपुढें मांडली पाहिजे इतकेंच नव्हे तर, परिषदेच्या द्वारें अशा विद्यार्थ्यांची सोय लागणें इष्ट आहे.

शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. लोकलफंडाची रक्कम शेतकऱ्यांकडूनच वसूल होत असते. परंतु तिचा लाभ शेतकऱ्यांच्या मुलांस फार थोडा होतो. तेव्हां लोकल-फंडाचा उपयोग, ज्यांच्याकडून तो गोळा करण्यांत येतो, त्यांच्यामध्यें प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्याकडे व्हावा अशी कळकळीची सूचना परिषदेकडून झाली असतां, सरकाराकडून तिचा विचार होईल, अशी माझी समजूत आहे शिवाय, लोकशिक्षण जें हल्लीं आहे असें प्रांतिक न करितां मुख्य सरकारचें खातें करावें. म्हणजे, लष्करीखात्याकडे किंवा रेलवेच्या वाढीकडे जसें लक्ष्य पुरविलें जातें, तसें शिक्षणखात्याकडेहीं लक्ष्य पुरविलें जाईल. सध्यां हें खातें प्रांतिक आहे; आणि प्रांतिक सरकारानें प्राथमिक शिक्षण, ज्यांचें उत्पन्न बेताचें आहे, अशा लोकलबोर्डांकडे सोंपविलें आहे. अशा व्यवस्थेनें शिक्षणाचा प्रसार होण्याचा संभव नाहीं. इंग्रजसरकारच्या राज्यांत साधारणपणें ज्यांचा

धंदा नाहींसा झाला आहे, व जे सांप्रत शेती करून आपला उदर-निर्वाह कसाबसा करीत आहेत, असे या बाजूला लढाऊ पेशाचे मराठे लोकच आहेत, व ते ब्रिटिश राज्याचे संरक्षक आहेत. तेव्हां, मुसलमानांना खास हक्क आणि सवलती देणारें सरकार, मराठ्यांच्या संबंधांत आपलें कर्त्तव्य करण्यास विसरेल, असें वाटत नाहीं. या बाबतींत **मराठा–परिषदेनें** जाहीरपणें, अधिकारयुक्त वाणीनें आणि सर्व मराठे लोकांच्या तर्फे, नेटानें प्रयत्न केले पाहिजेत. उपदेशकाचा प्रश्नही बरेच दिवस मागें पडला आहे. त्यासंबंधानें यंदाच्या बैठकींत प्रश्न निघून योग्य उपदेशकांची निवड होणें अगदीं अगत्याचें आहे.

एकंदरींत, यंदा बडोदरक्षेत्रीं भरणारा मराठे यात्रेकरूंचा मेळा बराच मोठा जमून, आमच्या शिक्षणविषयक दैन्याचा त्याचेकडून चांगला खल होईल, असा अंदाज करण्यास हरकत नाहीं.



# ८.—मराठे लोकांतील शिक्षणप्रसार आणि आमच्या पुढाऱ्यांचें कर्तव्य.

( वडोदें येथें १९१० सालीं भरलेल्या मराठा–परिषदेकरितां लिहिलेला निबंध. )

**मराठा-शिक्षण-परिषदे**च्या आजपर्यंत तीन बैठकी झाल्या. विश्वामित्री नदीच्या पुण्यतीरावर वसलेल्या आणि गुर्जराधिपतीची राजधानी ह्मणून नामाभिधान पावलेल्या व जगद्विख्यात असलेल्या वटोदरक्षेत्रीं यंदाचे सालीं **मराठा–परिषदे**ची ही चवथी बैठक भरत आहे. सालदरसाल कोणत्या तरी विवक्षित ठिकाणीं पदरचे पैसे खर्च करून, आमच्यांतले सुशिक्षित ह्मणविणारे लोक आमच्या शिक्षण-विषयक उन्नतीच्या विचाराकरितां एके ठिकाणीं जमतात; पुष्कळ पैसे खर्च होतात; आगगाड्यांची भरती होते; व पुष्कळ वाटाघाट होते. जें उच्चतम आणि परमपवित्र ध्येय साधण्याकरितां आम्ही इतका खटाटोप करितों, तें ध्येय, आह्मांस कितपत साध्य झालें आहे, उन्नतीचा पथ आम्ही किती आक्रमण केला आहे, याचा विचार करतांना किंचित् निराशा वाटल्याखेरीज राहात नाहीं. **मराठ्यांचें शिक्षण** हा प्रश्न सध्यांच्या आमच्या स्थितींत फार जिव्हाळ्याचा आणि अगत्याचा असल्यामुळें, सदरहु निबंधांत त्यासंबंधाच्या मुख्य मुख्य मुद्यांचा विचार करण्याचें योजिलें आहे. तरी, यंदाच्या परि-षदेंत या मुद्यांचा योग्य विचार होईल, अशी आशा आहे.

**सर्वारंभास्तंडुलाप्रस्थमूलाः** असें एक वचन आहे. त्याचें तात्पर्य इतकेंच कीं, कोणत्याही कार्याच्या सुरुवातीस आधीं पैसा पाहिजे. पैशाखेरीज कोणतीही गोष्ट साध्य होत नाहीं, हें निःसंशय खरें आहे. आज चार वर्षांत परिषदेचा शिक्षणप्रसाराचा ह्मणून कायमचा फंड मुळींच नाहीं. व तो नसल्यामुळें, आमचा शिक्षणाचा मार्ग मोठ्या अडचणीचा झाला आहे. तथापि, अडचणीच्या मंत्राची जपमाळ ओढीत आमच्यांतल्या पुढाऱ्यांनीं स्वस्थ बसणें, किंवा त्या दिशेनें कांहीं प्रयत्न न करणें, समाजहिताच्या व राष्ट्रहिताच्या दृष्टीनें न्याय्य होणार नाहीं. शिक्षणहीन समाज व विगतप्राण शरीर या दोहोंची किंमत सध्यांच्या काळीं सारखीच आहे. शिक्षणानें समाजांत जोंपर्यंत जिवंतपणा येणार नाहीं, तोंपर्यंत आमची कोणतीही प्रगतिमूलक चळवळ यशस्वी होणार नाहीं. सध्यांचे आमचे प्रगतिविषयक प्रयत्न, द्रव्याच्या अभावामुळें, वाळूच्या भुसभुशीत पायावर उभारलेल्या इमारतीप्रमाणें डळमळीत आहेत. या प्रयत्नांस स्थैर्य आणण्याचें व समाजाची जोराची प्रगति करण्याचें सामर्थ्य ज्या शिक्षणसंजीवनौषधींत आहे, त्या संजीवनौषधीचे घुटके समाजाला यथाशक्ति पाजण्याचें काम, अडचणींचें स्तोम माजवून दिरंगाईवर टाकणें योग्य होणार नाहीं.

मराठे लोकांत शिक्षणप्रसार झाला पाहिजे, ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. तेव्हां, या कार्याला लागणारा पैसा कोठून आणावा, हा एक प्रश्न आहे. याकरितां आधीं परिषदेचा शिक्षणप्रसाराचा

ह्मणून एक निदान कमींत कमी पांच लक्ष रुपयांचा फंड स्थापन करून, त्याच्याद्वारें मराठा ज्ञातींतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला मदत करावी. आमच्यांतल्या मोठमोठ्या राजेमहाराजांनीं ही गोष्ट जर मनावर घेतली तर, पांच लक्ष रुपयांचा फंड जमणें मुळींच अशक्य नाहीं. या फंडाचा, दुय्यमप्रतीच्या, उच्चप्रतीच्या आणि औद्योगिक शिक्षणाकडे उपयोग करण्यांत यावा, अशी माझी सूचना आहे. या फंडाला मदत करणें हें आमच्या मुख्य पुढाऱ्यांचें कर्तव्य आहे. कां कीं, गरीबांना सुशिक्षित करण्याचा एकंदर खर्च आमच्यांतल्या श्रीमंतांनीं सोसावा, ही गोष्ट बहुधा कोणास वावगी वाटणार नाहीं. आमच्यांतल्या सुशिक्षितांची संख्या वाढल्याखेरीज लोकांची दैन्यावस्था दूर होणार नाहीं, हें तत्त्व आतां सर्वमान्य झालें आहे. शिवाय, या आमच्या पुढाऱ्यांचा व आमचा संबंध, जन्मदात्री जननी व अपत्य यांचेमधील संबंधासारखा आहे. भुकेनें व्याकूळ झालेल्या बालकाला एखादी प्रेमळ माता ज्या आस्थेनें स्वतः उपाशीं राहून पोटाला घालील, तितक्या आस्थेनें, अज्ञानांधःकारांत निश्चेष्ट पडलेल्या समाजाला, शिक्षणवनौषधि पाजून सुशिक्षित करण्याचा प्रयत्न या थोर पुरुषांकडून झाला पाहिजे आमचे मराठे बांधव विद्येंत फार मागसलेले आहेत त्यांची पाश्चात्यदृष्ट्या सर्व प्रकारची प्रगति होण्यास, त्यांनीं पुष्कळ शिक्षण संपादन केलें, तरच त्यांचा आधुनिककाळच्या जीवनकलहाच्या झटापटींत निभाव लागेल. मराठी संस्थानांतून त्यांना सर्व जातींबरोबर सारखें शिक्षण मिळत आहे. त्यांत प्रपंच मुळींच

नाहीं. जें एकाला, तें सर्वांना मिळत आहे; आणि त्यामुळें कमी अधिक प्रमाणानें सर्वांची प्रगति होत आहे. जे आधीं पुढें गेलेले आहेत, ते त्या मानानें थोडे पुढें सरतील. परंतु पुढच्यांच्या बरोबरीस त्यास जातां यावयाचें नाहीं. या प्रमाणांत ते मागेंच राहातील. अशा स्थितींत जर मराठे लोकांस चांगलें साह्य मिळालें तर, ते कदाचित् थोड्या वेळांत पुढच्यांस जाऊन गांठतील. ह्मणजे, पर्यायानें ही क्षिक्षणरूपि शर्यतच आहे. पुढची मंडळी घोड्यांच्या गाड्यांतून चालली आहे; आणि त्यांस जर आह्मांस गांठावयाचें असेल तर, त्याकामीं बैलांच्या गाड्या उपयोगीं पडावयाच्या नाहींत. चांगल्या मोटारगाड्या दिल्या, तरच त्यांस पुढें गेलेल्यांस गांठतां येईल. एवढ्याचें तात्पर्य इतकेंच आहे कीं, आईला सगळीं मुलें सारखीं असतात. परंतु, त्यांत जें लंगडें, पांगळें किंवा आंधळें असतें, त्यावर तिची ममता अधिक असते; व ती ईश्वरीसूत्रानें आपोआप होते. त्यास निराळे प्रयास करावे लागत नाहींत. तेथें तें विचारी पुरुषांनीं बुद्ध्या समजून उमजून केलें पाहिजे. मराठे हे शिक्षणाच्या बाबतींत पांगळ्या लेंकरासारखे आहेत. तेव्हां, पांगळ्या मुलाला पांगुळगाडा देणें, हें आईच्यापक्षीं पक्षपात किंवा अन्याय होणार नाहीं ! याचें प्रत्यक्ष उदाहरण पाहिजे असल्यास पाश्चात्य राष्ट्रांकडे पहा. इंग्लंडनें इंग्रज लोकांच्या, जर्मनीनें जर्मन लोकांच्या, अमेरिकेनें अमेरिकनांच्या, फ्रान्सनें फ्रेंचांच्या आणि जपाननें जपानी लोकांच्या उन्नतीकरितां किती दीर्घोद्योग केले त्यांचा विचार केला तर, आमच्यांतल्या राजे-

महाराजांनीं आपल्या ज्ञातिबांधवांच्या शिक्षणविषयक उन्नतीकरितां विशेष आस्थेनें प्रयत्न केले, तर ते मोठमोठ्या पाश्चात्य राष्ट्रांच्या शास्त्रपूतमार्गास सोडून केले, असें ह्मणतां येणार नाहीं.

आणखी, आमच्यांतल्या समाजधुरीणांनींही सरकारच्या मदतीवर फारशी भिस्त न ठेवितां, खेडोखेडीं फुकट अथवा अल्प खर्चाच्या शाळा स्थापन करून, त्यांत सध्यांच्या स्थितींत योग्य असें व्यावहारिक उपयुक्ततेचें शिक्षण देण्याच्या उद्योगास लागावें. प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराला पैशाची अडचण आहे खरी. पण ती आस्थेच्या खटपटीनें थोडीबहुत दूर होईल.. खेड्यांतील मिळणाऱ्या बलुत्यांवर त्यांतील किरकोळ धंदा करणारांचा गुजारा होतो, ही गोष्ट पुष्कळांस ठाऊक असेल. एका पंतोजीच्या निर्वाहाची तरतूद करण्याचें काम वाटेल तें खेडें पतकरील. प्राथमिक शिक्षणाचें महत्त्व, खेड्यापाड्यांतून हिंडून लोकांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न झाला तर, त्यांकडून कांहींतरी साहाय्य मिळेल. लिहिणें, वाचणें व हिशेब वगैरे साध्या गोष्टी शिकविण्यापुरतें थोडेंसें ज्ञान असणारीं व थोड्याशा वेतनावर काम करण्यास तयार होणारीं स्थानिक माणसें खेड्यांतून मिळालीं पाहिजेत. प्रथमच शालागृहाचा प्रश्न उपस्थित करूं नये. ह्मणजे प्राथमिक खर्चाचें जड ओझें शिरावर येणार नाहीं. धर्मशाळा, देऊळ किंवा अशीच दुसरी एखादी जागा शाळेच्या उपयोगासाठीं प्रथम कांहीं काल मिळण्यास अडचण पडणार नाहीं. याकामीं खेड्यांतील लोकांकडून फंड जमविण्याची खटपट झाली पाहिजे व्याख्यानें,

लेख, हस्तपत्रकें वगैरेंच्या साहाय्यानें प्रथम थोडी अनुकूल भूमिका तयार करून, व शिक्षणाचें स्वरूप शुद्ध ह्मणजे इतर पंधरा-सतरा भानगडींपासून अलिप्त राखण्याचा निश्चय करून, ज्या खेड्यांत शाळा नाहींत, अशा खेड्यांत कांहीं नमुनेदार शाळा काढण्याचें काम व ज्या खेड्यांतून शाळा वगैरे असून देखील केवळ अज्ञानामुळें पालक आपल्या मुलांना शाळेंत पाठवीत नसतील त्यांची भेट घेऊन, त्यांना शिक्षणाचें महत्त्व समजावून देण्याचें काम सुरू झालें तर, प्राथमिक शिक्षणप्रसाराचा प्रश्न आज जितका कठीण वाटत आहे, तितका तो नाहीं, असें प्रत्ययास येईल. जिल्हामंडळांनीं हें काम हातीं घेऊन, आपल्या टप्प्यांत असलेल्या खेडेगांवांत लोकशिक्षणाचें कार्य सुरू केलें तर, प्राथमिक शिक्षणाच्या मार्गांतील पर्वत लवकर कोसळून पडतील. या प्रश्नासंबंधानें लोकांमध्यें चांगली जागृति उत्पन्न करून इष्टकार्यास अनुकूलता मिळण्याचा अभाव, ही खरोखरच मोठी अड-चण आहे. ही अडचण दूर करण्याचे प्रयत्न झाले तर, बाकीच्या अडचणी सहज दूर होतील.

या पुढचा प्रश्न, दुय्यम प्रतीच्या, उच्च प्रतीच्या आणि औद्योगिक शिक्षणाच्या संबंधाचा आहे. या कामीं लागणारा पैसा परिषदेच्या कायमच्या फंडांतून स्कॉलरशिप्सच्या रूपानें देण्यांत यावा. शिवाय, हें शिक्षण संपादन करून गरीब मराठे विद्यार्थी पुढें आणण्याचा एक मार्ग म्हटला म्हणजे, प्रत्येक मराठा संस्थानांतून व महाराष्ट्रांतील मोठमोठ्या शहरांतून एक एक बोर्डिंगहाऊस

( भोजनवसतिगृह ) स्थापन करण्याची अत्यंत जरूरी आहे. मराठे लोकांत उच्चप्रतीच्या शिक्षणाचा प्रसार न होण्याचें मुख्य कारण, त्यांचें दारिद्य होय. याकरितां वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें ठिकठिकाणीं भोजनवसतिगृहें स्थापन करण्याबद्दलचा प्रयत्न पुढाऱ्यांकडून होईल, अशी आशा आहे. आणखी, दुय्यम प्रतीच्या म्हणजे इंग्रजी सहा सात यत्तांपर्यंतच्या शिक्षणाकडे व औद्योगिक शिक्षणाकडे विशेष लक्ष्य देण्यांत यावें. कारण, त्यायोगानें आमच्यांत निदान इंग्रजी लिहितां वाचतां येणारी संख्या वाढेल. व आज शिक्षणाच्या अभावीं आमच्या लोकांस जे अनंत कष्ट सोसावे लागत आहेत, अपमान सहन करावा लागत आहे, आणि एकंदरींत आमच्या समाजाची मोठी हानि होत आहे, ती अंशतः दूर होईल.

औद्योगिक शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. आपल्या देशांतील बहुतेक उद्योगधंदे बुडाल्याकारणानें, पुष्कळांचा कल विशेषतः नोकरीकडे असतो. त्यामुळें आजकाल नोकऱ्या फार महाग झाल्या आहेत. अशा स्थितींत औद्योगिक शिक्षणाच्या अध्ययनाकरितां दरसाल निदान एकतरी विद्यार्थी परदेशांत पाठविण्याची व्यवस्था परिषदेकडून झाली पाहिजे.

मराठे लोक विद्येंत किती मागसलेले आहेत, व त्यांच्यांत जारीनें शिक्षणप्रसार होण्याची किती आवश्यकता आहे, हें खालील आंकड्यांवरून लक्ष्यांत येईल:—

## मुंबई युनिव्हर्सिटीचा सन १९०३ सालचा रिपोर्ट.

| परीक्षेचें नांव. | एकंदर विद्यार्थी. | पारशी. | मराठेतर हिंदु. | मुसलमान. | मराठे. |
|---|---|---|---|---|---|
| म्याट्रिक ... ... | १०३५ | २०६ | ७३५ | ३९ | १२ |
| यु. एस्. एफ् ... ... | २९१ | १२ | २४१ | ७ | ३ |
| पी. ई. ... ... .. | ६८३ | १०८ | ४०३ | १४ | २ |
| इंटरमीजिएट ... ... | ४६१ | ३८ | २०३ | ९ | १ |
| बी. ए.... ... ... | ४८६ | ५९ | २८० | ११ | ० |
| एल्. एम्. अड एस्. ... | १७ | ५ | ८ | २ | ० |
| एल्. एल्. बी.... ... | १०१ | १७ | ७८ | ३ | २ |
| एम्. ए. ... ... | १७ | ० | १७ | ० | ० |
| एकुण ... ... ... | ३०९१ | ४४५ | १९९२ | ८५ | २० |

सन १९०९ साल अखेरपावेतों एकंदर मराठा ज्ञातींत १ अॅडव्होकेट, ७ एल्. एल्. बी., ३ एम्. ए., २१ इंटरमीजिएट, ३७ पी. ई., ९१ म्याट्रिक, २६ यु. एस्. एफ्., २ एल्. सी. ई., व १ एल्. एम्. अँड एस्. झालेले लोक होते. गेल्या २५ वर्षांत मराठा

ज्ञातींत जितके पदवीधर तयार झाले, तितक्या स्त्रिया यंदाचे वर्षी म्याट्रिकच्या परिक्षेस बसल्या होत्या, ही गोष्ट मराठामंडळानें लक्षांत ठेवण्यासारखी आहे. मराठ्यांच्या एकंदर ७५ लक्ष लोकसंख्येंत इतर जातींपेक्षां मराठे विद्येंत किती मागसलेले आहेत, याची साक्ष वरील आंकड्यांवरून चांगली पटते.*

आमच्या समाजाची लोकसंख्या पुष्कळ मोठी असल्याकारणानें व त्यांतील बराच मोठा भाग दारिद्र्य, उपासमार आणि दुःखें यांनीं गांजलेला असल्यामुळें, आजवर त्याच्यांत शिक्षणाचा प्रसार झालेला नाहीं. ही शिक्षणाच्या अभावाची स्थिति साधारण जनसमाज व आमचे पुढारी या उभयतांसही श्रेयस्कर नाहीं. आणि वर दर्शविल्याप्रमाणें साधारण जनसमाज तर सांपत्तिक दृष्टीनें व ज्ञानाभवाच्या दृष्टीनें स्वतःच्या उन्नतीस योग्य असें शिक्षण योजण्याच्या व तें अमलांत आणण्याच्या कामास सर्वथा असमर्थ आहे. तर, यापुढें या अगत्याच्या प्रश्नाची चालढकल न करितां, त्याचा समाधानकारक निकाल लावण्याच्या तयारीस त्यांनीं लागावें, हें उचित होय. आमच्यांतल्या राजेरजवाड्यांनीं मराठ्यांच्या शिक्षणप्रसाराला पैसा द्यावा, हें सर्वांपेक्षां उत्तम आहे. हें पवित्र कर्तव्य आहे. सर्वोत्कृष्ट हाच

*१९१३ सालीं फर्स्ट एल्. एल्. बी. २, बी ए ३, इंटरमीजिएट ६, म्याट्रिक १६, एल. सी. १, एस् ए. जी. २, एफ्. ए. जी. २, व इंग्लंडमधील युनिव्हर्सिटींत १ मराठा विद्यार्थी पास झाला आहे. ही स्थिति फारशी समाधानकारक आहे, असें कोण ह्मणेल

धर्म आहे. हा अज्ञानास शहाणें करावयाचा मार्ग आहे. म्हणूनच हा धर्म सर्वांहून श्रेष्ठ आहे. ही बुद्धि विशेष रीतीनें आमच्यांतल्या पुढाऱ्यांच्या मनांत जागृत होवो, व हस्तेंपरहस्तें, कोणत्याही मार्गानें, कोणत्याही उपायांनीं आमची मराठ्यांची उन्नति करण्याची सद्‌बुद्धि त्यांच्या अंतःकरणांत जागृत होवो, हेंच देवापाशीं मागणें आहे.

## ९.—ज्ञातिपरिषदा एकराष्ट्रीयत्वाला विघातक होतील काय?

( मराठामित्र—जानेवारी, १९११ ).

गेल्या सालाचे अखेरीस हिंदुस्थानांत निरनिराळ्या ज्ञातींच्या अनेक ज्ञातिसभा व शिक्षण-परिषदा भरून त्यांत सामाजिक, धार्मिक, औद्योगिक व शिक्षणविषयक प्रश्नांचा विचार झाला, आणि त्यावरून उत्क्रांति तत्त्वानुसार या देशांतील लोकांत किती जागृति उत्पन्न झाली आहे, याची साक्ष पटली. निरनिराळ्या जातींत उत्पन्न झालेल्या या प्रशंसनीय जागृतीमुळें, कित्येक पुढाऱ्यांना आतां अशी भीति वाटूं लागली आहे कीं, प्रत्येक जातीनें आपआपल्या निरनिराळ्या परिषदा स्थापन केल्या तर, त्यांपासून ज्ञातिबंधनें हल्लींपेक्षां जास्त दृढ होतील, आणि त्यामुळें एकराष्ट्रीयत्वाला धक्का बसेल. परंतु, इंग्लंडसारख्या

प्रगतिप्रिय राष्ट्राच्या निकट सान्निध्यानें हिंदी लोकांत शिक्षण-प्रसार होऊन त्यांच्यांत विचारस्वातंत्र्याची जी ज्योत प्रकटली आहे, तिचा विचार केला तर, ही भीति वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. तात्त्विक दृष्टीनें ज्ञातिपरिषदांचें अस्तित्व इष्ट असो वा नसो-तरी सध्यां त्यांचाच काळ आहे, असें गृहीत धरून चालले पाहिजे. कारण, दरसाल नवीन नवीन परिषदा अस्तित्वांत येत आहेत, व येणार. स्वतंत्र ज्ञातिपरिषदांची आवश्यकता, कांहीं बलवत्तर कारणांमुळें कित्येक ज्ञातींतील पुढाऱ्यांस वाटल्यावरून त्या स्थापन करण्यांत आल्या आहेत, आणि त्या आतां थांबणें शक्य नसल्यामुळें, या ज्ञातिपरिषदांपासून सध्यांच्या काळीं कोणकोणते फायदे होण्यासारखे आहेत, याचा विचार करणें जरूर आहे.

२. राष्ट्रीयसभा, प्रांतिकसभा, सामाजिक परिषद् यांसारख्या सार्वजनिक हिताच्या संस्था अस्तित्वांत असतां निरनिराळ्या ज्ञातिपरिषदांची काय जरूर आहे? असा प्रश्न नेहेमीं विचारण्यांत येतो. याचें उत्तर असें आहे कीं, वर दर्शविलेल्या संस्था राष्ट्रीय असल्यामुळें, प्रत्येक ज्ञातीची सुधारणा करण्याचें काम त्यांचें नाहीं. व तें त्यांचेकडून होणें शक्य नाहीं. राष्ट्रांत ज्या जाति आहेत, तितक्या सर्व राष्ट्राचे घटकावयव आहेत व प्रत्येक अवयव उन्नतीप्रत पोहोंचला, म्हणजे सहजच राष्ट्राची उन्नति व्हावयाची. राष्ट्रीयसभा जें काम करीत आहे, तें सार्वत्रिक असून, राजकीय बाबतींसंबंधाचें आहे. ज्ञाति-परिषदांतून राजकीय प्रश्नांचा ऊहापोह करावयाचा नसतो.

कारण, देशांतील मोठमोठे लोक त्यासंबंधानें विचार करीत आहेत, व त्यांच्या कार्याला ज्ञाति-परिषदांच्या पुरस्कर्त्यांची सहानुभूति आहे. राष्ट्रीय सभेंत भाग घेणारे लोक बहुतेक सुशिक्षित वर्गांतले असतात, व ते जें काय देशाच्या कल्याणासाठीं करीत आहेत, तें प्रत्येक मनुष्याला समजणें अवश्य व इष्ट आहे. सर्व जातींना सुशिक्षित करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांना अद्याप यावें तसें यश आलें नाहीं, व ज्या जाति सुशिक्षित आहेत, त्यांचेकडून अद्याप व्हावे तसे प्रयत्नही झाले नाहींत. याचा परिणाम असा झाला आहे कीं, या देशांतील बहुजनसमाज अज्ञ राहिलेला आहे. आणि म्हणून, त्याला सुशिक्षित कोणीं करावयाचें, हा प्रश्न विचार करण्यासारखा नाहीं काय ? शिक्षणामध्यें ज्या जाति पुढें गेल्या आहेत, त्यांना कदाचित् निराळ्या परिषदांची आवश्यकता नसेल. परंतु, ज्या जाति अद्याप मागसलेल्या आहेत, त्यांना आपले शिक्षणविषयक प्रयत्न व समाजसुधारणेच्या कित्येक बाबती स्वतंत्रपणें अमलांत आणणें जरूर आहे. कोणत्याही जातीसंबंधानें मनांत वैषम्य न बाळगतां, आपल्या समाजाची उन्नति करावी. ज्या दृष्टीनें आपल्या कुटुंबाची प्रथम उन्नति करून मग आपण परोन्नतीचें कार्य करितों, त्याच दृष्टीनें निरनिराळ्या जातींच्या लोकांनीं आपापल्या उन्नतीचें कार्य केलें पाहिजे. कांहीं सामाजिक चालीरीति सर्व जातींना सारख्याच नडणाऱ्या असल्या तरी, प्रत्येक ज्ञातीच्या कांहीं विशिष्ट अडचणी असतात. त्या सामाजिक परिषदेकडून नाहींशा होणें शक्य नाहीं.

त्या गोष्टी त्या त्या ज्ञातींकडूनच विशेष सुव्यवस्थित रीतीनें पार पडतील; व अशा रीतीनें आपापल्या उन्नतीप्रीत्यर्थ स्वतंत्र प्रयत्न करून, कालांतरानें विवक्षित मर्यादेपर्यंत सर्व ज्ञातींची उन्नति झाली, म्हणजे त्या क्रमाक्रमानें आपोआप राष्ट्रीय सभेच्या छावणींत येऊन पोहोंचतील.

३. आज भरणाऱ्या ज्ञातिपरिषदांच्या कार्यक्रमांचें सिंहावलोकन करा, त्यांच्या अध्यक्षांचीं भाषणें वाचा, भेदभावांची वृद्धि होईल, राष्ट्रघटनेला विरोध येईल, अशी एकही गोष्ट त्यांत सहसा आढळणार नाहीं. आमची जात सर्वश्रेष्ठ आहे, आपण इतर जातींशीं संबंध ठेवतां कामानये, असे कोते विचार कोठेंही प्रदर्शित करण्यांत येत नाहींत. कोणत्याही ज्ञातीच्या परिषदेमध्यें आपल्याच जातीचें बंड माजविण्याचा प्रयत्न न करितां, जेणेंकरून शिक्षण, समाजसुधारणा व पोटजातींचें एकीकरण होऊन आपल्या ज्ञातीची उन्नति होईल, असेच उपाय योजण्यांत येतात, ही गोष्ट गेल्या वर्षी भरलेल्या कांहीं परिषदांवरून सिद्ध झाली आहे. लुहाणा समाजाची परिषद् ता. २४-२५-२६ डिसेंबर रोजीं मुंबईस झाली. या परिषदेमध्यें लुहाणा ज्ञातींतील सर्व पोटजातींतले लोक एकत्र झाले होते. परिषदेंत त्यांनीं आपल्यांतल्या तरुणांच्या शिक्षणाकरितां तीन लक्ष रुपयांचा फंड जमविला व सामाजिक प्रश्नांचे कित्येक ठरावही पास केले. विशेष महत्त्वाची गोष्ट ही कीं, परिषदेंत जुन्या मतांचे कांहीं लोक होतेच. त्यांच्या मतें परिषदेंत हजर असलेल्या स्त्रियांनीं पडद्यांत

बसून भाषणें ऐकावींत. परंतु, स्वागत कमिटीचे अध्यक्ष शेट दामोदरदास गोवर्धनदास सुखडवाला* यांनीं असें निक्षून सांगितलें कीं, स्त्रियांना पडद्यांत बसविण्याची व्यवस्था करण्यांत आली तर, या परिषदेशीं माझा संबंध मुळींच राहणार नाहीं. याचा परिणाम असा झाला कीं, लुहाणा परिषदेस पहिल्या दिवशीं शंभर व दुसऱ्या दिवशीं ५०० स्त्रिया हजर होत्या. सारांश, शिक्षण व समाजसुधारणा या दोन्ही बाबतींत लुहाणा परिषदेनें अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजाविली, ही गोष्ट राष्ट्रहिताच्या दृष्टीनें कमी महत्त्वाची झाली काय? बडोदें येथें भरलेल्या चवथ्या **मराठा-शिक्षण-परिषदेंत** शाण्णव कुळींचे मराठे, कोणत्याही प्रकारचा भेदभाव मनांत न आणतां एकत्र जमले व एकविचारानें त्यांनीं आपल्यांतल्या शिक्षण-विषयक दैन्यावस्थेच्या प्रश्नाचा काळजीपूर्वक विचार केला. परिषदेला पुष्कळ स्त्रिया प्रेक्षक ह्मणून व कांहीं स्त्रिया डेलिगेट या नात्यानें हजर होत्या. **श्री. सयाजीराव महाराज गायकवाड** यांनीं परिषदेला प्रत्यक्ष हजर राहून तिच्याविषयीं आपली सहानुभूति व्यक्त केली व परिषदेस आपल्या अमोल उपदेशाचा लाभ दिला. अध्यक्ष **ना० सरदार शंभुसिंहराजे** यांनीं "भेदाभेद वर्म अमंगळ" या तुकारामाच्या अभंगाच्या उक्तीची श्रोत्यांस आठवण करून दिली, तिच्या रहस्याचें विशेष स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता

* हे परोपकारी गृहस्थ नुकतेच परलोकवासी झाले. हे कट्टे प्रार्थनासमाजिष्ट होते, व ज्ञातिपरिषदांना यांची सहानुभूति होती.

नाहीं. जनरल फंड स्थापन करण्याच्या प्रश्नासंबंधानें अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत उद्घाटण केलें, व त्याप्रमाणें एक जनरल फंडही स्थापन करण्यांत आला. शिवाय परिषदेंत अनेक महत्त्वाच्या प्रश्नांचा विचार झाला. **मराठा–परिषद्** स्थापन झाली नसती, तर या गोष्टी घडल्या असत्या काय ? अजमीर येथें भरलेल्या नागरांच्या परिषदेंत सर्व पोटजातींचे लोक हजर होते. म्हापसें येथें भरलेल्या संयुक्त गौडसारस्वत ब्राह्मण–परिषदेची उभारणी, आपल्या ज्ञातींत शिक्षण-प्रसार व्हावा, तिच्यांत ऐक्यवृद्धि होऊन पोटज्ञातींचें एकीकरण व्हावें, या उदात्त तत्त्वांच्या पायावरच झालेली आहे.

४. वरील हकीकतीवरून ज्ञातिपरिषदांचेयोगानें श्रमविभागाच्या तत्त्वानुसार सामाजिक सुधारणेला व शिक्षणप्रसाराच्या कार्याला प्रत्यक्ष मदत होत आहे, इतकेंच नव्हे तर, या परिषदा सर्वांच्या एकीकरणाचें ध्येय पुढें ठेवून होत आहेत, ही गोष्ट, मराठा–परिषद्, गौडसारस्वत ब्राह्मण–परिषद्, क्षत्रिय कॉन्फरन्स व जैन सभा यांतून होणाऱ्या कामकाजांवरून सिद्ध होत आहे. साधारणतः असा एक नियम आहे कीं, ज्या मानानें ज्ञातिसमूह मोठा होईल, त्यामानानें ज्ञातिबंधनें आपोआप शिथिल होत जाणार. ज्ञातिविशिष्ट परिषदांच्यायोगानें त्या त्या ज्ञातींचे दृष्टिबिंदु आकुंचित न होतां, ते ज्यास्त व्यापक होत जातील. मूळ चार जाति खऱ्या; तथापि, आज त्यांच्या हजारों जाति झाल्या आहेत, त्या श्रेयस्कर नाहींत, हें पुष्कळ सूज्ञांना आतां कळूं लागलें आहे, व

त्याप्रमाणें .ते आपआपल्या जातींतील पोटभेद मोडून टाकण्याच्या मार्गास लागले आहेत. स्पष्ट बोलावयाचें ह्मणजे विहिरींतून निघून ते सरोवरांत येत आहेत व कालांतरानें त्यांचें पर्यवसान महासागराच्या स्वरूपांत होणार आहे, ही गोष्ट ज्ञातिपरिषदांविषयीं आक्षेप घेणारांनीं लक्ष्यांत ठेवावी.

५. शिक्षण, समाजसुधारणा, नैतिक व धार्मिक उन्नति करणें हेच जर ज्ञाति-परिषदांचे उद्देश असतील, तर ते पार पाडण्याकरितां ज्ञातिविशिष्ट परिषदा कां भरवाव्या ? प्रांतानिहाय किंवा जिल्हानिहाय कां भरवूं नयेत ? असें कित्येकांचें म्हणणें आहे. याचें उत्तर असें कीं, प्रांतानिहाय किंवा जिल्हानिहाय संस्था स्थापन करण्याइतकें ऐक्य, कर्तव्यतत्परता व उत्साह लोकांत अद्यापि नाहीं. परिषदा मुळींच न भरण्यापेक्षां त्या निरनिराळ्या जातींच्या कां होतना, भरल्या तर त्यांपासून एकंदरींत फायदाच होईल. पाणी थिजूं लागलें म्हणजे प्रथम त्यांतील प्रत्येक बिंदु थिजतो, व सर्व बिंदु थिजले म्हणजे बर्फाचा गोळा बनतो. हाच प्रकार ज्ञाति-परिषदांचा पुढें होणार आहे. प्रत्येकाला आपआपल्या जातीचा अभिमान असतो. आणि जो आत्मयज्ञ, जें स्वात्मार्पण सर्व देशाकरितां करण्यास लोक अद्यापि तयार नाहींत, तो आत्मयज्ञ, तें स्वात्मार्पण आपल्या ज्ञातीच्या कल्याकरितां करण्यास कित्येक तयार होतात. तेव्हां, या प्रशंसनीय प्रवृत्तीचा फायदा कां घेऊं नये ? ज्ञातीच्या कल्याणाकरितां फंड स्थापन केले, आणि त्यांचा फायदा ज्ञातींच्या विद्यार्थींस मिळण्याची

व्यवस्था केली, तर त्यांपासून भेदभावांची वृद्धि होण्याची भीति बाळगण्याचें कारण नाहीं. तारखात्याच्या आणि रेल्वेच्या सोईमुळें सर्व जगांतील लोक परस्परांच्या इतक्या निकट सहवासांत येत चालले आहेत कीं, ज्ञातींचीं बंधनें यापुढें टिकणें शक्यच नाहीं. तीं कालांतरानें आपोआप तुटतील. फार तर काय, आरंभीं आमच्यांत कितीही वाद व स्पर्धा असली, तरी, निरनिराळ्या ज्ञातिसंस्थाचें पर्यवसान सर्वांच्या एकीकरण–प्रवृत्तीमध्येंच होईल, आणि त्यांच्यांतील परस्परविरोधीपणा हळू हळू निघून जाईल, अशी आशा बाळगण्यास जागा आहे. कांहीं सूज्ञ, ज्ञातिबंधनें जास्त दृढ होतील ही सबब पुढें करून–ज्ञातिहिताच्या फंडांना मदत करण्याचें नाकारतात, वेदांताच्या गोष्टी सांगून, अंग झाडून मोकळे होतात,–ही खेदाची गोष्ट होय. प्रत्येक ज्ञातींत दीन, दुबळ्या व असहाय लोकांची संख्या असणारच. या लोकांना त्या त्या ज्ञातींतील समंजस धनिकांनीं हाताशीं धरून साहाय्य केलें तर, शिक्षण वगैरे बाबतींत आयताच श्रमविभाग होऊन त्या त्या ज्ञाति उन्नतीप्रत पोहोंचतील. या बाबतींत मतभेद होण्याचें तादृश कारण नाहीं. एकंदरींत, सर्व ज्ञातिपरिषदांनीं सर्वांच्या एकीकरणाचें ध्येय पुढें ठेवून योग्य धोरणानें आपापल्या परिषदांचें काम चालविलें तर, त्यापासून हिंदी लोकांच्या एकराष्ट्रीयत्वाला धोका न पोहोंचतां, उलट त्याचा परिपोषच होईल.

# १०.—हीं तीन चित्रें पहा.

[ मराठामित्र-फेब्रुवारी, १९११. ]

"जगाला ज्ञानाच्या प्रकाशाची जरूर आहे. प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणांत ज्ञानाचा प्रकाश प्रदीप्त करा, कीं जेणेंकरून त्याचें जीवित साफल्य होईल." असें सुप्रसिद्ध आंग्ल तत्त्ववेत्ता कार्लाइल यानें एके ठिकाणीं म्हटलें आहे, तें अक्षरशः खरें आहे. जगांतील सर्व धर्मांची आज्ञा हीच आहे. त्या आज्ञेला अनुसरून म्हणा, किंवा शिक्षणाची कास धरल्याशिवाय आपली प्रगति होणार नाहीं, आधुनिक जीवनसंग्रामांत आपला टिकाव लागणार नाहीं, अशी खात्री झाल्यामुळें म्हणा, आत्मसुधारणेची दृढेच्छा हिंदुस्थानांतील सर्व जातींच्या लोकांत उत्पन्न झाली आहे व त्यावरून राष्ट्रांत चैतन्यसंस्कार झाल्याची साक्ष पटत आहे. याचा परिणाम असा झाला आहे कीं, निरनिराळ्या जातींतील पुढाऱ्यांना स्वावलंबनाच्या मार्गाचा स्वीकार करून आपल्या जातींत शिक्षणप्रसार करण्याची स्फूर्ति झाली आहे. हिंदुस्थानचे माजी व्हाइसरॉय लॉर्ड लिटन यांनीं एके प्रसंगीं आपल्या भाषणांत असें सांगितलें होतें कीं, हिंदुस्थानांत सामाजिक, धार्मिक, नैतिक आणि शिक्षणविषयक वगैरे बाबतींत फेरफार होऊं लागला आहे. लॉर्ड लिटन यांस या देशांतून गेल्यास पाव शतक लोटलें आहे. इतक्या अवधींत जी जागृति

उत्पन्न झाली आहे, ती स्वावलंबनाच्या तत्त्वांवर झाली असून, शिक्षणसंपादनप्रीत्यर्थ देशांत एक प्रकारची प्रचंड चळवळ उत्पन्न झाली आहे, ही गोष्ट कोणासही नाकबूल करतां येणार नाहीं.

२. गेल्या डिसेंबर महिन्यांत हिंदुस्थानांत ज्या अनेक सभा व शिक्षण-परिषदा झाल्या, त्यांतल्या तीन विशेष महत्त्वाच्या होत्या. ज्यांचा वैभवयुक्त गतकाल हिंदुस्थानच्या इतिहासाचीं पानें सुशोभित करीत आहे, त्या मुसलमान, रजपूत व मराठे लोकांच्या परिषदा होत. नागपूरच्या मुसलमानी शिक्षण-परिदेंतील अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे, नामदार आगाखान यांनीं महंमदी विश्वविद्यालय स्थापन करण्यासंबंधानें केलेली सूचना होय. ईश्वरीसंकेतानें भरतभूमि वैभवशाली ब्रिटिश राजसत्तेखालीं येऊन सरकारच्या कृपाछत्राखालीं आज पांच विश्वविद्यालयें अस्तित्वांत आहेत. त्यानंतर आजपर्यंत खासगी विश्वविद्यालय स्थापन करण्याचा प्रयत्न कोणत्याही जातीनें केला नव्हता. परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, मुसलमानांसारखी मागसलेली जात, अशा प्रकारचें एक विश्वविद्यालय स्थापन करण्याच्या तयारींत आहे. हें विश्वविद्यालय स्थापन करण्याचें महत्कार्य नामदार अगाखान यांनीं आपल्या शिरावर घेतलें असून, जॉर्ज बादशहा हिंदुस्थानांत येतील त्यावेळीं त्यांचे नांवानें विश्वविद्यालय स्थापन करण्यांत यावें, अशी नामदार आगाखान यांची सूचना होती. या महाभारत कामाकरितां नामदार आगाखान यांनीं महंमदी राजेरजवाडे, मोठमोठे नबाब, सरदार, जहागीरदार वगैरेंच्या

भेटी घेऊन त्यांनीं आंतापर्यंत सुमारें १६ लक्ष रुपये जमा केले आहेत. या फंडाला भोपाळच्या बेगमसाहेब यांनीं दोन लक्ष रुपये, रामपूरच्या नवाबसाहेबांनीं दीड लक्ष रुपये, महमुदाबादच्या नबाबांनीं एक लक्ष रुपये, जहांगिराबादच्या राजेसाहेबांनीं एक लक्ष रुपये दिले असून, नामदार आगाखान यांनीं स्वतः एक लक्ष रुपये दिले आहेत. या शिवाय लखनौ येथून साडेतीन लक्ष रुपये मिळाले आहेत. एक कोटि रुपयांचा फंड ऐकून कित्येकांना आश्चर्य वाटेल. तथापि केंब्रिज आणि ऑक्सफर्ड येथील युनिव्हर्सिट्यांच्या धर्तीवर महंमदी विश्वविद्यालय स्थापन करून, प्राचीनकाळच्या केरो आणि कोरदोआ येथील विश्वविद्यालयांप्रमाणें जगांतील सर्व ठिकाणच्या मुसलमानांना या विश्वविद्यालयाचा फायदा घेतां यावा, असा नामदार आगाखान यांचा उद्देश आहे. तेव्हां, या एकंदर योजनेचा विचार केला म्हणजे, एक कोटि रुपयांचा फंड जास्त आहे, असें म्हणतां येणार नाहीं. फंड जमविण्याकरितां नामदार आगाखान यांनीं दीर्घ परिश्रम करून महिन्या दीड महिन्याच्या अवधींत १६ लक्ष रुपये गोळा केले आहेत. त्यावरून येत्या डिसेंबर महिन्यापर्यंत एक कोटि रुपयांचा फंड जमून, ना. आगाखान यांचा उद्देश सिद्धीस जाईल, असें वाटतें. बाकी, महंमदी विश्वविद्यालय एकराष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनें इष्ट असो वा नसो; त्यासंबंधानें मत देणें धाष्टर्याचें होईल. तथापि,

---

१ प्रस्तुत निबंध लिहिला तेव्हां ही रक्कम जमा झाली होती. आतां या फंडाची रक्कम सुमारें ३० लक्षांवर जमा झाली आहे, असें समजतें.

महंमदी विश्वविद्यालयाच्या संस्थापकांनीं व्यापक दृष्टीनें शिक्षणक्रम ठरवून, जें राष्ट्रीय ध्येय राजा-प्रजा यांना परस्परसाहाय्यानें प्राप्त करून घेणें आहे, त्या ध्येयाच्या आड येणाऱ्या तत्त्वांचा शिरकाव या विश्वविद्यालयांत होऊं देऊं नये.

३. अलाहाबाद येथें भरलेल्या रजपूत परोपकारिणी महासभेनें, ज्यांनीं आपल्या क्षात्रतेजानें व स्वदेशप्रीतीनें स्वतःचें नांव या देशाच्या इतिहासांत चिरस्मरणीय करून ठेविलें आहे, त्या रजपूत लोकांची उन्नति करण्याचें कार्य हातीं घेतलें आहे. या महासभेचे अध्यक्ष नामदार काश्मीरचे महाराज यांनीं खानेसुमारीच्या आंकड्यांवरून असें सिद्ध केलें आहे कीं, दर सातशें रजपूत लोकांत एक मनुष्य इंग्रजी शिकलेला असतो. हिंदुस्थानांतील एका प्रमुख ज्ञातीची शिक्षणाच्या बाबतींत ही शोचनीय स्थिति पाहून कोणाचें अंतःकरण द्रवणार नाहीं ? तथापि, अशा निराशाजनक परिस्थितींतही आशेचें किरण प्रकाशमान् होऊं लागलें आहे. इतर ज्ञातींप्रमाणें, रजपूत लोकांतही शिक्षणविषयक जागृति उत्पन्न झाली आहे. इतकेंच नव्हें तर, ज्या कारणांचें निर्मूलन करण्याकरितां रजपूत लोक अश्रांत परिश्रम करूं लागले आहेत, त्या कामीं त्यांना साहाय्य करण्याकरितां काश्मीरच्या महाराजांसारखे श्रेष्ठ नृपति पुढें सरसावले आहेत. या शिवाय, जोधपूर, जयपूर, उदेपूर, जामनगर, रेवा, बुंदी, बिकानेर, सिरोही, कृष्णगढ, आत्रा व भिंग येथील महाराजे व शैवाना, झालावाड आणि रतलाम येथील राजे, रजपूत लोकांच्या शिक्षणविषयक उन्नतीकरितां प्रयत्न करीत

आहेत. बनारस व आग्रा ह्या शहरीं भिंग व आवागडच्या महाराजांनीं अनुक्रमें ११ लक्ष व १० लक्ष रुपये खर्च करून दोन हायस्कुलें रजपूत क्षत्रियांकरितां काढिलीं आहेत. हीं हायस्कुलें स्थापन करण्याच्या कामीं सुयश आलेलें पाहून, रजपूत विद्यार्थ्यांना उच्च-प्रतीचें शिक्षण मिळण्याकरितां एक नमुनेदार कॉलेज स्थापन करण्या-संबंधानें काश्मीरच्या महाराजांनीं एक सूचनापत्र प्रसिद्ध केलें आहे. हें कॉलेज स्थापन करण्यास ३५ लक्ष रुपये लागतील व शिष्यवृत्ती-करितां ५ लक्ष रुपये लागतील. ही संस्था ख्रि० वा० एडवर्ड बाद-शहांचें स्मारक ह्मणून स्थापन करण्यांत येणार असून, तिचा पाया घालण्याचा समारंभ बादशहा पांचवे जॉर्ज हिंदुस्थानांत येतील, त्या वेळीं त्यांच्या हस्तें करावा, असें रजपूत परोपकारिणी महासभेच्या वेळीं अध्यक्ष या नात्यानें केलेल्या भाषणांत महाराजांनीं ह्मटलें आहे. काश्मीरच्या महाराजांनीं रजपूत लोकांच्या शिक्षणाकरितां ३२००० रुपयांची स्पेशल वार्षिक ग्रांट दिली आहे. या एकंदर हकीकतीवरून रजपूत राजेमहाराजे आपल्या ज्ञातीच्या उन्नतीकरितां किती दीर्घोद्योग करीत आहेत, हें लक्ष्यांत येईल.

४. वाचकांनो! हिंदुस्थानच्या ऐतिहासिक कालांत ज्यांनीं आपलें नांव गाजविलें, त्या मुसलमान आणि रजपूत लोकांनीं आत्मो-न्नतीप्रीत्यर्थ चालविलेल्या प्रयत्नांचीं दोन चित्रें वर काढिलीं आहेत. त्यांच्या जोडीला मुसलमान आणि रजपूत लोकांइतकेंच ज्यांचें ऐति-हासिक महत्त्व आहे, त्या मराठे लोकांच्या शिक्षणविषयक चळवळीचें

चित्र काढून त्यांत विशेष चांगलें कोणतें, याचा निर्णय आपण करावा. थोड्या वर्षांपूर्वीं ज्या मराठे लोकांनीं आपल्या अंगच्या शौर्य-वीर्य-धैर्य-औदार्यादि गुणांचें प्रदर्शन करून जगाचे डोळे दिपविले व सर्वांकडून वाहवा मिळविली, त्या मराठ्यांच्या भाग्याचे व उन्नतीचे दिवस जाऊन सध्यां त्यांस दुर्दिन प्राप्त झाले आहेत. फार तर काय, या ऐतिहासिक, इभ्रतदार आणि खानदानीच्या वर्गाची स्थिति सध्यां अत्यंत करुणास्पद झाली आहे, ही गोष्ट मराठा समाजाच्या सध्यांच्या स्थितीचें बरवर निरीक्षण करणारासही कळून येणार आहे. मराठे लोकांचें पूर्ववैभव निस्तेज झालें आहे. तथापि, हल्लींही हिंदुस्थानच्या लोकसमुदायांत त्यांचें महत्त्वाचें स्थान आहे. कारण, कोणत्याही गोष्टीचा शेवट हा असतोच. त्याप्रमाणें, मराठे लोकांच्या दुर्गतीचा शेवट होऊन ते प्रगतीचा मार्ग आक्रमण करूं लागले आहेत, हें पाहून मराठा समाजच्या प्रत्येक हितचिंतकास समाधानच वाटेल.

५. गेल्या **मराठा-परिषदेंत** जे ठराव पास झाले, त्यांतल्या एका ठरावाचें महत्व विशेष होतें. तो ठराव जनरल फंडासंबंधीचा होय. जनरल फंडाची परिषदेला फार जरूर होती, व तो लहानशा प्रमाणावर कां होईना, स्थापन झाला ही फार आनंदाची गोष्ट झाली. हा फंड गोळा करण्याकरितां-श्रीमंत राजेरजवाडे, सरदार वगैरेंना विनंति करून, मदत मिळविण्याकरितां-एक कामिटी, **श्रीमंत आलिजा-बहादर शिंदे सरकार** यांचे अध्यक्षतेखालीं नेमण्यांत आली

आहे. बडोद्याची परिषद् भरून दोन महिने होऊन गेले आहेत. **मराठा-परिषदे**च्या वेळीं नागपूर व अलाहाबाद येथें अनुक्रमें मुसलमान व रजपूत लोकांच्या शिक्षण-विषयक परिषदा भरून त्यांत पास झालेले ठराव अमलांत आणण्याचे प्रयत्न मोठ्या जारीनें त्यांनीं चालविले आहेत. **मराठा-परिषदे**चा आजवरचा इतिहास पाहिला तर, साधारणतः असें म्हणावयास हरकत नाहीं कीं, एकदां परिषदेच्या धामधुमीचे चार दिवस संपले, म्हणजे दहा महिने चळवळ बहुतेक थंडावून जावयाची, व पुन्हा वार्षिक बैठकीचे दिवस जवळ येऊं लागले म्हणजे, अंगांत उत्साह आणून महिना-पंधरा-दिवस कामास लागावयाचें. प्रश्न हा आहे कीं, अशा तात्कालिक आणि हंगामी उत्साहानें आमची उन्नति होइल काय ? आम्हीं योजिलेलीं कार्यें पार पडतील काय ? आमचे इष्ट हेतु साध्य होतील काय ? परिषदेपुढें येणाऱ्या ठरावांवर वक्त्यांनीं भाषणें करावीं, श्रोत्यांनीं तीं ऐकावींत व वाचकांनीं वर्तमानपत्रांतून वगैरे वाचावींत असें समजण्याचा काल आतां निघून गेला आहे. दोनचार दिवस एकत्र जमून दहापांच ठराव पास केले, आवेशयुक्त भाषणें केलीं, दांडगा उत्साह दाखविला, म्हणजे अपरिमित समाजकार्य झालें अशी जर कोणाची समजूत असेल, तर, ती साफ चुकीची आहे. चार दिवसांच्या कामकाजानें आमच्या पुढाऱ्यांवरची जबाबदारी कमी होत नाहीं. परिषदेला येणारी मंडळी चांगली शहाणीसुरती, शिकलेसवरलेली आणि समंजस अशी असते. ही मंडळी परिषद् भरली म्हणजे पुढची

परिषद् येईपर्यंत आपापल्या गांवीं स्वस्थ असते. परिषदेंत पास होणारे, ठराव ही मंडळी आपापल्या गांवीं गेल्यानंतर अंमलांत आणण्याचा प्रयत्न करील तर, **मराठा-परिषदे**पुढें दरसाल तेच ते ठराव पुन्हा पुन्हा आणण्याची जरूर राहणार नाहीं. ज्या समाजांत शिवाजीमहाराजां-सारखे स्वराज्यसंस्थापक निघाले, ज्या समाजांत महादजी-दत्ताजी शिंद्यांसारखे महापराक्रमी वीर निघाले, ज्या समाजांत संताजी-धनाजी-तानाजीसारखे धाडशी स्वामिभक्त निघाले व ज्या समाजांत श्री. सयाजीराव महाराजांसारखे राजकार्यधुरंधर मुत्सद्दी अद्याप निर्माण होत आहेत, त्या मराठासमाजांत स्वत्त्व नाहीं, त्याच्यांत कर्तृत्वशक्ति नाहीं, असें कसें म्हणतां येईल? मुसलमान व रजपूत लोकांच्या शिक्षण-विषयक चळवळींसंबंधानें एक गोष्ट विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. आणि ती ही कीं, त्या जातींतील राजेमहाराजे आपआपल्या समाजाच्या शिक्षणविषयक चळवळींविषयीं केवळ शाब्दिक सहानु-भूति न दाखवितां, त्यांच्या चळवळींत प्रत्यक्ष पुढाकार घेऊन, आपल्या थोरपणाचा व ज्ञानाचा लाभ आपल्या ज्ञातीबंधूंस देतात. आणि म्हणूनच त्यांचे लाखों रुपयांचे फंड हां हां म्हणतां जमतात. मराठा संस्थानिकांकडून व धनिकांकडून मराठ्यांची शिक्षण-विषयक, औद्योगिक व सामाजिक प्रगति घडवून आणण्यास यापुढें जास्त दिलदारपणानें मदत होऊं लागेल, अशी आशा आहे. मुसलमान व रजपूतबंधूंनीं आपापल्या उन्नतीप्रीत्यर्थ चालविलेल्या प्रयत्नांचीं सुंदर चित्रें आपल्या डोळ्यांपुढें ठेवून आमच्या

पुढाऱ्यांनीं जनरल फंड गोळा करण्याच्या उद्योगास लवकरच लागावें, आणि या फंडास आमच्यांतल्या बृहस्पतितुल्य राजेमहाराजांनीं आणि धनिक लोकांनीं उदार अंतःकरणानें व सढळ हातानें मदत करावी, अशी त्यांस नम्र विनंति आहे.

## ११.—श्रीशिवाजीमहाराजांची थोरवी.

[ **मराठामित्र**–एप्रील, १९१०. ]

**जगांतील सर्व दंतकथा, योजना व मनुष्यनिर्मित समाजव्यवस्था रसातळास गेल्या, तरी एक गोष्ट चिरकाल व आबाधित अशीच राहणार. ती ही कीं, आपल्यामध्यें विभूति जन्म पावणार, व विभूतिपूजेची मानवी मनोवृत्ति व आवश्यकता हींच चिरकाल राहणार. —कार्लाइल.—**

गुणविभूषित पुरुषांना मान देण्याची चाल पृथ्वीतलावर सदासर्वदा अव्याहत चालली आहे. एखाद्या गुणांत थोडेंसें वर्चस्व मिळविलेल्या लोकांबद्दल जर आपल्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न होते, तर ज्या पुरुषांनीं आपल्या अक्कलहुषारीनें किंवा मर्दुमकीनें समाजाचें, राष्ट्राचें किंवा प्राणिमात्रांचें हित साधून दिलें, अशा व्यक्तींबद्दल आपल्या मनांत प्रेमाचें केवढें भरतें आलें पाहिजे, याची कल्पना ज्यानें

त्यानें आपापल्या मनाशींच करावी. विभूतिपूजेची आवश्यकता समजण्यापूर्वी अवतारी पुरुषांचें एकंदर जगाच्या उलाढालींत केवढें महत्त्व असतें, हें समजणें जरूर आहे. कार्लाइलनें इतिहासापेक्षां अवतारी पुरुषांच्या चरित्रालाच ज्यास्त मान दिला आहे. कारण, प्रत्येक देशांत ईश्वरीइच्छेनें अवतारी पुरुष निर्माण होतात, व प्रत्येक देशांत अशा सत्पुरुषांची लोक नेहेमीं पूजा करितात. सत्पुरुषांच्या आगमनानें इतिहासाला योग्य वळण लागतें व सत्पुरुषांच्या पूजनानें लोकांत सद्वृत्ति जागृत राहून नीतिमत्तेचा अम्मल चिरस्थायी होतो. अवतारी सत्पुरुषांच्या कृतीनें जगाच्या घडामोडींत एवढे फरक झालेले असतात कीं, त्यांच्या पराक्रमांच्या वर्णनास व त्यांनीं घडवून आणलेल्या सृष्टचन्तराचें साद्यन्त वर्णन करण्यास ऐतिहासिक ग्रंथकारांस पर्वेंच्यापर्वें अर्पण करावीं लागतात. ज्या देशांतील लोकांना पूर्वेतिहासाचा अभिमान वाटत नाहीं, ज्यांना पूर्वेतिहासाच्या श्रवणानें किंवा वाचनानें स्फूर्ति होत नाहीं, पूर्वजांच्या कर्तृत्वाबद्दल जेथें लोकांना आदर नाहीं, असा देश महत्पदाला कधींही पावणार नाहीं, हा इतिहासाचा सिद्धान्त आहे. पूर्वजांबद्दल आदर आणि अभिमान हें राष्ट्रीयत्वाचें प्रधान अंग आहे, आणि म्हणूनच, देशांत निर्माण झालेल्या अवतारी विभूति, एकंदर राष्ट्रास ललामभूत होत. खरोखर पाहूं गेलें तर, जगाचा इतिहास म्हणजे अवतारी पुरुषांनीं पृथ्वीच्या पाठीवर लीलेनें केलेल्या क्रीडांचें वर्णन होय. असा कोणता देश आहे, कीं, जेथें सत्पुरुष निर्माण झाले नाहींत, किंवा जेथें सत्पुरुषांची

आठवण लोक करीत नाहींत ? जसे जर्मनींत लूथर किंवा प्रिन्स बिस्मार्क उत्पन्न होऊन लोकांस प्रिय व पूज्य झाले, इंग्लंडांत पिट किंवा हॅंपडेन अगर ड्यूक ऑफ वेलिंगटन, फ्रान्सांत जोन ऑफ आर्क किंवा व्हॉल्टेअर, स्कॉटलंडांत वॉलेस, रशियांत पीटर धि ग्रेट, अमेरिकेंत वॉशिंग्टन, त्याचप्रमाणें आपल्या महाराष्ट्रांत **श्रीशिवाजी-महाराज** उत्पन्न होऊन, ते आपल्या सत्कृतीनें आणि सदाचरणानें प्रत्येक महाराष्ट्रीयास–प्रत्येक हिंद्वासीयास–प्रिय व पूज्य झाले आहेत. विभूतींवांचून राष्ट्राचा इतिहास कधींही बनावयाचा नाहीं, आणि विभूतींच्या पूजनाशिवाय राष्ट्रास कधींही सच्छील मिळावयाचें नाहीं. आणि ह्मणूनच प्रस्तुत लेखाच्या शिरोभागीं कार्लाइलनें ह्मटल्या-प्रमाणें मनुष्यानें केलेल्या समाजव्यवस्था ढांसळतील. पण, परमे-श्वराचा हा नियम ढांसळणार नाहीं. परमेश्वराच्या कृपेनें प्रत्येक प्रगमनशील समाजांत परमेश्वराचे अंश अवतीर्ण झालेच पाहिजेत, व प्रत्येक प्रगमनशील समाजांत अशा पुरुषांविषयीं प्रेम, आदर व पूज्यभाव सदोदित जागृत असलाच पाहिजे.

२. शिवाजीमहाराज परमेश्वराचे अंश ही पदवी मिळविण्यास किती योग्य होते, याचा विचार प्रस्तुत निबंधांत करावयाचा आहे. शिवाजीमहाराज परिस्थितीनें तयार झाले, असें कित्येकांचें ह्मणणें आहे. परंतु तें चुकीचें आहे. शिवाजीमहाराज परिस्थितीनें तयार झाले नव्हते. ते ईश्वरनिर्मितच होते. ते एक दैविक विभूति होते. कोणतींही कार्यकर्तीं माणसें किंवा राष्ट्रीय विभूति ज्या निर्माण

होतात, त्या परिस्थितीच्या योगानें तयार होत नसून, ईश्वरी संकेतानें, परमेश्वराच्या कृपेनें किंवा दैविक अंशानें उत्पन्न होतात. कोणत्याही राष्ट्रकार्यास किंवा कार्यकर्त्यास जी कांहीं अलौकिक गुणमालिका असते किंवा लागते, ती परिस्थितीच्या योगानें किंवा तो ज्या कष्टमय किंवा सुखमय परिस्थितींत असेल तिच्या योगानें उत्पन्न होत नसून, दैवी चमत्कारानें किंवा परमेश्वराच्या कृपावत्सलत्वाच्या योगानें उत्पन्न व्हावी लागते. पहा! नेपोलियनसारखा प्रतापी, समरांगणांतील आचार्य, केवळ परिस्थितीनें तयार केलेला नसून, तो ईश्वराचे कृपेनें अवतीर्ण झालेला होता. नेपोलियनसारखा वीर तयार होण्यास योग्य अशी परिस्थिति पूर्वीं कधींच आली नव्हती काय? बेकनसारखा आंग्ल वाङ्मयाच्या योगानें सबंध राष्ट्र हालवून सोडणारा दुसरा कोणीही विद्वान् त्यापूर्वीं जन्मला नव्हता काय? पुष्कळ झाले; परंतु, त्यांच्या अंगीं दैविकत्व नव्हतें. ते परिस्थितीनें तयार होण्याजोगे असते, तर कितीतरी बेकन तयार झाले असते. पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते, ही गोष्ट कोपर्निकस सिद्ध करीपर्यंत पृथ्वी फिरत नव्हती काय? त्यावेळीं कोपर्निकसाच्या इतकें ज्ञान किती तरी जणांस असेल. परंतु त्यांच्या अंगीं दैविकपणा नसल्यामुळें, त्यांस ती गोष्ट सिद्ध करितां येईना. व केली असती तरी त्यांचें कोणीं ऐकलें नसतें. त्याप्रमाणेंच शिवरायांची गोष्ट आहे. शिवराय महाराष्ट्रांत उत्पन्न होण्याचें कारण, शिवरायांच्या अंगची दैविक शक्ति, याशिवाय दुसरें कांहींएक नाहीं.

महाराष्ट्रांत शिवराय उत्पन्न होण्यास, ते उत्पन्न झाले त्या वेळे-सारखी कष्टमय, अनुकंपनीय व पूर्वपीठिकेच्या प्रभावाची अशी स्थिति पूर्वी कधीं आली नव्हती काय? मुसलमान, पठाण यांसारख्या निर्घृण लोकांनीं महाराष्ट्रीयांस, त्यांच्या धर्मास, परमपवित्र गाईंना व त्यांच्या पवित्रतेच्या केवळ खाणी अशा युवतीजनांस कधींच छळिलें नाहीं काय? तेव्हां पूर्वपीठिका हें राष्ट्रविभूति तयार करण्याचें साधन नसून, तें फक्त ईश्वरीकृपेवर व नेमानेमावरच अवलंबून आहे. बरें, पूर्वपीठिका हेंच कारण असें गृहीत धरलें तर, ज्या वेळीं शिवराय जन्मले, त्यावेळेसारखी परिस्थिति हिंदुस्थानच्या इतर भागांत नव्हती काय? नर्मदेखालच्या प्रदेशांत, दक्षिणेंतील मुसल-मानी राज्यें, विजापूर, गोवळकोंडेकर यांसारख्या हिंदु दिसला कीं, 'खा खा करणाऱ्या' मुसलमानांनीं त्यांना गांजलें नाहीं काय? उत्तरहिंदुस्थानांत व बंगाल्यांत मुसलमानी धर्माचा कडवा चेला औरंगजेब यानें हिंदूंचा थोडा कां छळ केला? रजपुतांसारख्या मानी स्त्रियांची मुसलमानांनीं थोडी राळ उडविली काय? किती तरी रजपूत स्त्रियांनीं आपल्या पातिव्रत्यसंरक्षणाकरितां व धर्मा-करितां जोहार केले, हें इतिहास आपणांस सांगत नाहीं काय? मग शिवराय महाराष्ट्रांतच कां निर्माण झाले? देशाच्या इतर भागांत कां झाले नाहींत? या सर्व प्रश्नांचें उत्तर एकच आहे. आणि तें हें कीं, **शिवरायांसारख्या राष्ट्रीय विभूति परमेश्वर निर्मित असून, त्या परमेश्वराचे कृपेनें त्या त्या कालाच्या परिस्थितीच्या रंग-भूमीवर येतात.**

३. शिवाजीमहाराजांच्या चरित्रांतील कांहीं ठळक गोष्टी सांगून ते परमेश्वराचा अंश होते, या माझ्या विधानाची सत्यता वाचकांपुढें मांडण्याचा मी विशेष प्रयत्न करणार आहें. शिवाजीमहाराजांचें चरित्र ह्मणजे नीतिसिद्धान्ताच्या प्रत्यक्ष अनुभवांतील वस्तुपाठच होत. शिवाजीमहाराजांनीं महारष्ट्रास स्वातंत्र्य दिलें, हा भाग निराळा ठेविला, तरी सुद्धां, त्यांचें चरित्र किती तरी उदात्त आहे ! मनुष्यानें कुटुंबांत, समाजांत, राज्यांत कसें वागावें, यांविषयीं धडा देण्यासारखें चरित्र शिवाजीमहाराजांनीं केलें. महाराजांनीं लहानपणापासून महाभारताचें तृषिताप्रमाणें पान केलें होतें, आणि त्यावरून महाभारतानें ज्या पवित्र धर्माज्ञा सांगितल्या होत्या, त्याप्रमाणें त्यांनीं आमरण आचरण ठेविलें. मातृदेवोभव, पितृदेवोभव, आचार्यदेवोभव, अतिथिदेवोभव इत्यादि शिक्षाध्यायांतील आचरणाच्या नियमांप्रमाणें त्यांचें आचरण असे. शिवाजीमहाराजांची मातृभक्ति विलक्षण होती. सुदैवानें जिजाबाईसारखी पूज्य, सद्गुणी, निस्पृही आणि करारी माता महाराजांना लाधली होती. तिची निःस्सीम भक्ति महाराजांनीं केवळ देवासारखी केली. आईच्या आज्ञेशिवाय एकही गोष्ट त्यांनीं कधीं केली नाहीं. तिला सर्वदा संतुष्ट देवण्याचा त्यांनीं आमरणान्त प्रयत्न केला. अगदीं लहान असतां ते जसे मातेच्या आज्ञेंत वागले, तसेच राज्यपदाभिरूढ झाल्यानंतरही वागले. शहाजी व जिजाबाई यांच्यामधील बेबनाव व त्यांच्या लग्नाची, बेबनावाची व महाराजांच्या जन्माची विलक्षण आणि हृदयंगम हकी-

कत मनांत आणून अनुवंशिक संस्काराच्या प्राबल्याचा विचार केला तर, शिवाजीसारखा सुपुत्र जिजाबाईच्या पोटीं आला, याचें आश्चर्य वाटत नाहीं. श्रीशिवाजीमहाराजांचें आपल्या मातेवरील प्रेम व जिजाबाईचें आपल्यावर प्रेम न करणाऱ्या पतीसंबंधाचें आचरण लक्ष्यांत आणलें ह्मणजे, रामचंद्र-कौसल्येची आठवण झाल्यावांचून राहत नाहीं. कौसल्येसही पतीचा आधार कमीच होता. ती केवळ रामाच्या आधारावर जगली होती. तथापि कौसल्येनेंही दशरथासंबंधाचें आपलें कर्त्तव्य सोडिलें नाहीं. आपला बाप आपल्या आईच्या अव्हेर करितो, ही गोष्ट मनांत आणून रामाचें मन दशरथासंबंधानें कधीं दूषित झालें नाहीं. त्याचप्रमाणें जिजाबाईचा जरी शहाजीनें अव्हेर केला होता, तरी शिवाजीमहाराजांचें मन आपल्या पित्यासंबंधानें कधींही दूषित झालें नाहीं. शिवाजीमहाराजांनीं राज्यस्थापना केल्या-नंतर कर्नाटकांतून शहाजीराजे त्यांस भेटण्याकरितां आले, त्या वेळीं व विजापूरकरानें शहाजीराजांस कैदेंत टाकल्यानंतर उभय पितापुत्रांची ज्या वेळीं गांठ पडली, त्या दोन्ही प्रसंगीं शिवाजीमहाराजांनीं जें पितृप्रेम व जो पित्रादर दाखविला, तो खरोखरच अनुकरणीय, स्पृहणीय व वंदनीय आहे. महाराजांच्या ठायीं असलेली ही निःस्सीम पितृप्रेमाची हकीकत मनांत आली ह्मणजे अंतःकरण सद्गदित होऊन क्षणैक मनाच्या वृत्ति होतात ! शिवाजीमहाराजांच्या धामधुमीमुळें विजापूरकरांनीं शहाजीराजांस कैद करून, हालहाल करण्यास सुरुवात केली, त्या वेळेस शिवाजीमहाराजांस किती वाईट वाटलें, त्याचें वर्णन

बखरींत स्पष्ट वर्णिलें आहे. शहाजीकरितां आपला जीव धोक्यांत घालण्यास–किंबहुना आपल्या आयुष्यांतील उदात्त ध्येयांवर कृत-संकल्प सोडण्यास ते तयार झाले होते; परंतु केवळ आपल्या आईच्या, बायकोच्या व मुत्सद्यांच्या विनवण्यांमुळें त्या वेळेस त्यांनीं तसें केलें नाहीं. यावरून महाराजांची पितृभक्ति, मातृभक्तीप्रमाणेंच अवर्णनीय होती, ही गोष्ट आणखी विशेष स्पष्ट करून सांगावयास पाहिजे असें नाहीं.

४. शिवाजीमहाराजांच्या अंगीं जे अनेक लोकोत्तर गुण होते, त्यांत पुढें सांगितलेला सद्गुण अत्यंत महत्वाचा व दुर्मिळ असा होता. स्वस्त्रीवर प्रीति करून परस्त्रीस मातेसमान मानणें हा संसारांतील अति पवित्र व अत्युच्च असा नियम आहे. अनेक देशांतील अनेक विभूतींची चित्रें पाहिलीं तर, या कसोटीस किती लोक उतरतील ? इतर देशांतील लोकांची गोष्ट कशास पाहिजे ? खुद्द मराठ्यांचाच इतिहास घ्या. शिवाजीमहाराजांसारखें एकपत्नीव्रताचें आचरण कितीकांनीं पाळिलें ? एकानेंही नाहीं. शिवाजीसारखें उदाहरण शिवाजीचेंच. त्यांची बरोबरी कोणासही करतां यावयाची नाहीं. कल्याणच्या सुभ्याला जिंकल्यानंतर आबाजी सोनदेवानें एक सुस्वरूप आणि तरुण स्त्री महाराजांस नजर म्हणून आणिली. त्यावेळीं, आबाजी सोनदेवाची महाराजांनीं जी कानउघाडणी केली व दरबारांत त्या स्त्रीस उद्देशून जें भाषण केलें, तें मननीय आहे. शेवटीं महाराजांनीं त्या स्त्रीस चोळी–लुगडें देऊन मोठ्या सन्मानानें तिला

पोहोंचतें केलें. महाराजांच्या अंगचा हा सद्गुण मनांत आणिला असतां, त्यांची विभूतिवर्गांत फार उच्च कोटींत गणना केली पाहिजे. आणि म्हणून तत्कालीन नव्हे तर, **त्रिकालीन सत्पुरुषांमध्यें शिवाजी-महाराजांस फारच उच्चस्थान दिल्याशिवाय राहवत नाहीं.**

५. शिवाजीमहाराजांची बंधूप्रीतीही वाखाणण्यासारखी होती. व्यंकोजी हा महाराजांचा सावत्र बंधु होता. त्याचे ठायीं शहाजीचें शहाणपण नव्हतें. त्यामुळें, जहागिरीची धूळधाण होण्याची वेळ आली. म्हणून महाराजांना कर्नाटकाचा बंदोबस्त करावा लागला. त्यांच्याशीं व्यंकोजी लढण्यास उभा राहिला. औरंगजेबानें दुर्धर महत्त्वाकांक्षेच्या नादीं लागून आपल्या बंधूंची कशी वाट लाविली, व इतर शेंकडों राजघराण्यांच्या इतिहासांत आपणांस काय दृष्टीस पडतें त्याचा विचार केला, ह्मणजे या प्रसंगीं शिवाजीमहाराजांचें व्यंकोजीशीं झालेलें वर्तन किती तरी उदात्त दिसतें. व्यंकोजीस सर्व गुन्हे माफ करून, त्यांनीं त्याला पुनः जहागिरीवर कायम केलें. व्यंकोजीचे अपराध क्षम्य कोटींतले नसून ते महाराजांनीं माफ केले. संभाजीचा अपराध अक्षम्य होता. वात्सल्यप्रेम बाजूस सारून महाराजांनीं त्यास शासन केलें, यावरून त्यांच्या निःपक्षपातीपणाची परीक्षा होते. शिवाजीमहाराजांस असा पुत्र व्हावा, हा दुर्भाग्याचाच योग. पण त्यांनीं आपली सद्बुद्धि व न्यायदृष्टि पुत्राकरितां ढळूं दिली नाहीं.

६. असे एक ना दोन, अनेक सद्गुण शिवाजीमहाराजांच्या

ठायीं होते. ते केवळ सर्व सद्गुणांचे मूर्तिमंत पुतळे होते; आणि त्यांवरून ते अलौकिक सत्पुरुष आहेत, अशी लोकांची समजूत झाली, तीबद्दल आश्चर्य वाटत नाहीं. त्यांचा पराक्रम, त्यांचें धाडस, त्यांची स्वातंत्र्यप्रीति, त्यांची स्वधर्माविषयीं निष्ठा, त्यांची स्वदेशाविषयीं भक्ति इत्यादि गुणांमुळें त्यांस लोक परमेश्वराचेच अंश मानूं लागले, यांत नवल नाहीं. सर्व सृष्टि-सर्व प्राणी-परमेश्वराचेच अंश आहेत, हें खरें. पण, त्यांतल्या त्यात, ज्या व्यक्तीच्या ठिकाणीं अलौकिक नीतिमत्ता व अद्वितीय सामर्थ्य असतें, ती व्यक्ति परमेश्वराचा उद्भुत व प्रकट अंश आहे, असें मानलें पाहिजे. शिवाजीमहाराजांचें शौर्य, त्यांची बुद्धिमत्ता व स्वधर्मनिष्ठा यांजविषयीं कोणाचाही मतभेद असणें मुळीं शक्यच नाहीं. शिपाईगिरींत त्यांची बुद्धिमत्ता इतकी अव्वल दर्जाची होती कीं, पूर्वेकडील शूर पुरुषांत त्यांचा सर्वांत वरचा दर्जा आहे. गेल्या दोन हजार वर्षांत या भारतभूवर स्वकीय आणि परकीय लोकांनीं पुष्कळ पराक्रम केले; परंतु, महाराजांची सर कोणासही करतां यावयाची नाहीं. त्यांच्या शिपाईगिरीपासून व अवतारापासून महाराष्ट्रावर किती उपकार झाले आहेत, त्याचा विचार करूं लागलें ह्मणजे अनंत विचार मनांत येऊन मन अगदीं भांबावून जातें ! फार काय सांगावें, महाराजांचा अवतार झाला नसता तर, बाजीराव पेशव्यांस मराठ्यांचा विजयध्वज दिल्लीच्या तटापुढें फडकावितां आला नसता व आज हिंदुस्थानांत देशी संस्थानें दृष्टोत्पत्तीस आलीं नसतीं. मराठा

हें नांव कांहीं काळपर्यंत तरी सार्वभौमत्वाचें उपनांव होऊन बसलें होतें, तें झालें नसतें, व उत्तरहिंदुस्थानांत **मऱ्हेठा** या कर्णकठोर नांवाचा दरारा बसला नसता, आणि कृष्णानदीचे घोडे अटकेचें पाणी प्याले नसते. सारांश, एकट्या शिवाजीमहाराजांच्या प्रभावानें महाराष्ट्रांतील यच्चयावत् सर्व लोकांत अभिमानास्पद असें उच्चपदाभिरूढत्व प्राप्त झालें. शिवाजीमहाराजांचें देहावसान झालें, त्यावेळीं त्यांचेसंबंधानें औरंगजेबानें काढलेले उद्गार महत्त्वाचे आहेत. " शिवाजी एक मोठा योद्धा होता व राज्यसंस्थापनेचें उदात्त काम त्यानें एकट्यानेंच सिद्धीस नेलें. माझें सैन्य १९ वर्षें त्याच्याशीं लढत आहे. तरीही त्याचें राज्य वाढतच जात आहे. " औरंगजेबाचे हे उद्गार ऐकून **यतो धर्मस्ततो जयः** या महाभारताच्या वाक्याची आठवण झाल्यावांचून राहत नाहीं.

७. शिवाजीमहाराजांच्या थोरवीचें यथाशक्ति चित्र मी वाचकांपुढें ठेविलें आहे. त्यावरून महाराज खरोखर परमेश्वराचा अंशभूत अवतार होते, ही गोष्ट सिद्ध होत आहे. अखलासखान शत्रु असून लढाईंत पकडला असतां महाराजांनीं त्यास त्याच्या छावणींत पोहोंचतें केलें, या गोष्टीवरून त्यांचें औदार्य दिसून येतें. औरंगजेबाच्या दरबारांत त्यांचा अपमान झाला असतांही, तो त्यांनीं शांतपणें सहन करून घेतला, यावरून त्यांचा सोशिकपणा दिसून येतो. दिल्लीहून परत आल्यानंतर महाराष्ट्रांतील स्वतःच्या ताब्यांतील सर्व मुलुख मुसलमानांनीं जिंकिला होता, तरी तो अविश्रांत परिश्रम करून

थोड्या अवधींत त्यांनीं परत मिळविला, यावरून त्यांची उद्योगनिष्ठा दिसते; आणि आपल्या स्वतःच्या सुखाकडे यत्किंचित्‌ही दृष्टि न देतां, आपल्या प्रजेच्या हिताकरितां त्यांनीं कायावाचामनेंकरून जे लोकोत्तर उद्योग केले, त्यांवरून स्वकर्त्तव्यकर्माविषयींची त्यांची पराकाष्ठेची आस्था दिसते. हे अनुपमेय आणि अवर्णनीय गुण महाराजांच्या ठायीं होते. अशा प्रकारचें उदात्त चरित्र हिंदुस्थानच्या—नव्हे जगाच्या इतिहासांतही दुर्मिळ आहे. किंबहुना सर्व हिंदुस्थानचा इतिहास डोळ्यांसमोर ठेविला तर, अलौकिक बुद्धिमत्ता व अद्वितीय पराक्रम यांची सांगड श्रीरामचंद्राच्या तोडीनें शिवाजीमहाराजांतच दिसते. त्यांचें चरित्र फार उदात्त आहे. अतएव तें रामचरित्राप्रमाणें पूज्य, रम्य व पवित्र आहे. रामाचें चरित्र वाल्मिकीसारख्या उत्कृष्ट कवीनें व अद्वितीय लेखकानें रामायणाच्या रूपानें लिहून ठेविलें आहे, व तें प्रेमळ अशा भाविकजनांना धर्माचा केवळ आदर्शरूप होऊन राहिलें आहे. रामासारखा प्रति राम - शिवाजी—निर्माण झाला. परंतु त्याचें रामायणासारखें विस्तृत चरित्र लिहून ठेवणारा प्रति वाल्मिकी निर्माण झाला नाहीं! रा. कृ. अ. केळुसकर यांनीं शिवरायांचें शक्य तितकें विस्तृत चरित्र लिहून ही उणीव अंशतः भरून काढिली आहे, ही समाधानाची गोष्ट होय. येत्या वैशाख शुद्ध द्वितीयेस शिवाजीमहाराजांच्या जन्मदिवसानिमित महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं उत्सव होतीलच. महाराजांसारख्या राष्ट्रीय थोर पुरुषांचे उत्सव करतांना प्रायः दोन हेतु लक्ष्यांत ठेवावेत. ह्या महात्म्यांनीं केलेल्या

देशसेवेबद्दल कृतज्ञतापूर्वक आपली उपकारबुद्धि व्यक्त करावी, आणि त्यांचें उदाहरण राष्ट्रापुढें मांडून त्यांच्या अंगीं असलेल्या अमोल गुणांचें नव्या पिढींत बीजारोपण करावें. हे दोन्ही हेतु फार महत्त्वाचे आहेत. शिवरायांच्या उदात्त व परमपवित्र अशा चरित्रांतील रम्य स्थळें मी आपणांपुढें मांडिलीं आहेत. त्यांवरून शिवाजीमहाराजांची थोरवी किती होती, तिची कल्पना करतां येईल. शेवटीं, त्या पुण्य-पुरुषाच्या आत्म्याला प्रमाण करून हा लहानसा निबंध पुरा करितों.

## १२.—आमचें स्थित्यंतर आणि आमचें कर्तव्य.

[ मराठामित्र—जून, १९११. ].

हिंदुस्थानांत ब्रिटिश सरकारचें राज्य स्थापन झाल्यामुळें, हिंदुस्थान हें पौर्वात्य आणि पाश्चात्य देशांतल्या सध्यांच्या विद्याचार-संपन्न राष्ट्रांच्या मालिकेंत गोंविलें गेलें आहे. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, पाश्चात्य राष्ट्रांत—आणि त्यांतही इंग्लंडांत ज्या कांहीं बऱ्या वाईट गोष्टी अलीकडे झाल्या आहेत किंवा होत आहेत, त्यांची लाट अगदीं साहजिक रीतीनें हिंदुस्थानावर येऊन आदळत आहे. त्यापासून हिंदुस्थानाला कांहीं फायदा होत आहे, तसें नुकसानही होत आहे. जें चांगलें आहे, त्याबद्दल इंग्लंडचे

आम्हीं उपकार मानतों. तथापि, जें वाईट होत आहे, तें पाहून मनास दुःख झाल्यावांचून राहत नाहीं. हिंदुस्थानांतील वस्तुस्थिती-कडे पाहिल्यास, आधुनिक सुधारणेचे इष्ट तसे अनिष्टही परिणाम झाले आहेत. रसायनशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, मानसशास्त्र वगैरे शास्त्रसमुच्चय, आणि आगगाड्या, तारायंत्रें, वाफेचीं यंत्रें, गिरण्या, छापखाने वगैरे दिक्कालदिग्विजयी शोधकृतींचा प्रभाव व यंत्रसाध-नांची समृद्धि, इत्यादि आधुनिक सुधारणेचें बहिरंग सुशोभित कर णाऱ्या भूषणांच्या, आणि टपाल, सडका, आगगाड्या, वर्तमानपत्रें, उच्चप्रतीचें शिक्षण, चहा कॉफीचें वाढतें व्यसन, मद्यपानाचा प्रसार, इत्यादि सगळ्या विषयाच्या लाटा येऊन आमच्या हिंदुस्थानावर आदळल्या आहेत. त्यांपासून हिंदुस्थानच्या एकंदर परिस्थितींत गेल्या पन्नास पाऊणशें वर्षांत फारच मोठें अंतर पडलें आहे. इतकेंच नव्हे तर, त्याचा परिणाम पुढें काय होईल, याची कल्पना देखील बरोबर करतां यावयाची नाहीं, अशी भीति वाटूं लागली आहे. इंग्लंडच्या सहवासानें पाश्चात्य सुधारणांच्या ह्या ज्या वर सांगितलेल्या लाटा आमच्यावर येऊन आदळल्या आहेत म्हणून म्हटलें आहे, त्यांतल्या कितीएकांचे परिणाम सध्यां वेगळ्या वेगळ्या पिढ्यांच्या माणसांवर वेगळ्या वेगळ्या प्रमाणानें होत आहेत, ते कसे, हें जरा विशेष स्पष्ट करून सांगितलें पाहिजे.

२. आगगाड्या, तारायंत्रें, गिरण्या, डांक इत्यादि ज्या कांहीं लाटा आहेत, त्या बहुतेक खेड्यापाड्यांपर्यंत पोहोंचल्या आहेत, आणि

त्यांचे परिणाम आजा, बाप आणि मुलगा ह्या तिघांवरही बहुतेक एकसारखे झाले आहेत. कांकीं, कारणपरत्वें त्यांस त्यांचा उपयोग बहुतेक एकसारखाच होतो. आजोबांचीं पत्रें डांकेंतून जातात येतात, तशीं बापाचीं जातात येतात, आणि मुलाचींही जातात येतात. आगगाड्यांचा उपयोग सगळ्यांस सारखा होतो. गिरण्यांतलें कापड वापरणें, गिरणींत व इतर कारखान्यांत जाऊन काम करून पैसा मिळविणें, वर्तमानपत्रें वाचणें, हींही बहुतेक एकसारखींच त्यांच्या उपयोगीं पडतात. परंतु, उच्चप्रतीच्या शिक्षणाची लाट आजोबांच्या दृष्टीस देखील पडली नव्हती; बापाच्या जवळ जवळ मात्र आली होती; आणि मुलाला तींत प्रत्यहीं स्नान करितां येत आहे. तो तींत पोहत आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. शिक्षणानें मनुष्याचें मन तयार होत असून, मन हेंच मनुष्य आहे, असें जें माझ्या एका विद्वान् मित्रांनीं एके प्रसंगीं ह्मटलें होतें, तें अक्षरशः खरें आहे. त्याविषयीं कोणाचाही मतभेद होणें शक्य नाहीं. तेव्हां, शिक्षणग्रहाच्या ह्या भेदानुरूप आजा, बाप आणि मुलगा हे पुरुष अगदीं वेगळ्या प्रकारचे व्हावेत, ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. ते वेगवेगळ्या प्रकारचे झालेच पाहिजेत.

३. पहा ! आजोबा लाटसाहेबाचें नुसतें नांव ऐकल्याबरोबर थरथरां कांपत असत, त्यांचे नातू आतां लाटसाहेबांच्या बोलण्यांत चुका काढण्यास भीत नाहींत. जे आजोबा आपल्या खतांपत्रांवर तुळशीचीं पानें आणि वडाची साल घालीत होते, त्यांचे नातू

आतां उघडपणें देव मुळींच नाहीं, सगळें थोतांड आहे, असें ह्मणतात. जे आजोबा ह्मणत होते कीं, राजानें लुटलें आणि पावसानें भिजविलें, फिर्याद कोणाकडे न्यावी ? त्यांचे नातू आतां सरकारास म्हणतात कीं, तुह्मी कराच्या रूपानें जो पैसा घेतां, त्याचा हिशेब तुह्मी आम्हांस दिला पाहिजे. ज्या आजोबांस आपल्या नातोंडांसमक्ष आपल्या पत्नीशीं बोलावयास संकोच वाटत असे, त्यांचे नातू आतां आजोबांसमक्ष आपल्या पत्नीशीं गोड गोड भाषणें करण्यास लाजत नाहींत. जे आजोबा, पंतोजी आला असें म्हटलें कीं, हातांतला चेंडू टाकून पळून जात असत, त्यांचे नातू आतां आपल्या गुरुजींशींच प्रहरान्प्रहर खेळतात. ज्या आजोबांस ' मद्य ' कानीं पडलें कीं ' विष्णवेनमः ' म्हणावेसें वाटत असे, त्यांचे नातू आतां चार चौघांसमक्ष खुशाल मद्यपान करितात; इतकेंच नव्हे तर, त्यांत मोठें भूषण मानतात. जे आजोबा आपल्या वडिलांसमोर उभे देखील राहत नसत, अतिशय मर्यादा ठेवीत असत, त्यांचे नातू आतां त्यांना उलट्या गोष्टी सांगतात. असे एकना दोन अनेक फेरफार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष झाले आहेत, सध्यां चालले आहेत, आणि दररोज व्यवहारांत आपल्या दृष्टीस पडत आहेत. त्यामुळें झालें आहे काय कीं, आजोबाचा मार्ग एक, बापाचा मार्ग दुसरा आणि मुलाचा मार्ग तिसरा, अशी त्रिस्थळी झाली आहे. आजोबाला राष्ट्रीयसभा आणि सामाजिक परिषद् हीं दोन्हीही नकोत. बापाला राष्ट्रीय सभा तेवढी पाहिजे आहे; आणि मुलाला ह्या दोन्ही सभा पाहिजे आहेत. इतका फरक तीन पिढ्यांत पडला आहे.

४. कालचक्राच्या अतर्क्य प्रभावामुळें, चांगलें आणि वाईट ह्यांचें मान कितीएक व्यवहारांत फिरत असतें, आणि ह्या न्यायानें कांहीं बाबतींत गेल्या पन्नास वर्षांत श्रेयस्कर सुधारणा झाल्या आहेत. स्त्रीशिक्षण, अंत्यजोद्धार, पुनर्विवाह, परदेशगमन, पोटजातींत शरीर-संबंध होणें, इत्यादि बाबती पूर्वींच्या काळीं लोकांना अग्राह्य वाटत असत. पण त्या आतां चांगल्या वाटूं लागल्या आहेत. पुनर्विवाहाला विषाप्रमाणें समजणाऱ्या आजोबांचे नातू आतां स्वतः पुनर्विवाह करूं लागले आहेत व जनसमाजाकडून त्यांचें उघड उघड अभिनंदन होत आहे, स्त्रीशिक्षणाचें पाऊल हळूहळू पुढें पडतच आहे, अंत्यजो-द्धाराविषयींच्या प्रश्नाकडे उच्चवर्णीयांचें लक्ष्य लागत चाललें आहे, प्रौढविवाहाची चाल दिवसेंदिवस रूढ होत चालली आहे, परदेशगमनाला आतां फारसा-किंबहुना मुळींच-विरोध राहिला नाहीं, आणि कित्येक पोटजातींत शरीरसंबंध घडूं लागले आहेत. इत्यादि अभिनंदनीय सुधारणा होऊं लागल्या आहेत. हा सारा पाश्चात्य शिक्षणाचा प्रभाव आहे. सारांश, ज्या सुधारणा राष्ट्राच्या भावी उत्कर्षास साहाय्यभूत होणाऱ्या आहेत, त्यांच्यासंबंधानें जुन्या-नव्यांनीं हट्टास न पेटणें आणि आपलेंच धरून न बसतां कांहीं साळ-ढाळ करून उभयपक्षांचें जमे असें करावें, हाच अत्युत्तम मार्ग होय. व्यवहार निर्दोष असला, सुधारणा श्रेयस्कर असल्या, म्हणजे जुन्यांनीं मौन धरावें, हा राष्ट्रोन्नतीचा राजमान्य मार्ग होय. नामांकित देशहितकर्ते **कै० न्या० रानडे** आणि **कै० न्या० तेलंग** ह्यांचें असेंच म्हणणें होतें, आणि ते स्वतःही आमरण तसेच वागले.

९. आगगाड्या, तारायंत्रें, टपाल, टेलिफोन, गिरण्या इत्यादि ज्या सामान्य व्यावहारिक लाटा इकडे इंग्रजी साम्राज्याबरोबर आल्या, त्यांचा उपयोग योग्य प्रकारें करण्यास, हायस्कुलांत किंवा कॉलेजांत जाऊन विशिष्ट प्रकारचें ज्ञान संपादन करावयास नको होतें. पत्रें लिहून डांकेंत टाकणें, तिकिटें घेऊन आगगाडीच्या डब्यांत बसणें, तारेचा मतलब तारमास्तरास सांगणें, हीं जीं कामें आहेत, तीं पूर्वीं कांहींएक न शिकतां, कोणत्याही माणसाला सहज करतां येण्यासारखीं आहेत. तीं आमच्या इकडच्या खेड्यापाड्यांतल्या लोकांना देखील सहज साधलीं. त्यापासून त्यांना कांहींच पीडा झाली नाहीं. इतकेंच नव्हे तर, या उपयुक्त वस्तु तयार करण्याची आरंभींची सगळी कटकट यूरोपांत झाली. तिच्यासंबंधाचा सगळा त्रास तिकडच्या लोकांस पडला. आणि तीं यंत्रें अगदीं आयतीं आम्हांस वापरावयास मिळालीं. परंतु, मिल्ल, हर्बर्ट स्पेन्सर, कार्लाइल, बेकन, जॉर्ज ईलियट, एमर्सन इत्यादि विद्वानांच्या ग्रंथांच्या अध्ययनानें आणि अवलोकनानें जी विचारांची लाट तिकडून इकडे आली आहे, तिचा योग, अगदीं थोड्या अशा शिकलेल्या लोकांशींच मात्र झाला आहे. आणि तिच्या आघातापासून विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, राज्यकर्त्यांचे अधिकारांची मर्यादा, प्रजेच्या हक्कांची व्याप्ति, इत्यादि ज्या कल्पना आहेत, त्या केवळ सुशिक्षितांच्या, म्हणजे फार तर हजारीं किंवा लाखांत एखाद्या दुसऱ्याच्या मनांत हितकर पद्धतीनें भरल्या आहेत. त्यांविषयीं इतर लोक बोलतात, ती सगळी वाचाळता


असते. तेव्हां त्यांविषयीं नीट जपलें पाहिजे. घरांत एका मुलास गोंवर आला, ह्मणजे संसर्गानें दुसऱ्यास येतो. तसें, एखादें मूल चांगलें गुटगुटीत असलें, ह्मणजे त्याच्या साहचर्यानें बाकीचीं गुट-गुटीत होत नाहींत. ह्या म्हणण्याचा आशय एवढाच आहे कीं, वाईटाचा प्रसार लवकर आणि अप्रयत्न होतो, तसा चांगल्याचा होत नाहीं. ह्याकरितां सध्यांच्या आपल्या स्थितींत चांगलें काय आणि वाईट काय, हें पाहून चांगल्याचा स्वीकार करावा, आणि वाईटाचा त्याग करावा, हेंच योग्य आहे.

६. ईश्वरकृपेनें हिंदुस्थान देश इंग्रज सरकारच्या कृपाछत्रा-खालीं अल्यामुळें, निरनिराळ्या प्रकारच्या दोन लाटा—एक पाश्चात्य शिक्षणाची व दुसरी आधुनिक सुधारणेची—या देशावर येऊन आद-ळल्या व त्यांचे इष्ट-अनिष्ट असे कोणते परिणाम झाले आहेत, हें वरील विवेचनावरून वाचकांचे लक्ष्यांत आलेंच असेल. तथापि, आधुनिक सुधारणेचे कित्येक अनिष्ट परिणाम, आपल्या देशांतच नव्हे तर, साऱ्या जगभर झाले आहेत. प्रस्तुतच्या आधुनिक सुधारणांनीं मानवीसुखांत भर पडली आहे काय? ह्या प्रश्नाची पाश्चात्य विद्वान् अलीकडे चर्चा करूं लागले आहेत. गिरण्या व कारखाने ह्यांचें साम्राज्य होऊन, मोठमोठ्या अवाढव्य शहरांची अचाट वाढ होणें, हा एकपरीनें अनिष्ट प्रकार आहे, असें कांहीं विचारी पाश्चात्य म्हणूं लागले आहेत. हाच प्रश्न थोड्या फार फरकानें हिंदुस्थानांतल्या मुत्सद्यांपुढें आला आहे. आधुनिक सुधारणेनें रेल्वे, जहाजें, तारायंत्रें,

आगगाड्या वगैरे मार्गे सारून मनुष्य आपल्या निसर्गनिर्मित स्थितीस जाईल, तरच जगांत खरें सुख नांदेल, असें रशियांतील सुप्रसिद्ध मुत्सद्दी कौंट टॉलस्टाय म्हणत असत. आधुनिक सुधारणांच्या प्रसारानें वास्तविक, पाश्चात्य राष्ट्रांत आनंद, सुख व समाधान यांचा जितका उत्सव दृष्टीस पडावयास पाहिजे होता, तितका दिसत नाहीं. सर्व जगांत अत्यंत सधन अशा ब्रिटिश राज्याचें केंद्र असणाऱ्या लंडन शहरांत पन्नास हजार गरीब पुरुष, स्त्रिया व मुलें रोज रात्रीं अत्यंत अवर्णनीय हालअपेष्टेंत रस्त्यांवर व गल्ल्यांतून पडलेलीं दिसून येतात, असें मि. स्टेड वगैरे विद्वानांनीं जाहीर केलें आहे. श्रीमंत इंग्लंडांतील बहुजनसमाजाची जर अशी स्थिति आहे तर, गरीब हिंदुस्थानांतील बहुजनसमाजाची स्थिति कशी असेल, हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे.

७. पन्नास वर्षांपूर्वीं हिंदुस्थान जसें होतें, त्यापेक्षां तें हल्लीं राहण्यास अधिक सुखकर झालें आहे काय ? ह्या प्रश्नाचें उत्तर अर्थात् " नाहीं " असेंच स्पष्ट द्यावें लागेल. भौतिकशास्त्रांचे आश्चर्यकारक शोध, त्या शोधांची उद्योगधंद्यास योजना व त्यामुळें संपत्तींत पडलेली भर, ह्यांमुळें दारिद्र्याची वाढ कमी झाली नसून, पन्नास वर्षांपूर्वी दारिद्र्य होतें, त्यापेक्षां आतां तें पुष्कळ पटीनें वाढलें आहे. आमच्या आजोबाच्या वेळीं म्हणजे सुमारें ६०-७० वर्षांपूर्वीं बडोद्यास एक रुपयाला पांच शेर ( ४० भारांचा शेर ) उत्तम तूप व रुपयास १६ शेर तेल मिळत असे. आमच्या वडिलांना एक रुपयास

तीन शेर तूप व ८ शेर तेल मिळूं लागलें. व आज आम्हांस रुपयास पावणे दोन शेर तूप व चार शेर तेल मिळत आहे. एका रुपयास एक मण गहूं व दोन मण ज्वारी खाल्लेले म्हातारे गृहस्थ अद्याप ह्यात आहेत. धान्यादिकांच्या व मनुष्यप्राण्याला अत्यंत आवश्यक अशा इतर अनेक प्रकारच्या वस्तूंतही आजा, बाप आणि मुलगा यांच्या कारकीर्दींत पुष्कळ फरक पडला आहे. तेव्हां सुधारणा झाली आहे असें म्हणणें कठीण आहे, व तसें म्हणावयाचें असल्यास, ती बहुजनसमाजाच्या दुःखास कारणीभूत झाली आहे. बहुजनसमाजास अन्नवस्त्र पुरविणें हाच जर सुधारणेचा अर्थ असेल तर, सुधारणेचा प्रसार खास होत नाहीं, असें डॉ० आल्फ्रेड वॉलेस रसेल यांनीं म्हटलें आहे. लोकांची शरीरसंपत्ति खालावत चालली आहे. हा सर्व जीवनकलहाचा परिणाम आहे. सध्यांतर पोटास मिळविणें हेंच आयुष्याचें ध्येय होऊन बसलें आहे. अशा स्थितींत आणखी पुढें कसे दिवस येतील, हें सांगतां येणें कठीण आहे !



# व्यक्तीचे प्रयत्न आणि संहत[1] प्रयत्न.

[ मराठा—एप्रिल, १९१४. ]

करविली तैशी केली कटकट । वांकडें कीं नीट देव जाणे ॥ १ ॥
कोणा कारणें हें जालेसें निर्माण । देवाचें कारण देव जाणे ॥ २ ॥
तुका ह्मणे मी या अभिमाना वेगळा । घालूनि गोपाळा भार असें ॥ ३ ॥

—तुकाराम—

पुष्कळ वेळां कित्येकांकडून असें म्हणण्यांत येतें कीं, एका माणसानें काय होणार आहे ? एका हातानें तर टाळी देखील वाजत नाहीं. मोठीं कामें अनेक माणसांच्या साहाय्यावांचून होत नाहींत. सकृद्दर्शनीं हें म्हणणें खरें आहे, असें वाटतें. तथापि, एकेका व्यक्तींनीं देखील अविश्रांत परिश्रम करून आपल्या देशबांधवांवर किती उपकार करून ठेविले आहेत व सांप्रत करीत आहेत, याचीं आपल्या देशांतील व पाश्चात्य देशांतील कितीतरी उदाहरणें देतां येतील. ब्रिटिशराज्यसंस्थापनेची सर्वांगसुंदर इमारत या देशांत परिपूर्ण झाल्यानंतर गेल्या पन्नाससाठ वर्षांत हिंदी लोकांनीं आपल्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, औद्योगिक व शिक्षणविषयक उन्नतीप्रीत्यर्थ अनेक लहानमोठ्या संस्था स्थापन केल्या असून, त्यांपैकीं कांहीं

१ पुष्कळ मनुष्यांनीं एकत्र मिळून एकचित्तानें केलेले प्रयत्न. संहत=जुळलेले, संयुक्त.

एकेका व्यक्तीच्या दीर्घ प्रयत्नानें चालल्या असून, कांहीं संहत प्रयत्नानें राष्ट्रोन्नतीचीं निरनिराळीं कामें करीत आहेत. प्रो० कर्वे यांचा अनाथबालिकाश्रम त्यांच्या स्वार्थत्यागाची साक्ष पटवीत आहे. अस्पृश्य मानलेल्या जातींच्या उद्धराप्रीत्यर्थ सर्वस्वीं स्वतःस वाहून घेणारे रा. शिंदे यांची कामगिरी सर्वविश्रुत आहेत. त्याचप्रमाणें निरपेक्षबुद्धीनें, अव्याहतश्रमानें, जिवंत तळमळीनें एका व्यक्तीला सुद्धां केवढें महत्कार्य घडवून आणतां येतें, याची कल्पना अमेरिकेंतील निग्रो लोकांचे पुढारी डॉ० बूकर टी. वॉशिंग्टन यांचे चरित्रावरून व त्यांनीं स्थापन केलेल्या टस्केजी येथील धंदेशिक्षणाच्या संस्थेवरून आतां स्पष्टपणें दिसून आली आहे. लोककल्याणाचीं कामें एका व्यक्तीला देखील किती करतां येण्यासारखीं आहेत, हें वरील फक्त तीनच गृहस्थांच्या उदाहरणांवरून सूज्ञ वाचकांचे लक्ष्यांत येईल. दृढनिश्चयाचा, धैर्यवान्, बुद्धिशाली आणि निग्रही असा मनुष्य एकटा असला तरी तो काय करूं शकणार नाहीं ! प्रत्येक कार्यास आरंभ प्रथमतः एकाच माणसाकडून होतो. प्रत्येक मनुष्य दुसऱ्याची वाट पाहात बसला, तर कोणतेंच कार्य तडीस जाणार नाहीं. म्हणून, प्रस्तुत लेखाच्या आरंभीं तुकाराम महाराजांच्या अभंगांत सांगितल्याप्रमाणें, प्रत्येकानें आपलें कर्तव्य म्हणून आपापल्यापरी लोककल्याणाचें कार्य करण्याचें मनांत आणिलें, आणि त्याप्रमाणें अंशतः पायाशुद्ध कार्य केलें तर, त्यापासून श्रमविभागाच्या तत्त्वाप्रमाणें आपल्या देशाचा पुष्कळ फायदा होईल.

२. आणखी, आपल्या देशबांधवांची उन्नति होण्याकरितां माझ्या एकट्याच्या प्रयत्नानें काय होणार आहे, असें कोणी केव्हांही ह्मणूं नये कोणीही माणूस एकटा नाहीं. समजापासून तुटून नाहीं, वेगळा नाहीं. तो कोणत्या तरी समाजाचा एक अवयव आहे. अवयवांत शक्ति आली असतां ती सगळ्या देहास ह्मणजे समाजास तेवढी शक्ति येते. आणि सगळ्या अवयवांस शक्ति आली ह्मणजे सगळ्या शरीरास-साऱ्या राष्ट्रास-मोठी बळकटी येते, हा सिद्धांत आहे. "जीव ही कांहीं थट्टा नव्हे" असें जॉन स्टुअर्ट मिल्ल यांनीं म्हटलें आहे, तें खरें आहे. कारण, तो जीव कोणाचाही असो; राजाचा असो वा रंकाचा असो. जीव म्हटला म्हणजे सर्वांची योग्यता सारखी आहे. राजपुत्र म्हणून जन्मास आलेला गौतमबुद्ध राजपुत्रच राहिला असता, तर त्याचें नांवही आज कदाचित् कोणास माहित नसतें. परंतु त्यानेंच अनेक प्रकारच्या हालअपेष्टा सहन करून, बौद्धधर्मासारख्या उदात्त धर्मतत्त्वांचें प्रस्थापन केल्यामुळें, जगांत त्याच्या नांवाचा केवढा प्रकाश पडला आहे! उगवत्या सूर्याची भूमि जें जपान, तेथपासून हिमाचलाच्या मस्तकाधिष्ठित जो तिबेट देश, तेथपर्यंत सर्व मनुष्यमात्र बुद्धानें घालून दिलेला धर्म अव्याहत पाळीत आहेत. आज हिंदुस्थानांत बुद्धधर्म नसला तरी, बुद्धाला ईश्वरावतार म्हणून लोक समजतच आहेत. "नर करणी करे तो नरका नारायण होय" हेंच खरें दिसतें. पहा! एका बुद्धाच्या जीवानें किती तरी मोठें कार्य केलें! त्याचप्रमाणें श्रीशिवाजीमहाराजांच्या जीवानें

राज्यस्थापना केली. ती केली नसती तर, **मराठा** या नांवांतलें सर्व रहस्य लुप्तच होतें. तुकारामहाराजांच्या जीवानें भागवतधर्माचा प्रसार करून, हजारों–नव्हे लक्षावधि–लोकांस परमार्थाचा मार्ग दाखविला. सारांश, एका माणसास आपल्या जीवाचा असा उपयोग करून घेतां येतो. ब्राम्हधर्माचे सुप्रसिद्ध संस्थापक बाबू केशवचंद्र सेन, बंगाल्यांत सुधारणेचा विजयध्वज फडकविणारे राजाराम मोहन-रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर व आपलेकडील कै० न्या० महादेव गोविंद रानडे ह्या एकेका व्यक्तींनीं आपल्या देशबांधवांच्या उन्नती-करितां कितीतरी कार्यें केलीं आहेत. जिवंतपणीं तर त्यांनीं आपल्या-वर पुष्कळ उपकार केले आहेतच; पण त्यांच्या कित्त्यानें आज ना० गोखले, ना० चंदावरकर, रा० शिंदे, प्रो० कर्वे हे खरे कर्तृत्व-वान् पुरुष लोककल्याणाकरितां सारखे झटत आहेत, आणि बहुमान पावत आहेत. तेही स्वतःच्या आचरणाचा कित्ता घालून देऊन, जनांवर अपरिमित उपकार करीत आहेत. त्यांच्यासारखें अगदीं तंतोतंत जरी नाहीं, पण अंशतः तरी होण्याविषयीं प्रत्येकानें सतत प्रयत्न करीत असलें पाहिजे. मुंगी पर्वत उचलीत नाहीं, धान्याचा एक दाणाच उचलते. पण, तो तिच्या जीवाच्या मानानें भारी असतो, म्हणून तिला आपण शाबास म्हणतों. तसें, आपण आपल्या समजुतीप्रमाणें आणि सामर्थ्याप्रमाणें करवेल तितकें जनाचें चांगलें करण्याविषयीं झटणें, हें प्रत्येकाचें अवश्य कर्तव्य आहे.

३. सध्यांच्या अमदानींत ईश्वरानें परिस्थिति अनुकूल आणून

दिली असून, तिचा फायदा घेण्याचें काम लोकांच्या अकलेवर सोंपविलेलें आहे. म्हणून, ज्याला खरोखर आपल्या देशांतील सर्व लोकांचें निरंतर कल्याण करण्याची व आपल्या देशबंधूंनां स्वोन्नतीचा व स्वसुखाचा मार्ग बिनतक्रार मोकळा करून देण्याची अंतःकरणापासून इच्छा असेल, त्याला इतका अनुकूल काल कधींच आला नव्हता. आणि ही दैवी योजना कांहीं लोकांच्या लक्ष्यांत येऊन, त्यांजकडून लोककल्याणाचे संहत प्रयत्न होऊं लागले आहेत, ही आनंदाची गोष्ट होय. सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटी, सोशल सर्व्हिस लीग, आर्यन ब्रदरहूड, महाराष्ट्र व्हिलेज एज्युकेशन सोसायटी, मराठा ऐक्येच्छु सभा, महाराष्ट्रीय ऐक्यवर्धक समाज, सेवासदन, वनिताविश्राम, डिप्रेस्ड क्लासेस मिशन, प्रार्थनासमाज, आर्यसमाज व इतर शेंकडों लहानमोठ्या संस्था, आपापल्यापरी लोककल्याणाचे प्रयत्न करीत आहेत. जातीजातीचा एक घटक बनवून, तेवढ्या नियमित मर्यादेंत शिक्षणाचा प्रसार करावा, जागृति करावी, अशासाठीं हिंदुस्थानांत निरनिराळ्या ठिकाणीं संहत प्रयत्न सुरू आहेत. कित्येक जाती आपल्या ज्ञातीबंधूंच्या परिषदा भरवून आपल्या स्थितीचा विचार करून, ती सुधारण्यासाठीं उपाय योजूं लागले आहेत, आणि त्यांचें उदाहरण पाहून आपणही असेंच करावें, असें दुसऱ्या जातींनां वाटूं लागले आहे. प्रत्येक जातीकडून कां होईना, संहत प्रयत्नानें आपल्यांतील शिक्षणप्रसार व समाजसुधारणा वगैरेसंबंधानें काळजीपूर्वक विचार झाला, आणि त्या दिशेनें जर कांहीं

प्रत्यक्ष कार्य झालें, तर राष्ट्रहिताच्या बाबतींत बरीच मजल मारल्या-सारखें होणार आहे.

४. पाश्चात्य राष्ट्रांत संहत प्रयत्नांनीं लोकोपकाराचीं कामें करणाऱ्या स्त्रीपुरुषांचे संघ असतात. अमेरिकेंत शेंकडों निरनिराळ्या तऱ्हेच्या स्त्रीसभा कायावाचामनसा सत्कृत्यें करून, समाजाची व राष्ट्राची उन्नति करण्याच्या कामांत तत्पर असतात. तिकडे पूर्वी बायका अज्ञानी असल्याकारणानें, संहत प्रयत्नांची योग्यता केवढी-आहे हें न जाणून, आपापल्या ठिकाणीं मनास वाटेल त्या रीतीनें अलाहिदा राहून धर्म, परोपकार इत्यादि कार्यें करीत होत्या. आतां अज्ञानाचें राज्य जाऊन ज्ञानाचें मन्वंतर सुरू झालें आहे. पुष्कळांनीं एकत्र जमून एकमेकांचा सल्ला घेऊन, एकविचारानें संहत प्रयत्न केल्यास पुष्कळ मोठाले फायदे होतील, हें बायकांस कळून आलें आहे. आतां बायका युनायटेड् स्टेट्स्च्या राष्ट्रीय उन्नतीच्या सत्कृत्यांत पुरुषांच्या समान भागीदार होत आहेत. आपल्याकडे सेवा-सदन, वनिताविश्राम वगैरे स्त्रीसभा संहत प्रयत्नानें लोकोपकाराचीं कामें करीत आहेत, व आतांपर्यंत त्यांच्याकडून जें काम झालें आहे व होत आहे, तें फारच उत्तेजनदायक आहे. गेल्या नाताळांत साऱ्या हिंदुस्थानभर ठिकठिकाणीं भरलेल्या ज्ञातिपरिषदांपैकीं आग्रा येथें भरलेल्या रजपूत सभेनें व नाशिक येथें भरलेल्या **मराठा–शिक्षण परिषदेनें** द्रव्यनिधीच्या बाबतींत विशेष कार्य केलें आहे. या ज्ञाति-परिषदांकडून संहत प्रयत्नानें सतत वर्षभर कार्य होत नाहीं, असा

त्यांचेवर त्यांच्या जन्मापासून एक आक्षेप आहे. तो आक्षेप, त्या त्या ज्ञातिपरिषदांचे चालक दूर करितील, अशी आशा आहे. अमेरिकेच्या ७,५७,३३,७९२ लोकसंख्येंत ८८,४०,३८८ निग्रो आहेत. ह्मणजे शेंकडा सरासरी ११ निग्रो आहेत. डॉ. वॉशिंग्टनसारख्या एकट्या विभूतीस, एवढ्या मोठ्या समाजाची सेंटनिहालसिंग यांनीं ह्मटल्या-प्रमाणें जर अत्यंत व्यापक व प्रचंड सुधारणा घडवून आणतां येते, तर अंतःकरणाच्या खऱ्या कळकळीनें, निरपेक्षपणानें, स्वार्थत्यागानें संहत प्रयत्न केल्यास, ज्ञातिपरिषदांच्या चालकांना आपापल्या समाजाची उन्नति करण्याचे कामीं निराश होण्याचें कारण नाहीं. सुमारें पंचवीस वर्षांच्या अल्पकालांत डॉ. वॉशिंग्टन यांच्या संस्थेंतून १७५० ग्राज्युएट तयार होऊन बाहेर पडले आहेत, व ६००० लोक निरनिराळ्या प्रकारच्या उद्योगधंद्यांत टस्केजी येथील शिक्ष-णाच्या साहाय्यानें उदरनिर्वाह करीत आहेत. सन १८८१ सालीं ज्या पडक्या जागेंत अवघ्या तीस मुलांना घेऊन डॉ. वॉशिंग्टन यांनीं या महत्कार्यास आरंभ केला, त्यांना, एका पावशतकाच्या आंत, या संस्थेची पन्नासपटीनें वाढ झालेली पाहून केवढा आनंद वाटत असेल, याची कल्पना प्रत्येकानें आपल्या मनाशींच करावी! दरसाल सहा हजारांच्या उत्पन्नापासून दरसाल साडेचार लाख रुपये-पर्यंत ज्या संस्थेची वाढ यक्षिणीनें कांडी फिरविल्याप्रमाणें अवघ्या पंचवीस वर्षांत झाली, तिच्या पुरस्कर्त्याबद्दल कोणास कौतुक व अभिमान वाटणार नाहीं? एवढ्या मोठ्या प्रपंचाचें श्रेय एकट्या डॉ.

वॉशिंग्टन यांचेकडे आहे, ही गोष्ट विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. डॉ वॉशिंग्टन यांच्या या उदात्त चरित्रापासून, निरपेक्षपणें काम करणाऱ्या कोणाही लोकाग्रणीस निराशा वाटण्याचें बिलकूल कारण नाहीं, हें स्पष्ट दिसून येईल. आपल्या देशांत लोककल्याणाच्या कामांचे मोठमोठे पर्वत पडले आहेत. ते एकेबाजूस सारण्यास कळकळीनें काम करणाऱ्या लोकांची वाण आहे ! उदात्त हेतु दृष्टीसमोर ठेवून, निरपेक्षपणानें व निश्चयानें प्रयत्न केल्यास, यश मिळविण्याचें सामर्थ्य मनुष्यास प्राप्त होतें, असा डॉ. वॉशिंग्टन यांचा अनुभव आहे. डॉ. वॉशिंग्टनसारखे थोर पुरुष निर्माण झाल्याखेरीज या देशांतील अफाट जनतेचें कल्याण होईल, असें वाटत नाहीं. ईश्वर करो ! आणि डॉ. वॉशिंग्टनसारखे सत्पुरुष आमच्या देशांत निर्माण होवोत !

५. सारांश, सूज्ञ वाचकांस प्रार्थना म्हणून इतकीच कीं, ह्या जगांत आपणांस स्थितिपरत्वें जीं अनेक कर्तव्यकर्में करावयाचीं आहेत, तीं यथाशक्ति करावीं. कांहीं कामें आपल्या स्वतःकरितां करावयाचीं असतात; कांहीं कुटुंबाकरितां करावयाचीं असतात; आणि कांहीं कामें साधारणतः सर्व लोकांकरितां म्हणजे देशाकरितांच करावयाचीं असतात. ह्यांपैकीं सगळीं कामें अगत्याचीं आहेतच. परंतु देशाकरितां करावयाचीं म्हणून जीं कामें आहेत, तीं सर्वांत अत्यंत महत्त्वाचीं आहेत. पाश्चात्य राष्ट्रांत आजपर्यंत जे थोर पुरुष होऊन गेले, त्यांनीं आपल्या देशाच्या ऊर्जितावस्थे-

करितां अविश्रांत परिश्रम केले, त्यायोगें त्यांच्या देशाचें पुष्कळ कल्याण झालें. ते तुमच्या आमच्या सारखेच होते. त्यांनीं केलेलीं कामें देशकालवर्तमानानुरूप थोडीं तरी आपणांस करतां येतीलच. आपला देश उन्नतावस्थेस आणण्याकरितां आपणांसही पुष्कळ कामें करावयाचीं आहेत. तीं करण्याकरितां कोणी ग्लाडस्टन व्हा; कोणी सर ऐझाक न्यूटन व्हा; कोणी जेम्स वॉट व्हा; कोणी रामशास्त्री व्हा; कोणी जॉन हावर्ड व्हा; कोणी रानडे व्हा; कोणी तेलंग व्हा; कोणी कोलंबस व्हा; कोणी शिंदे व्हा; कोणी वॉशिंग्टन व्हा; कोणी टाटा व्हा; कोणी सुखडवाला व्हा; व आपापल्यापरी देशकल्याणाचीं कामें करा प्रयत्न करणें माणसाचें काम आहे. फलप्राप्ति होणें सर्वस्वीं ईश्वराधीन आहे. सध्यांचे मन्वंतर कपिलाषष्ठीच्या योगाप्रमाणें आहे. म्हणजे या शांततेच्या कालाचा लाभ आपण लवकर घेतला पाहिजे. आपल्या देशाच्या ऊर्जितावस्थेकरितां कांहीं धीर पुरुषांचे प्रयत्न सुरू आहेत. त्यांच्या प्रयत्नांना कोणत्याही मार्गांनीं व कोणत्याही उपायांनीं प्रोत्साहन द्यावें. ही आपली कृति देवास मान्य होईल, व आपल्या जन्माचें सार्थक होईल.

७

## १४.—वैराग्यानें स्वप्नांत काय सांगितलें ?

[ **मराठामित्र**—आगष्ट, १९१३. ]

परवां शनिवारची गोष्ट. रात्रीं जेवण आटोपल्यावर नुकताच आलेला ' इंदु ' वाचीत पडलों होतों. दहा वाजले; परंतु, नित्या-प्रमाणें झोंप येईना. सकाळीं एका विद्वान् स्नेह्यापाशीं बोलत असतां, मराठे लोकांत विद्येचा प्रसार करण्यासाठीं **मराठा-शिक्षण-परिषदेच्या** द्वारें आमच्यांतल्या बाहुबलानें आणि ज्ञानबलानें संपन्न असलेल्या पुढाऱ्यांनीं व इतर सामान्य जनांनीं कोणते उपाय योजिले पाहिजेत, या विषयासंबंधानें बरेंच बोलणें झालें होतें. त्यामुळें, रात्रीं अंथरुणावर पडल्यावर देखील तेच विचार पुनः मनांत घोळं लागले; बराच वेळ झाला तरी, झोंप म्हणून कांहीं केल्या येईना ! निद्रादेवीस प्रसन्न करून घेण्याचे जितके म्हणून शक्य उपाय होते, तितके सर्व करून पाहिले. परंतु, एकहि सध्या होईना ! शेवटीं स्पेन्सरचें " नीतिशास्त्राचे सामान्य सिद्धांत " हें पुस्तक वाचाव-

---

**टीप**:—' मनीं वसे तें स्वप्नीं दिसे. ' वैराग्यानें स्वप्नांत सांगितलेलीं समाजोन्नतीचीं तत्त्वें आणि माझ्या अंतःकरणांतील विचार जसेच्या तसे येथें उमटवीत आहें. तरी ते पुष्कळांस खोटेंही वाटणार आहेत. त्यास नाइलाज आहे. खरे वाटतील, त्यांनीं आपल्या समाजासंबंधानें आपलें कर्तव्य काय आहे, त्याचा विचार करून, योग्य प्रयत्न करावेत, अशी प्रार्थना आहे.

यास घेतलें. काहीं वेळानें झोंप येतेसें वाटल्यावरून पुस्तक खालीं ठेवून झोंपीं गेलों.

पहांटेचा सुमार असेल, मला एक स्वप्न पडलें. कोणीएक अद्भुत बैरागी माझ्या अंथरुणाजवळ आला आणि मला जागें करून म्हणाला:-अरे ! तूं निजलास काय ? उठ ! तुझ्या मनांत समाजोन्नतीच्या विचारांचें काहूर माजलें आहे, हें मी जाणून आहें; आणि त्यासंबंधानेंच आज मी तुला दोन शब्द सांगणार आहें. तुला मनुष्य जन्म मिळाला, या जन्मांत कांहीं दिवस ह्मणजे बाल्यावस्थेचे केवळ परावलंबनांतच गेले. परंतु, स्वावलंबनास जेथून प्रारंभ झाला, तेथपासून हा लोक सोडून जाईपर्यंत कोणची गोष्ट साधण्याकडे आपलें पूर्ण लक्ष दिलें पाहिजे, या प्रश्नाचा तूं आपल्या मनाशीं किती वेळां विचार केला आहेस ? तूंच काय ? मला वाटतें, तुझ्या समाजांतील फार थोडे लोक हा प्रश्न आपल्या मनाला विचारून जें काय करावयाचें तें करीत असतील. पूर्वींपासून लोक करीत आले, तेंच पुढें करावयाचें, असा मेंढरी न्याय फार लोकांचा असतो. आपला जन्म ह्मणजे कांहीं तरी जबाबदारीचें, जोखमीचें व अत्यंत मोलवान् असें कर्तव्य आपल्या स्वाधीन आहे, हा विचार फारच थोड्यांच्या मनांत येत असेल. ज्याप्रमाणें कोणतेंही कुशल काम करण्यास निरनिराळीं बारीक हत्यारें कारागीर बाळगतो, तीं केवळ त्याचीं साधनें होत. आपलें जीवित हें एक साधन होय. आपलें ज्ञान हें एक साधन होय. जें काय म्हणून आपल्यांला उद्योगाला

लावतां येईल, तें सर्व साधनांपैकींच होय. जीवित सुद्धां ज्याचें साधन, तें साध्य आहे तरी काय ? तें परमश्रेष्ठ साध्य **समाजाची उन्नति** हें होय. आपल्या जागण्यानें, आपल्या ज्ञानानें, आपल्या कौशल्यानें, आपल्या श्रमानें, चार लोकांस तरी सुखी करूं, कोणाला दुःखांत टाकणार नाहीं, अशा तऱ्हेनें जें जगणें, तें खरें जगणें. आपल्या या आयुःप्रवासांत जें काय ध्यानांत धरून आपली गति ठेवावयाची, तें हेंच कीं, मी ज्या समाजांत उत्पन्न झालों आहे, त्या समाजाला, माझ्या जगण्यानें, अणुमात्र तरी उन्नत करीन. त्याच्या उन्नतीकरितां मी स्वात्मार्पण करीन. पूर्वींच्याकाळीं धारातीर्थीं देह ठेवणाऱ्या क्षत्रिय वीरांना मोक्षपद प्राप्त होत असे. उलटपक्षीं समरांगणांतून पाठ दाखवून पळून जाणारांना अधोगति प्राप्त होईल, असें शास्त्राचें वचन होतें. त्यामुळें, पूर्वीं मोक्ष मिळविण्याचें साधन निदान क्षत्रिय-मराठ्यांना तरी वरील प्रकारचें होतें. बाबारे, सध्यांच्या काळीं मोक्षप्राप्तीचे दुसरे अनेक मार्ग आहेत. स्वतः झीज सोसून दुसऱ्यासाठीं झटणें, अतएव दुसऱ्याच्या उन्नतीसाठीं यत्न करणें, हाही मोक्षाचा एक मार्ग आहे. त्या मार्गानें तूं आणि तुझ्या समाजांतील इतर लोकांनीं जावें, असें मला वाटतें. मनुष्यजन्मास आल्याचें जें काय मुख्यतम साध्य, तें हें. बाकी सर्व गोष्टी या साध्यांचीं साधनें होत. ही गोष्ट कधींही विसरूं नको. तूं शंभर वर्षें जगलास, रोज पंचपक्वान्नें जेवलास, गाड्या-घोडे उडविलेस, दुसऱ्याच्या उपयोगीं कधीं पडला नाहींस, दुसऱ्याला

[library stamp]
जेणेंकरून सुख होईल, अशासाठीं झटला नाहींस, अतएव आपल्या समाजबांधवांच्या उन्नतीकरितां सबंध आयुष्यभरांत मुळींच यत्न केला नाहींस तर, तूं जन्मास आल्याचें सार्थक तें काय केलेंस ? पावसाळ्यांत भुईकिडे उत्पन्न होतात व माती खाऊन थोडेका पुष्ट होतात ? पण काय ? ते अस्तित्वांत असतांना किंवा नष्ट झाल्यावर कधीं कोणाचें लक्ष त्यांच्याकडे जातें काय ? गेलेंच तर त्यांना कोठेंतरी लांब फेंकून देण्याचा प्रयत्न जो तो करणार. अशा जीवितांत अर्थ काय ? मला वाटतें, हे किडे देखील एकंदर सृष्टीच्या सुव्यवस्थेंत कांहीं तरी महत्त्वाचें काम करण्यासाठींच विधात्यानें त्यांना निर्माण केलें असेल, नसेल कशावरून ? पावसाळ्यांत पाऊस पडपडून माती कुजून जाते. ती तशीच राहिली तर, तिच्यापासून फार त्रास होईल, एवढ्याकरितां ती खाऊन नाहींशी करण्यासाठींच या प्राण्याची उत्पत्ति असेल. पण, जो कधीं कोणाच्या उपयोगीं पडावयाचा नाहीं, ज्याच्या हातून कधीं कोणाचें बरें झालें नाहीं, किंवा कोणाचें दुःख कमी झालें नाहीं, तो या भुईकिड्यापेक्षांही निरुपयोगी म्हणावयास मुळींच हरकत नाहीं. प्रत्येक माणसानें सगळ्या समाजाचें हित करीत बसणें शक्य नाहीं, असें पुष्कळांचें म्हणणें असतें. आणि तें अंशतः खरेंही आहे. समाजाच्या उन्नतीकरितां म्हणून अमुक गोष्ट करावयाची, असा मनाचा निर्धार पाहिजे. तो निर्धार असला म्हणजे, थोडेंबहुत तरी हातून कांहीं होतेंच. प्रत्येकाच्या हातून सगळ्यांचें हित एकदम होणें हें शक्य नाहींच. त्या कामाला लागणारी जी

काय शक्ति, जें काय ज्ञान, जें काय धैर्य, जी काय सहनशीलता, आणि जो काय आत्मत्याग, तो सर्वांच्याच अंगीं असतो, असें नाहीं. तो अंगीं असणारे महात्मे फार विरल. म्हणून काय झालें ? जे अशा महात्म्यांच्या योग्यतेचे नाहींत, त्यांनीं मुळींच प्रयत्न करूं नये, असें नाहीं. प्रत्येक मनुष्य हा समाजरूपि शरीराचा एक अवयव होय. त्याचे विचार ही त्या अवयवांची चालकशक्ति होय. ती त्यानें चालवून तो अवयव शाबूत ठेविला, म्हणजे त्यानें आपलें जें साध्य तें साधलें म्हणून समजावें. त्यानें आपले विचार दाबून ठेवूं नयेत. मनांत एक आणि जनांत दुसरें असें घरसोडीचें वर्तन ठेवूं नये. आपल्या शक्तीचा योग्य उपयोग करून घेण्यास मागेंपुढें पाहूं नये. समाजोन्नतीच्या कामीं श्रम करण्याची पाळी आली म्हणजे अंग चोरूं नये. समाजांतल्या शिक्षणसंस्थांना मदत करण्याची वेळ आली म्हणजे वेदांताच्या गोष्टी सांगून अंग झाडून मोकळें होऊं नये. शक्य असेल तितकी नव्हे तर, ज्यास्तींत जास्त जितकी मदत करवेल, तितकी मदत अवश्य करावी. शिक्षणसंस्थांना ऊर्जितावस्थेस आणण्यासाठीं कायावाचामनानें श्रम करावेत. मग यश न आलें तरी हरकत नाहीं. परंतु इतकी गोष्ट लक्षांत ठेव कीं, खऱ्या कळकळीनें केलेल्या प्रयत्नांस यश आल्याखेरीज राहणारच नाहीं, हा सिद्धांत आहे. तें यश तुला प्रत्यक्ष कदाचित् दिसणार नाहीं. परंतु तें केव्हांना केव्हांतरी लाभल्याखेरीज राहणार नाहीं, हें खास. जी म्हणून विशिष्ट शक्ति आहे, तिचा परिणाम झाल्याखेरीज कधींच राहावयाचा नाहीं.

तुझ्या समाजबांधवांचें कल्याण करण्यासंबंधाचे तुझे प्रयत्न जर खरोखर अशा प्रकारचे असतील तर, त्या योगें किंवा अन्य कोणाचेंही कोणत्याच प्रकारें अहित होईल, किंवा त्यांच्या आत्यन्तिक सुखास बाध येईल, असें यत्किंचित्‌ही वर्तन तुझ्याकडून होऊं नये. सच्छक्ति असेल तर, तिचा सत्परिणाम होणार. दुःशक्ति असेल तर तिचा दुष्परिणाम होणार. परंतु परिणाम हा होणारच; त्याबद्दल तुला कधीं शंका नको. आपली विचारशक्ति व कर्तृत्व-शक्ति ह्या लहान मुलांप्रमाणें होत. त्यांना जसें वळण द्यावें, तसें हातून होणार. चांगल्या कामीं लावून चांगलें वळण दिलें तर, चांगला परिणाम होणार. वाईट कामीं लावून वाईट वळण दिलें तर, वाईट परिणाम होणार, हें सदासर्वदां ध्यानांत धर. कांटे पेरून गुलाब, सराटे पेरून गहूं, किंवा मोहोऱ्या पेरून द्राक्ष कधींच उत्पन्न व्हावयाचीं नाहींत. ही गोष्ट जशी तूं आपल्या साधारण व्यव-हारांत ध्यानांत धरतोस, तशी ती इतर बाबतींतही सदासर्वदां ध्यानांत धरून जें काय करणें तें कर. परंतु ही गोष्ट किती लोक ध्यानांत धरीत असतील बरें ? फार थोडे. मला जें काय मुख्यतः तुला सांगा-वयाचें तें हें कीं, ‘ परहित ’ हेंच तुझ्या जीविताचें साध्य होय. हेंच मानवीजीवनक्रमाचें खरें रहस्य आणि परमेश्वर प्राप्तीचें अमोघ साधन होय. ‘ पर ’ ह्या शब्दांत एकट्यादुकट्या माणसाचा समावेश होत नाहीं. तूं रस्त्यानें जातांना एखाद्या आंधळ्याला पैसा दिलास, निराश्रित अशा विद्यार्थ्यास एखादे वेळ जेवूं घातलेंस, कोणा तान्हे-लेल्यास पाणी पाजलेंस, आपल्यास पुरून उरणाऱ्या पैशांतून एक

दोन विद्यार्थ्यांस स्कॉलरशिपा दिल्यास, वस्त्रहीनाला वस्त्र दिलेंस आणि एखाद्या दुखणाइताला थोडीबहुत मदत करून त्याचा दुःखभार हलका केलास तर, तूं आपल्या जीविताचें ' इतिसार्थक्य ' संपादिलेंस, असें नव्हे. अरे बाबा, या गोष्टी केवळ तुझ्या कर्तव्यांपैकीं होत. आणि हें कर्तव्य देवानेंच तुझ्या मागें लाविलें आहे. याबद्दल तुझी स्तुति कसली गायची ? तुला स्वतःला अडचण न होतां जो पैसा तूं दुसऱ्याला देणार, तुझ्या स्वतःच्या पोटाची पंचाईत न पडतां जे दोन चतकोर तूं दुसऱ्याला घालणार, तुला पाण्याची टंचाई नसल्यामुळें जें पेलाभर गारसें पाणी तूं दुसऱ्याला देणार, किंवा तुला पुरून उरणाऱ्या कपड्यांतून एखादी बंडी—सदरा तूं दुसऱ्याला देणार, त्यांत तूं विशेष तें काय केलेंस ? अरे बाबा, तुला पुरून जें उरतें, तें खऱ्या दृष्टीनें पाहतां तुझें स्वतःचें नव्हेंच. तें निराश्रित लोकांच्या उपयोगासाठीं देवानें तुझ्या स्वाधीन ठेविलें आहे, असें समज. ज्याप्रमाणें एखाद्या लहान मुलाचे आईबाप वारले म्हणजे त्याची मालमत्ता तो शाहाणा होईपर्यंत एखाद्या जाणत्या माणसाच्या स्वाधीन करतात; त्याप्रमाणेंच हें आहे. ज्यांना आपल्या पोटापुरतेंही मिळविण्याची अक्कल किंवा ताकद नाहीं, ज्यांना स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यास शारीरिक किंवा मानसिक कोणतेंच सामर्थ्य नाहीं, किंवा ज्यांच्या वाडवडिलांनीं आपल्या अधिक श्रमानीं ज्यांच्या शिक्षणाची सोय करून ठेविली नाहीं, अशा हीनदीन लोकांच्या वांट्याचें द्रव्य, ताकदवान् व अक्कलवान् लोकांच्या स्वाधीन केलेलें असतें, असेंच समजलें पाहिजे; आणि असें समजूनच सर्व अक्कलवान्,

ताकदवान् व इतर सर्व साधनांनीं संपन्न अशा लोकांनीं आपली वागणूक ठेविली पाहिजे. आणि अशी ठेवील, तोच खरें कर्तव्य करील. ठेवणार नाहीं, तो अधम, आपलपोट्या, विश्वासघातकी असें मी समजतों. आपल्याला झीज सोसून, अडचण सोसून, नड घेऊन, जे कोणी दुसऱ्याच्या–विशेषतः आपल्या समाजाच्या–हितास जागतील, ते खरे प्रशंसेस पात्र. त्या वर्गांत तूं स्वतः आणि तुझ्या समाजांतील लहानमोठ्या सर्व दर्जाच्या लोकांनीं जावें; तुझा यत्न, तुझी महत्त्वाकांक्षा, तुझें तनमन सगळें त्या वर्गांत शिरण्यास लागावें, असा माझा मानस आहे. असे पुष्कळ लोक जेव्हां तुझ्या समाजांत उत्पन्न होतील, तेव्हांच तुझ्या समाजाची उन्नति होईल. अशा कर्तृत्ववान्, पुरुषांची मराठा–समाजांत वाण आहे, असें तुझें म्हणणें आहे. परंतु लक्ष्यांत ठेव कीं, ही उणीव शिक्षणप्रसारानें कालेंकरून भरून निघणार आहे. आणि ही उणीव भरून निघेपर्यंत हें पुण्यकृत्य–मराठे लोकांना सज्ञान करून त्यांना उन्नत स्थितीस आणण्याचें पुण्यकृत्य–इतर पुण्यकृत्यांप्रमाणें तुझ्या समाजांतल्या प्रजाहितदक्ष भूपतींनींच हातीं घेऊन चालविलें पाहिजे. कांकीं, हेंही एक ईश्वरी सूत्र आहे. मराठ्यांनीं मराठ्यांची सुधारणा केली तर, राष्ट्रीय कामांत त्यांनीं बराच मोठा भाग उचलल्यासारखा होणार आहे. तो कसा, तें ऐक–"

इतक्यांत माझ्या वडील मुलीनें मला जागें करून 'बाबा ! मला आज **ड्राइंग बुक** आणून द्या !' असें मोठ्यानें म्हटल्यामुळें, मी दचकून जागा झालों, आणि बैराग्यानें स्वप्नांत सांगितलेल्या समाजोन्नतीच्या प्रमेयांसंबंधानें विचार करूं लागलों.

# १५.—भगीरथ प्रयत्न.

[ **मराठामित्र**—जानेवारी, १९१४. ]

प्राचीनकाळीं सगर या नांवाचा एक सूर्यवंशी अत्यंत उदार व धर्मशील राजा होऊन गेला. त्याला साठ हजार पुत्र होते. एके दिवशीं त्या मुलांनीं बापाला अशी विनंती केली कीं, ' आम्ही एवढे साठसहस्र पुत्र तुम्हांला आहोंत, तेव्हां तुम्ही अश्वमेध करा. ' बापानें ती आपल्या मुलांची सदिच्छा ऐकून मोठा संतोष दर्शविला व अश्वमेधाची सर्व तयारी करून, एक सर्वोत्कृष्ट घोडा भूमंडाळावर संचार करण्यासाठीं सोडला. पुढें कांहीं दिवसांनीं इंद्रानें तो घोडा धरला व कपिल ऋषींच्या आश्रमांत बांधून ठेविला. हा प्रकार कपिल ऋषींना मुळींच माहित नव्हता.

त्या घोड्याचा शोध करीत करीत सगर राजाचे पुत्र हिंडत असतां, त्यांना घोडा कोठेंही दृष्टीस पडेना. तेव्हां त्यांनीं पृथ्वीला भोंक पाडून पाताळांत घोडा शोधण्याचा प्रयत्न केला; पण त्या पाडलेल्या भोंकांतून पृथ्वीवर एकसारखें पाणी येऊन जिकडे तिकडे जलमय होऊन गेलें. सगराच्या पुत्रांनीं तो जलसंचय पृथ्वीवर आणला, म्हणून त्याला सगर असें म्हणतात. त्या पाडलेल्या विवरांतून सगराचे साठहजार पुत्र पाताळांत गेले व तेथें घोड्याचा शोध करूं लागले, तों घोडा कपिल महामुनींचे आश्रमांत बांधलेला दिसला. तेव्हां

त्या राजपुत्रांना, ऋषीनेंच घोडा बांधला असा संशय आल्यावरून, त्यांनीं ऋषीला ओढलें व घोडा चोरला म्हणून दोष देऊं लागले. राजपुत्रांचा असा उन्मत्तपणा पाहून ऋषीला फार क्रोध आला व त्यांनीं ते साठसहस्र राजपुत्र शापानें जाळून टाकले. इकडे घोड्याचाही शोध नाहीं व पुत्रही येत नाहींत, असें पाहून सगर राजा फार काळजींत पडला. त्या राजाचा असीमा नांवाचा एक नातू होता. त्याला शेवटीं राजानें पुत्रांच्या शोधार्थ पाठविलें. तो असीमा शोध करीत करीत कपिल मुनीचे आश्रमीं आला. तेव्हां, तो घोडा व जळत असलेले पितर त्याच्या दृष्टीस पडले. मग त्या असीमानें कपिल मुनीच्या चरणांवर मस्तक ठेवून, त्यांची अनन्यभावानें क्षमा मागितली व पितरांना जिवंत करावें म्हणून विनंति केली. त्यावेळीं कपिल मुनी म्हणाले, ‘ हे असीमा ! या तुझ्या पितरांचा उद्धार करण्यास स्वर्गातील एक गंगा मात्र समर्थ आहे. तिचें पाणी यांच्यावर टाकल्यास त्यांची या अधःपातापासून मुक्ति होईल. ’ कपिल मुनीनें असें सांगितल्यावर, असीमा आपल्या नगराला परत आला व त्यानें झालेला सर्व प्रकार आपल्या पितामहाला निवेदन करून, आपण गंगेच्या प्राप्तीसाठीं तपश्चर्या करीत बसला. त्यानें अनंत वर्षें तपश्चर्या केली व शेवटीं तींतच अंत झाला. पण त्याला गंगेची प्राप्ति झाली नाहीं. पुढें त्याचा पुत्र दिलीप गंगेच्या प्राप्तीसाठीं तपश्चर्येला बसला. पण त्यालाही गंगेची प्राप्ति न होतां, त्याचाही तपश्चर्या करण्यांतच अंत झाला. पुढें त्याचा पुत्र भगीरथ यानें एकनिष्ठपणें एक सहस्र वर्षें

तपश्चर्या केल्यावर, सालंकृत अशी एक शुभ्र वस्त्र परिधान केलेली, व शुभ्र चोळी घातलेली पवित्र व शांत स्त्री त्याच्या स्वप्नांत आली व ती भगीरथाला म्हणाली, ' हे भगीरथा ! तुला मी प्रसन्न झालें आहे व त्याप्रमाणें मी पृथ्वीवर येण्यासही तयार आहें. परंतु माझी गति सहन करण्याला योग्य असें पात्र पहा, म्हणजे मी पृथ्वीवर येईन. ' असें सांगून गंगा अदृश्य झाली. मग भगीरथ राजानें तपश्चर्येनें महादेवास प्रसन्न करून घेतलें व म्हणाला, ' भगवन् ! स्वर्गंगेचा ओघ सहन करण्यास पृथ्वीवर योग्य असें पात्र नाहीं, तेव्हां ती आल्याबरोबर आपण तिला मस्तकीं धारण करावी. ' महादेवानें ' तथास्तु ' म्हणून भगीरथ राजाची विनंति मान्य केली. तेव्हां राजानें गंगेची प्रार्थना करून तिला येण्याविषयीं सुचविलें. त्याबरोबर स्वर्गांतून धो धो करीत गंगा आली. तिला महादेवानें आपल्या मस्तकीं धारण केल्यावर, त्यांतून एक जवभर गंगा भगीरथ राजाला दिली. राजा रथांत बसून निघाला व त्याच्या मागें गंगाही जाऊं लागली. वाटेंत हिमालय आडवा आला. राजानें इंद्राची प्रार्थना करून त्याचा ऐरावत मिळविला, व त्याच्याकडून पर्वत फाडून गंगेच्या ओघाला मार्ग दिला. पुढें राजानें ज्या ठिकाणीं आपले पूर्वज जळून भस्म झाले होते, तेथें गंगा नेऊन तिचें उदक त्यांच्यावर टाकून त्यांचा उद्धार केला.

पृथ्वीवर गंगेचें आगमन कसें झालें, याविषयीं जनमेजय राजानें वैशंपायन ऋषीस विचारल्यावरून वरील कथा ऋषींनीं

राजास सांगितली. पुराणें चांगलीं कां वाईट, हा वाद थोड्या दिवसांपूर्वीं बराच माजून राहिला होता. पुराणांमध्यें वाईट गोष्टी आहेत, चांगल्याही आहेत. चांगलें असेल तें घ्या, वाईट असेल तें टाकून द्या. यःकश्चित् क्षुद्र पदार्थ देखील तिखटमीठ लावून रसभरित करतां येतो. पुराणांनीं सुधारणा सोपी केलेली आहे. मात्र त्यांतील चोथा टाकून देऊन रस घेतला पाहिजे. वरील कथा ही पुराणांतीलच आहे.

गंगा स्वर्गांतून पृथ्वीवर आणण्याचा प्रयत्न अजस्र होता. अशा प्रयत्नांना आपण **भगीरथ-प्रयत्न** म्हणतों. जे खरोखर थोर पुरुष असतात, ते पूर्वजांच्या उच्च भावना महान् संकटें सहन करून देखील सिद्ध करितात. भगीरथराजाच्या प्रयत्नांत हेंच तत्त्व मुख्यत्वें आपणांस दिसेल. अंतःकरणाच्या खऱ्या तळमळीनें, दृढ निश्चयानें व अविरत परिश्रमानें हजारों वर्षें घोर तपश्चर्या करून भगीरथानें पूर्वजांना पूनित केलें. राष्ट्राच्या पुनरुज्जीवनाकरितां व नानाप्रकारच्या भौतिक सुधारणा करून त्यायोगें मानवी प्राण्यांचें कल्याण करण्याचे प्रयत्न आजवर बरेच झाले, सांप्रत होत आहेत, आणि पुढेंही होतील. सुवेझ आणि पनामा यांचे कालवे, आल्प्स पर्वतांतून नेलेली रेल्वे, मध्यआफ्रिका, हिमालय आणि उत्तर ध्रुव व दक्षिण ध्रुव यांचा शोध, हिंदुस्थान देश शोधून काढण्याकरितां वास्को-डी-गामा आणि कोलंबस यांच्या आधीं नौकाशास्त्रज्ञांनीं केलेले प्रयत्न व शेवटीं या दोन धाडशी पुरुषांनीं अनेक दुःखें व हालअपेष्टा सोसून शेवटीं हिंदुस्थान व अमेरिकाखंडाचा केलेला शोध, वैमानिककलेंत दिवसानु-

दिवस होत चाललेली प्रगति वगैरे सर्व सुधारणा यशस्वी करण्याचे कामीं लेसेप्स, ड्रेईक, विलिंग्स्टन, नान्सेन, पियरी, शॅकलटन, स्वेनहेडिन व कोलंबस वगैरे थोर पुरुषांनीं जे अविश्रांत परिश्रम केले ते, व आजच्यासारखीं प्राचीनकाळीं प्रवासाचीं वगैरे साधनें अनुकुल नसतांही आपल्या शूर, धाडशी व कर्तृत्ववान् पूर्वजांनीं हिमालय, विंध्याद्री व दंडकारण्य इत्यादि अज्ञात प्रदेश सुपीक करून आर्यांच्या वसाहती स्थापन केल्या, घारापुरी, वेरूळ व कार्लें व वगैरे ठिकाणीं डोंगर कोरून लेणीं कोरिलीं, पर्वतांच्या उच्च शिखरांवर देवालयें बांधिलीं, व चीन, जपान, जावा, पेरू आणि मेक्सिको वगैरे देशांपर्यंत जलपर्यटण करून आपल्या देशाची औद्योगिक प्रगति करण्याकरितां जे दीर्घोद्योग केले, त्यांना आपण **भगीरथ-प्रयत्न** म्हणूं या.

श्रद्धा बलवती आणि चैतन्यदायिनी आहे. कोणत्याही राष्ट्रामध्यें ज्या मानानें आत्मश्रद्धा असते, त्या मानानें त्या राष्ट्राचा इतिहास फलद्रूप आणि उन्नतिकारक होतो. आरबस्तानासारख्या वालुकामय प्रदेशामध्यें आणि आरब लोकांसारख्या आडदांड व रानटी लोकांवर आपल्या धर्माची छाप बसवून, महंमदानें दिल्लीपासून ग्रेनेडपर्यंत इस्लामी धर्माचा झेंडा फडकाविला ! ऐषआरामाचीं सर्व साधनें अनूकुल असतां त्यांत बिलकूल न पडतां, परार्थ साधण्यासाठीं खडतर व कष्टप्रद मार्गाचें स्वसंतोषानें अवलंबन करून बौद्धधर्माचा प्रसार करण्याकरितां गौतमबुद्धाला कितीतरी भगीरथ–

प्रयत्न करावा लागला ! श्रद्धेची आणि दिव्यज्ञानाची ज्योत हृदयांत पाजळत ठेवल्याशिवाय आपणांला कांहींही साध्य व्हावयाचें नाहीं व लोककल्याणाकरितांच आपला जन्म आहे, हेंच ध्येय पुढें ठेवून, साधनसंपत्तीचा अगदीं अभाव असतांही व एकंदर परिस्थिति निराशाजनक असतांही एकट्या शिवाजीमहाराजांनीं स्वतंत्र राष्ट्राची स्थापना केली ! खरी श्रद्धा व दिव्यज्ञान हींच सर्व यशस्वी चळवळींचें चैतन्य होत, याची त्यांनीं जगाला साक्ष पटविली.

आज रेल्वे, तारायंत्र, आगबोट, टपाल व मोठमोठे यांत्रिक कारखाने यांपासून एकंदर मनुष्यजातीला जें सुख होत आहे, तें चुटकीसारखें मिळूं लागलें काय ? किंवा अरेबियन नाइट्समधल्या कंदिलावरून हात फिरवितांच ह्या गोष्टी आपल्या देशांत आल्या काय ? नाहीं. त्या प्रस्तुत योग्यतेस आणण्यासाठीं उद्योगी माणसांनीं भगीरथ प्रयत्न करीत आयुष्यें घालविलीं, अगणित द्रव्य खर्च केलें, लक्षावधि माणसें कित्येक वर्षें त्या त्या कामांत राबविलीं, मोठमोठे डोंगर फोडले, गंगा-यमुनेसारख्या मोठ्या नद्या व वसईसारख्या जंगी खाड्यांवर पूल बांधिले, लोखंडाचा रस करून त्याचीं अनेक यंत्रें बनविलीं, आणि नंतर त्यांच्या श्रमरूपि वृक्षराजोंस आजच्यासारखीं राष्ट्रीय सुखाचीं सुंदर फळें आलीं ! ज्या उद्योगाच्या दिशेचें पर्यवसान राष्ट्रीय कल्याणांत होतें, तो उद्योग आरंभीं जरी कष्टप्रद वाटला, त्यांत लवकर यश आलें नाहीं, आणि एखादेवेळीं कांहीं अपरिहार्य कारणांमुळ तो अंगावर आला, तरी

त्याची चिकाटी सोडतां कामा नये. स्वर्गांतून गंगा आणण्याचा प्रयत्न करीत असतांना, भगीरथाचा पिता आणि पितामह यांचा अंत झाला होता. तरी भगीरथानें तोच उद्योग हातीं धरून स्वीकृत कार्यांत यश मिळविलें. उद्योगाची पराकाष्ठा करितात, तेच पुरुष सर्वांत अधिक भाग्यवान् होत. सध्यांच्याकाळीं भगीरथाप्रमाणें हजारों वर्षांचें आयुष्य माणसाला नसलें तरी, साधारणतः ६० पासून ८० वर्षांपावेतों मनुष्याचें आयुष्य असतें. मायकेल आंजेलोनें ४० वर्षांत ज्याप्रमाणें मोझेसचा पुतळा कोरिला, त्याप्रमाणें संसारांतील प्रत्येक माणसाला आपल्यापुढील ४० वर्षांच्या आयुष्यांतून स्व-चरित्राचा पुतळा कोरावयाचा असतो.

मागसलेल्या जातींत शिक्षणप्रसार करण्याकरितां ज्यांनीं आजवर भगीरथ प्रयत्न केले व सांप्रत करीत आहेत, त्या सर्वांत अमेरिकेंतील व्हार्जिनिया प्रांतांतील हाम्पटन गांवीं जनरल सी. आर्मस्ट्रांग यांनीं निग्रो लोकांच्या उन्नतीकरितां स्थापन केलेल्या हाम्पटन संस्थेचा नंबर पहिला लागेल, यांत संशय नाहीं. याच संस्थेंत शिकन तयार झालेले व ज्यांनीं आपल्या जातीचें कल्याण करण्याकरितां स्वतःस सर्वस्वीं वाहून घेतलें आहे, असे बुकर टी. वॉशिंग्टन यांचें चरित्र नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. तें वाचून एक मनुष्य देखील दीर्घोद्योगाच्या बळावर किती महत्त्वाची शिक्षणविषयक कामगिरी बजावूं शकतो, याची चांगली साक्ष पटते. अलिकडे आमच्या देशांत शिक्षणाविषयक जागृति झाली आहे व निरनिराळ्या जातींच्या

शिक्षणविषयक परिषदा दरसाल भरत असतात किंबहुना कित्येक जातींचें परिषदांशिवाय मुळींच चालेनासें झालें आहे. आपल्या जातीची शिक्षणविषयक उन्नति करण्याची ज्यांना अंतः-करणापासून खरी उत्कट इच्छा असेल, त्यांनीं निग्रो लोकांच्या उन्नती-प्रीत्यर्थ जनरल सी. आर्मस्ट्रांग यांनीं हाम्पटन येथें व बुकर टी. वॉशिंग्टन यांनीं टस्केजी येथें चालविलेल्या भगीरथ प्रयत्नांचें निरीक्षण करून, त्या दिशेनें उद्योग करावा, अशी त्यांस प्रार्थना आहे. आमच्या इकडे अस्पृश्य लोकांच्या उद्धाराकरितां 'भारतीय निराश्रित साहाय्यक मंडळी'नें याच तत्त्वावर प्रयत्न चालविले आहेत, व प्रयत्नांच्या मानानें त्यांत यशही येत आहे. इंग्रज सरकारच्या कृपाछत्राखालीं शिक्षणप्रसाराचे सर्व मार्ग मोकळे आहेत. विद्याप्रसारासाठीं सरकार-चेही प्रयत्न चालले आहेत. बडोद्यास भरलेल्या **मराठा-शिक्षण-परिषदे**च्या वेळीं **महाराज सयाजीराव गायकवाड** यांनीं केलेल्या सुंदर भाषणांत सांगितल्याप्रमाणें आमचे पुढारीही आपल्या समाजांत शिक्षणप्रसार करण्याचे कामीं अधिक लक्ष्य घालतील तर, त्यांस यश आल्याखेरीज राहणार नाहीं. मुसलमानांत सर सय्यद अहंमद यांनीं भगीरथ प्रयत्न करून बरेंच मोठें शिक्षणविषयक कार्य घडवून आणलें, आणि एकंदर मुसलमान जातीस उन्नतदशेस आणून पोहोंचविलें. त्यांनीं केलेल्या कर्तबगारीचा ठसा मुसलमान बंधु-भगिनींच्या मना-वर कायमचा उमटला आहे. जोंपर्यंत अलिगड कॉलेजाचें नांवनिशाण जगांत राहील, तोंपर्यंत सर सय्यद अहंमद यांचें नांव प्रत्येकाच्या

स्मरणांत राहिलेंच पाहिजे. आमच्या समाजांत सर सय्यद अहमद यांच्यासारखा महात्मा निर्माण होईल काय ?

जगाचें कल्याण हेंच आपलें कल्याण असें समजून ज्यांनीं भगीरथ प्रयत्न करून जगावर अक्षय्य उपकार केले व सांप्रत करीत आहेत, व स्वार्थत्यागाचीं आणि परोपकाराचीं तत्त्वें ज्यांनीं आयुष्य-भर तंतोतंत पाळिलीं, अशा महात्म्यांचें स्मरण करून व त्यांचें अंशतः तरी अनुकरण करावयाची वाचकांत स्फूर्ति उत्पन्न करण्या-विषयीं परमेश्वराची प्रार्थना करून मी आपला लेख संपवितों.

## १६.—निराश्रित-मराठा-विद्यार्थी-आश्रम-बडोदें.

[ **मराठामित्र**—जानेवारी, १९१०. ]

बडोदें येथील **निराश्रित-मराठा-विद्यार्थी-आश्रमाचा** सन १९१२-१३ सालचा वार्षिक अहवाल आश्रमाचे सन्माननीय सेक्रे-टरी रा. रा. दशरथराव हरी पवार यांजकडून नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून असें समजतें कीं, हा आश्रम सन १९१० सालीं स्थापन करण्यांत आला असून, रिपोर्टाचे सालीं एकंदर १४ वि-द्यार्थी या आश्रमाचा लाभ घेत आहेत. आश्रमाचे ४० सभासद असून, त्यांपैकीं २५ सभासदांकडून रिपोर्टाचे सालीं ६६३ रुपयांची

रक्कम वर्गणीच्या रूपानें मिळाली. त्यांपैकीं **श्री. युवराज्ञी पद्मावतीबाई-साहेब** व **श्री. संपतराव गायकवाड** यांजकडून मिळालेले ४१० रुपये वजा जातां बाकी २५३ रुपये इतर वर्गणीदारांकडून मिळाले. तसेंच, आश्रमास देणगीच्या रूपानें ३४९-१२-० मिळाले असून, त्यांपैकीं ३१० रुपये मराठेतर मंडळीकडून मिळाले आहेत, ही विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट होय. रिपोर्टाचे सालीं ज्या सभासदांकडून आश्रमास मुळींच मदत झाली नाहीं, किंवा कबूल केलेली वर्गणीची रक्कम देण्यास नुसती सुरुवात करण्याचेंही उभ्या वर्ष दीड वर्षांत ज्यांनीं मनांत आणिलें नाहीं, अशा सभासदांची संख्या १५ असून, त्यांचेकडे रिपोर्टाचे सालअखेर ७५८-८-० बाकी व संस्थेचे हेतु मान्य होऊन ज्या उदार गृहस्थांनीं विशेष प्रसंगानिमित्त देणग्या देण्याचीं अभिवचनें दिलीं आहेत, त्यांजकडे ४०७-०-० मिळून एकंदर ११६५-८-० इतकी रक्कम वसूल येणें आहे. केवळ लोकाश्रयावरच सर्वस्वीं अवलंबून असणाऱ्या अनाथाश्रमासारख्या संस्थेच्या वर्गणीची इतकी मोठी रक्कम फक्त तीन वर्षांच्या अवधांत तिच्या आश्रयदात्यांकडे तुंबून राहावी, याबद्दल आह्मांस सखेदाश्चर्य वाटतें. संस्थेच्या चालकांनीं रिपोर्टाच्या सालीं कांहीं जणांकडे बऱ्याचवेळां उघराण्या केल्या, पण त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं, असें रिपोर्टावरून समजतें. या आश्रमास **श्री. युवराज्ञी पद्मावतीबाई-साहेब** व **श्री. संपतराव गायकवाड** यांचाच मुख्यतः आश्रय असून, आश्रमांतील विद्यार्थ्यांवर त्यांचें स्वतःच्या मुलांप्रमाणें प्रेम आहे, 'हें त्यांस व ज्यांनीं आपल्या शक्त्यनुसार आजपर्यंत हस्तेंपर-

हस्तें या संस्थेस मदत केली आहे, त्यांस खरोखर भूषणावह आहे.

वरील हकीकतीवरून आश्रमाची सांपत्तिक स्थिति असावी तितकी समाधानकारक नाहीं, हें उघड दिसतें. दिव्याला तेल थोडेंच पुरतें; पण, तें वेळच्यावेळीं मिळालें पाहिजे. ह्या न्यायानें, फक्त १४ विद्यार्थ्यांच्या आश्रमाचा खर्च निभावण्यास उदार अंतःकरणाच्या लोकांकडून वेळच्यावेळीं मदत झाली पाहिजे. आश्रमास निरनिराळ्या रूपानें मदत करण्याविषयीं सेक्रेटरींनीं आपल्या मराठे बंधूंस विनंति केली आहे. एका विद्यार्थ्यास दरमाहा सरासरी ८ रुपये खर्च येतो. परंतु कोणी दरमहा फक्त५ रुपये देऊन एखादा अनाथ विद्यार्थी आश्रमांत पाठविल्यास, त्याचा बाकीचा खर्च आश्रमांतून करण्यांत येईल. ह्या सवलतीचा लाभ मराठा समाजांतील समंजस धनिक घेतिल, अशी आशा आहे. अनाथाश्रमासारख्या संस्थांची उपयुक्तता आतां सर्वमान्य झाली असून, त्यांचे गोडवे गाण्याचे दिवस कधींच निघून गेले आहेत. अशा संस्थांना सढळ हातानें मदत करून, तिच्या संस्थापकांनीं चालविलेल्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणें, हें लक्ष्मीची ज्याच्यांवर बहाल मर्जी आहे, अशा मराठा समाजांतील उदार धनिकांचें आद्य कर्तव्य आहे. आमचे बडोदकर मराठे बंधु आपलें कर्तव्य दिलदारपणानें बजावितील आणि स्वार्थ व परमार्थ किंवा व्यक्तिदृष्टि स्वार्थ व समाजदृष्टि स्वार्थ साधतील, अशी आशा आहे.

या ठिकाणीं आम्हांस एक सूचना करावीशी वाटते. पूर्वीं बडोदें राज्यांत खिचडी, भाकरी, गोप्रदानें यांप्रीत्यर्थ बराच खर्च होत असे.

त्या खर्चापैकीं कांहीं रकमेची बचत होत असल्याचें ऐकितों. या रकमेचा कांहीं अंश या आश्रमास मिळाल्यास, मूळ उद्देश बराच सफळ होईल, असें वाटतें. आमच्या मराठे बंधूंस शिक्षणाच्या बाबतींत पुढें आणण्याच्या कामीं विद्याभिलाषी **श्री. महाराज सयाजीराव गायकवाड** यांनीं आजवर बरेच दीर्घोद्योग केले आहेत व सांप्रत करीत आहेत. त्याबद्दल कृतज्ञ मराठा समाज महाराजांचा ऋणी राहील. गरीब मराठे विद्यार्थ्यांच्या फुकट शिक्षणाची सोय महाराजांनीं नुकतीच केली आहे. आतां या लहानशा अनाथाश्रमास श्रीमंतांनीं उदार अंतःकरणानें मदत करून त्याचें कार्यक्षेत्र अधिक वाढवावें, अशी त्यांस अत्यंत नम्रतापूर्वक विनंति आहे.

शेवटीं आमच्या सर्व समाजबांधवांस या अनाथाश्रमास तन-मन-धनेंकरून मदत करण्याविषयीं पुन्हा विनंति करून आणि ज्यांनीं ज्यांनीं आश्रमाच्या ऊर्जितावस्थेकरितां निरपेक्षबुद्धीनें आजवर सतत प्रयत्न केले व जे सध्यां करीत आहेत, त्यांनीं आपले प्रयत्न असेच चालू ठेवून आश्रमाची व आश्रमद्वारा या अनाथ लेंकरांची उन्नति करण्यास झटावें व अशा प्रकारचे अनाथाश्रम स्थापन करण्याविषयीं इतर ठिकाणच्या मराठे बंधूंनीं मनःपूर्वक प्रयत्न करावेत, अशी त्यांस मी विनंती करितों.

**समाप्त.**

स्वार्थ व परमार्थ साधण्याची अमोल संधि ! ! !

# कै० श्रीमंत रुद्राजीराव राजे महाडिक

## तारळेकर इनामदार

## यांचें चरित्र.

लेखकः—भगवंत बळवंत पाळेकर.

पुस्तकाचें उत्पन्न मराठा-शिक्षण-परिषदेच्या फंडास द्यावयाचें आहे.

**अभिप्रायसंग्रहः—**

इंदुप्रकाश, मुंबईः-"कै० राजे महाडिकांचा स्वार्थत्याग, दीर्घोद्योग, मराठा-शिक्षण-परिषदेकरितां त्यांनीं केलेले अव्याहत परिश्रम इत्यादि महत्त्वाचे गुण चरित्रांत घेण्यासारखे असून, त्यांचें मार्मिक विवेचन रा. पाळेकर यांनीं या लहानशा पुस्तकांत चांगल्या रीतीनें केलें आहे." इ०

लोकमित्र, खानापूरः—स्वार्थत्याग, सार्वजनिक हितबुद्धि, व स्वजनकार्यार्थ तत्परतेनें झटण्याची तयारी, ह्या प्रशंसनीय गुणांची ओळख ह्या अल्प चरित्रावरून होणार आहे.

**ज्ञानप्रकाश, पुणें**:—" रुद्राजीराव राजे महाडिक मराठा समाजाचे एक प्रमुख पुढारी होते. महाडिकांचें घराणें इतिहासप्रसिद्ध असून महाराष्ट्रांत त्याची परंपरा आज साडे तीनशें वर्षांची आहे. मराठ्यांच्या विद्याप्रसाराच्या व एकंदर चळवळीशीं प्रमुख पुरस्कर्ते किंवा प्रस्थापक या नात्यानें श्रीमंत राजे महाडिक यांचा निकट संबंध असे. सदाचाराचा बोध थोर पुरुषांच्या चरित्रांच्या द्वारें उत्तम होतो असें जें पुस्तकाच्या आरंभीं प्रकाशकांनीं म्हटलें आहे, त्याप्रमाणें या लहानशा पुस्तकाच्या वाचनानें आमच्या मराठे बंधूंत स्फूर्ति उत्पन्न होऊन त्यांच्या हातून स्वोन्नतीचे प्रयत्न होवोत, असें आम्ही इच्छितों " इ०

**दीनमित्र, सोमठाणें**:—" रा. महाडिक यांनीं मराठे लोकांसाठीं अलिकडे स्वतः आजन्म वाहून घेतल्यानें त्यांची मराठ्यांत विशेष प्रसिद्धी झाली होती. अशा कळकळीच्या गृहस्थाचें त्रोटक इतिवृत कळणें अवश्य आहे. तरी प्रत्येक मराठे गृहस्थानें हें पुस्तक एकवेळ जरूर वाचावें. " इ०

**चिकित्सक, बेळगांव**:—" समाजसेवेच्या रणक्षेत्रावर आज कित्येक वर्षें अविश्रांत तळपत असलेल्या या दिवंगत मराठ्याचें चरित्र प्रत्येक समाजसेवकानें संग्रहींच ठेविलें पाहिजे. मनुष्याचा दृढ निश्चय मात्र पाहिजे, तो त्या निश्चयाच्या बळावर काय करूं शकतो, हें शिकण्यास कै. राजे महाडिक यांचें चरित्र केवळ आदर्शवत् आहे." इ०

**सचित्र विनोद, मुंबई**:—" कै० श्री. रुद्राजीराव यांचें चरित्र. अशा कर्तव्यदक्ष थोर पुरुषांचीं चरित्रें ह्मणजे आजकालच्या समाजास झालेल्या ' निद्रा ' रोगावर एक प्रकारचा रामबाण उपाय होय. रुद्राजीराव यांचें शिक्षण फक्त मराठी पांचवे यत्तेपर्यंतच झालेलें असतां, त्यांनीं बजाविलेली कामगिरी ही हल्लींच्या बोलक्या सुशिक्षितांच्या डोळ्यांत अंजन घातल्याशिवाय राहणार नाहीं. आज मराठ्यांत जी एक प्रकारची चेतना उत्पन्न झाली आहे, तिचें सर्व श्रेय ह्या चरित्रनायकासच देणें उचित आहे, असें आह्मांस वाटतें. कै. रुद्राजीराव हे आपल्या ज्ञानज्योतीच्या उजेडानें आपल्या ज्ञातबांधवांस पुढील मार्ग दाखवीत असतां अकस्मात् त्यांचा काल व्हावा, यावरून आमच्या मराठ्यांचें नष्टचर्य अद्याप संपलें नाहीं, असें म्हणावें लागतें "

**श्रीशाहू, सतारा**:—" कै० श्री. रुद्राजीराव राजे महाडिक इनामदार हे या जिल्ह्यांतील तारळें, ता. पाटण येथील रहिवाशी होत. यांच्या आकस्मिक मृत्युमुळें मराठा समाजाची मोठीच हानि झाली आहे. या चरित्रामध्यें महाडिक घराण्याची पूर्वपीठिका, रुद्राजीराव यांचें चरित्र, त्यांचा सार्वजनिक उद्योग, भाषण वगैरे माहिती थोडक्यांतच पण उत्तम दिली आहे. तरी अशा पुस्तकाचा संग्रह प्रत्येकजणांनीं अवश्य करावा. " इ०

**भारतमाता, इस्लामपुर**:—" कै० रुद्राजीराव यांनीं मराठा समाजाची केलेली सेवा यांत त्रोटक पण चटकदार भाषेंत वर्णन केलेली आहे. " इ०

**पंचम जॉर्ज विजय, बेळगांवः**—“ श्रीमंत रुद्राजीराव हे ‘ मराठा ज्ञातीचे पुढारी व कर्त्यांतले कर्ते पुरुष ’ होते. हे गेल्या मेच्या २० व्या तारखेस कैलासवासी झाले. नुकत्याच आपल्या पायांवर उभा राहूं लागलेल्या मराठा समाजाची ही मोठी हानि झाली आहे. कै. श्री. रुद्राजीरावांची किंमत मराठा समाज जाणतो आहे, नाहीं असें नाहीं. पण त्यांच्या निधनप्रसंगाच्या ताज्या आठवणींत अल्पसें चटकदार चरित्र बरेंच परिणामकारक होईल यांत शंका नाहीं. हें चरित्र त्रोटक खरें; पण लेखकानें या संक्षिप्तपणांत श्रीमंतांचें संपूर्ण चरित्र गुंफण्याचें चांगलेंच कौशल्य दाखविलें आहे. भाषाही चांगली आहे. प्रत्येक मराठ्यानें ( महाराष्ट्रीयानें ) हें लहानसें पण उत्तम परिणामकारक असें चरित्र आदर्श म्हणून जवळ अवश्य ठेवावें. ”

**शुभसूचन, साताराः**—“ राजे महाडिक हे सातारा जिल्ह्यांतील तारळ्याचे इनामदार असून, मराठा ज्ञातीपैकीं कार्यकर्ते पुढारी होते. त्यांनीं आपल्या ज्ञातीच्या उद्धारार्थ अविश्रांत खटपट करून, मराठा–शिक्षण- परिषदेसारखी संस्था चांगली उदयास आणिली होती. यांचें हें चरित्र संक्षिप्त असून त्याची किंमत पाऊण आणा आहे. यांचें विस्तृत चरित्र प्रसिद्ध होण्याची अवश्यकता असून तदभावीं हें अल्प किंमतीचें चरित्र वाचनीय आहे, यांत शंका नाहीं. ” इ०

**महाराष्ट्र, नागपुरः**—श्री. रुद्राजीराव राजे महाडिक, मराठा जातींतले कर्त्यांतले कर्ते पुढारी, यांचें त्रोटक चरित्र. रुद्राजीराव हे मराठा-शिक्षण-परिषदचे पंचप्राण होते. स्वजातीच्या उन्नतीसाठीं ते अहर्निश झटत असत. त्यांचें चरित्र बोधप्रद व अनुकरणीय आहे. " इ०

**प्रभात, गोवाः**-श्री रुद्राजीराव राजे महाडिक यांचें हें चरित्र बरेंच बोधप्रद आहे. स्वतःच्या समाजाची स्थिति सुधारण्याकडे श्री. महाडिकांप्रमाणें आमचे मराठेबंधु, इतर जातींशीं हमरी तुमरी करीत न बसतां, समाजाची स्थिति सुधारण्याकडे लक्ष देतील तर, त्यांचा जास्त फायदा होईल असें आम्हांस वाटतें. "


## वसुंधरा एजन्सी.

ह्या एजन्सीत हरएक प्रकारच्या मालावर योग्य कमिशन घेऊन क्रयविक्रय केला जातो. गरजूंनीं एकवेळ अनुभव घ्यावा. जास्त माहिती समक्ष अथवा पत्रद्वारें.

**सी. ए. तापकीर,**
प्यालेस रोड—**बडोदें.**

# आश्रयदात्यांचीं नांवें.

## बडोदें.

मे. रा. रा. श्रीपतराव रामचंद्र चिखले.
,, अमृतराव गुजाबा टेकळे.
,, आनंदराव गणपतराव कड्डु.
,, आनंदराव गणपतराव शिंदे.
,, आनंदराव गणपतराव गोडसे.
,, आनंदराव धर्माजीराव कोल्हेकर
,, आनंदराव बबेराव गवारे.
,, आनंदराव नारायण निकम.
,, आनंदराव रंभाजीराव गोडसे.
,, आनंदराव भाऊसाहेब पाटणकर.
,, आनंदराव रामजी कदम.
,, आप्पाजी भगवंतराव दिवटे.
,, ऑफिस लायब्ररी धी गार्ड्स.
,, अंबादास मार्तंड.
,, काशिराम अमृतराव भांड.
,, काशीराम आत्माराम पवार.
, किसनसिंग सरदारसिंग.
,, केशवराव भवानराव शिंदे.
,, केशवराव काशीराम गोपाळे.
,, केशवराव नरहरी ढेकाणे.
,, केशवराव भाऊराव साळुंखे

मे. रा. रा. कोंडाजी हरीबा मवडे.
,, देवीभक्त कृष्णराव भवानराव कदम.
,, कृष्णराव नारायण साळुंखे.
,, कृष्णराव बोडके.
,, कृष्णाजी विठ्ठल सुर्वे.
,, कृष्णाजी यशवंत दाते.
,, खासेराव रावजीराव जाधव.
,, खंडेराव पिलाजीराव शिंदे
,, खंडेराव विठोबा गायकवाड.
,, खंडेराव कृष्णराव पवार.
,, खंडेराव आनंदराव बोडके.
,, खंडेराव शिवबा रावडे.
,, खंडेराव दाजीबा चव्हाण ऊर्फ शहाणे.
क्यापटन गणपतराव हणमंतराव पवार.
जमादार गणपतराव बाळोबा मोरे.
मे. रा. रा. गणपतराव बळवंतराव शिंदे.
,, गणपतराव बाजीराव सोमवंशी.
,, गणपतराव हणमंतराव शहाणे.
,, गणपतराव यशवंतराव नवले.
,, गोपाळराव सावळेराम रावडे.
,, गोविंद गोपाळ बोरकर.

मे. रा. रा. गोविंदराव बोरसे.
,, गोविंदराव महिपतराव गायकवाड.
,, गोविंद अनंत वाघ.
,, ग्यानबा कानोबा थोरात.
,, ग्यानबा जिवाजी शिर्के.
,, चिमणराव अमृतराव तापकीर.
,, चिमणराव शिवाजीराव चव्हाण.
,, चिंतामण कृष्ण पेटलादकर.
,, चंद्रसिंग माहासिंग.
,, छमनसिंग वालुसिंग.
,, जे. जे. सावंत, एक्झि० एन्जि०
,, जगन्नाथ बाळाजी मेंढरे.
,, तुकाराम दौलती मोरे.
,, त्रिंबक रामचंद्र पाबळकर.
,, दतवतसिंग राजे शिर्के.
,, दशरथराव हरी पवार.
,, दत्ताजीराव रघुनाथराव राणे.
,, दादासाहेब यादवराव देशमुख.
,, दादासाहेब पांडुरंगराव जाधव.
,, दिवाणजी तात्यासाहेब शिर्के.
,, दौलतराव रामचंद्रराव भोइटे.
,, दौलतराव भाऊराव सकपाळ.
,, नथोबा नारायण गायकवाड.
,, नरहरी जानकोजी खर्डे.
,, नथुराव केशवराव शिंदे.
,, नरहरी सांवळाराम गायकवाड.

मे. रा. रा. नथोबा दादाजी वराडे.
,, नथुभाऊ माधवराव गायकवाड.
,, नरहरी हरीबा गायकवाड.
मेजर नानासाहेब शिंदे.
मे. रा. रा. नामदेवराव रामचंद्रराव कदम.
,, नारायण देवजी सुर्वे.
,, नारायणराव मल्हारराव घाडगे.
,, नारायणराव दगाजीराव शेवाळे.
,, नाना माधवराव लाड.
,, नारायणराव मोहिते.
,, नारायणराव केशवराव गायकवाड.
,, नारायण चापाजी सीधे.
,, निळकंठराव रावजी काळे.
,, परवतराव माधवराव शिर्के.
,, पांडुरंगराव जिजाबा जगताप.
,, पांडुरंगराव नारायण ताटे.
,, पांडुरंग नारायण शिर्के.
,, पांडुरंग रामचंद्र घंगाळे.
प्रेसिडेंट रेजिमेंट लायबरी.
मे. रा. रा. बळवंतराव माधवराव.
,, बळवंतराव लक्ष्मण महाडीक
,, बळवंत सदबा थरकुडे.
मेजर बाजीराव सावंत.
ना. स. बापुराव पिलाजीराव सोळस्कर,
मे. रा. रा. बाबू बाबाजी कदम.
,, बारीकराव लक्ष्मणराव गवळी.

मे. रा. रा. बाळासाहेब हणमंतराव काळे.
,, बाळासाहेब भाऊराव गायकवाड.
,, बाबुराव यशवंतराव जाधव
,, बाबुराव यशवंतराव कराळे
,, बापुसाहेब सखाराम शिर्के.
,, बाळासाहेब दर्याजीराव जगताप.
,, बापुसाहेब कृष्णाजी फरताळे.
,, बुवासाहेब रामचंद्रराव राजे शिर्के.
,, भगवंतराव भिवबा मोरे.
,, भाऊराव बाबाजीराव मोहिते.
,, भाऊराव दाजी कदम.
,, भिकाजी मोरेश्वर.
,, भिकाजीराव रामचंद्रराव पवार.
,, मलबा गुजाबा जाधव.
,, मल्हारराव शामराव गायकवाड.
,, मारोतीराव देवबा पाठारे.
रिसालदार मारुतीराव निंबाळकर.
मे. रा. रा. माधवराव गोपाळराव मोहिते.
,, माधवराव विठोबा राखुंडे.
,, माधवराव आबाजी काजळे
,, माधवराव गणपतराव निंबाळकर.
,, मोहनसिंग दलपतसिंग चावडा.
,, यशवंतराव मल्हारराव.
,, यशवंतराव नानासाहेब शिंदे.
,, यशवंतराव नवलोजी राजे महाडीक.
,, यशवंतराव हरीभाऊ थोरात.

श्री. रा. रा. यादवराव धायबर किल्लेदार.
मे. रा. रा. यादवराव बापुसाहेब ढमढेरे
,, यादवराव लक्ष्मणराव कवडे.
,, यादवराव सदबा वाटेकर.
,, रावसाहेब दाजी देशमुख, एल्. ए. जी.
,, रावसाहेब सदाशिवराव बोचरे.
,, रामचंद्र सयाजी सुर्वे.
,, रामचंद्रराव दौलतराव बाबर.
डॉ. आर. जी. खोत.
श्रीमंत रघुनाथराव जगदेवराव जगताप.
मे. रा. रा. रामचंद्रराव सोनबा पाटोळे.
,, रघुनाथराव विठोजीराव जाधव.
,, राजाराम लक्ष्मणराव गवळी.
,, रामराव माधवराव मोरे.
,, रामराव कृष्णाजी मोरे.
रिसालदार राजाराम त्रिंबक.
मे. रा. रा. रामचंद्र विठोबा शिंदे.
,, रामचंद्र नाना धुमाळ.
,, रामराव आबाजीराव राजे शिर्के.
,, रामचंद्रराव गणपतराव सुर्वे.
,, रामराव विठ्ठल कदम.
डॉ० लक्ष्मणराव गणपतराव माने.
मे. रा. रा. लक्ष्मणराव भाऊराव खैरे.
,, लक्ष्मणराव दाजीबा चव्हाण.
,, लिंबाजी माधवराव सोनवणे.
रिसालदार मेजर वासुदेव मार्तंड.

मे. रा. रा. विठोजी साधोजी सोनवणी.
,, विठ्ठोजी बाबाजी भोंसले.
,, व्यंकटराव सूर्याजीराव धुळप.
,, शंकरराव बळवंत निरगुडकर.
,, एस्. डी. निंबाळकर.
,, शंकरराव दगडोबा निकम.
,, शंकरराव गोविंदराव चिखले.
, शंकरराव गणपतराव पुणेकर.
,, शंकरराव यशवंतराव घाडगे.
,, शिवराम श्रीपतराव मोरे.
,, एस्. टी. शिर्के.
,, सदाशिवराव आनंदराव काळे.
,, सखारामराव दगाजीराव शेवाळे.
,, सखाराम तुकाराम ठाकरे.
,, सखाराम जयशिंगराव धुमाळ.
सेक्रेटरी लायब्ररी पलटण तिसरी.
मे. रा. रा. हणमंतराव तुकाराम निगडे.
हुजुरातपागा लाइब्ररी.

---

## मुंबई.

मे. रा. रा. अमृत गुणाजी सरपरे.
,, आत्माराम भिवाजी तळेकर.
,, आनंदराव भिमाजी खाणवाले.
,, आनंदराव सखाराम सावंत.
,, काशिनाथ जुरन नाखवा.
,, केशव बापूजी जगताप.

मे. रा. रा. केशव कृष्णाजी बामणे.
,, केरू भाऊ लाड.
,, कृष्णराव भिकाजी लालये.
,, कृष्णराव सखाराम चव्हाण.
,, कृष्णाजी बाजी शिर्के.
,, गणपतराव गोडाजी काळे.
,, गणपतराव विठ्ठल सरवदे.
,, गणपत महादेव मालप.
,, गणपतराव नारायणराव सावंत.
,, गणपतराव महादेव भोंसले.
,, गणपत राघोजीराव दरेकर.
,, गजानन भगवंतराव शिर्के.
,, गंगाराम रामजीराव शिर्के
,, गंगाराम काशीराम परब.
,, गोपाळ बापूजी सावंत.
,, चिंतामण मोरेश्वर चव्हाण.
श्रीमती जनाबाई माधवराव रोकडे.
रा. रा. जयराम विठोजीराव चव्हाण.
,, तुकाराम गोविंद पवार
,, तुकाराम सावळाराम फलके.
,, दाजी शिवराम नाईक.
,, दाजी बाबाजी पवार ( वॉचमेकर ).
,, धर्माजी माधवराव रोकडे.
डॉक्टर धाकजी भानजी सावंत.
,, धाकूजी महादेव नाईक.
,, धोंडीबा मनाजी ढवळे.

मे. रा. रा. धोंडीबा महादजी आहेर
,, धोंडीबा यशवंतराव ढोबळे.
,, नारायण सखाराम पेंढारी.
,, नारायण घनःश्याम सावंत.
,, नारायण धोंडू कदम.
,, नागेशराव व्यंकाजी माने.
,, नारायण जनार्दन देसाई.
,, नागु चिमणाजी तावडे.
,, नारायणराव भाऊराव सावंत.
,, नारायणराव रामचंद्र शिर्के.
,, नारायण रामभाऊ.
,, परशराम शिवराम राणे.
,, बळवंत गोविंदराव जागडे.
,, भागोजी महादजी भोर.
,, भिवाजी यशवंत बामणे.
,, भिकाजी गणपतराव सरपरे.
,, महादेवराव मुरारी सावंत.
,, माधवराव मोतीबाराव मोरे.
,, यशवंत भाऊ लोकेगांवकर.
,, यशवंत गोपाळ पाटोळे.
,, येशवंत माणकोजी नाईक.
,, रामचंद्रराव विठ्ठलराव वंडेकर.
,, रामचंद्र नारायण शिंदे.
,, रावजी चिंतामण राणे.
,, रामचंद्र धाळोजी पारकर.
,, रामचंद्र यशवंत पवार.

मे. रा. रा. रामचंद्र बापूजी वांयगणकर.
,, लक्ष्मण कृष्णाजी तळेकर.
,, लक्ष्मण तुकाराम सुमरे.
,, लक्ष्मण बापूजीराव सुर्वे.
,, लक्ष्मण बाळकृष्ण.
,, विठ्ठल रामचंद्र बोदे.
,, विठ्ठल सावळाराम शिंदे.
,, विठ्ठल सयाजी बोऱ्हाडे.
,, विष्णु आबाजी पेंढारी.
,, शंकर सायन्ना परशा.
,, शिवराम सखाराम शिर्के, बी. ए.
,, शिवराम नारायण हिंदळेकर.
,, शिवाजी नारायण मोरे.
,, सखाराम गोपाळ पवार.
,, सखाराम अमृतराव शिंदे.
,, सदाशिवराव भिवाजी साटम नाईक.
,, एस्. एन्. सावंत.
,, एस्. जी. कदम.
,, सी. एस्. आप्पाराव मानाजी.
,, सीताराम आत्माराम राणे.
,, सुरेंद्रनाथ विठ्ठल साळुंखे.
,, हरिश्चंद्र मार्तंड जाधव.

---

## पेटलाद.

रा. रा. भिकाजीराव तुकाराम पवार.
,, हणमंतराव कुशाबा मोरे.

,, लक्ष्मणराव खंडेराव ठोमरे.
,, त्रिंबक रामचंद्र वाठारे.
,, रावजी गंगाराम वाघळे नायगांवकर.
,, हरी तुकाराम काळे.
,, मारोतीराव आनंदराव पवार.
,, मल्हारराव गणपतराव चिंचोडे.

---

**श्रीमंत रामराव अमृतराव ऊर्फ आबासाहेब राजे डफळे संस्थान जत.**

---

**इतर.**

मे. रा. रा. आनंदा नथु पाटील–कळवण.
,, कृष्णाजी सूर्याजी पाटील दळवी-उंबर्डे.
,, गणपत दादा पाटील मोरे-पिंपळगांव बसवंत.
,, गोविंदराव नारायणराव भुझालराव–गोधरा.
मे. गोविंद बाबाजी पेतेकर–जळगांव.
,, गोविंद नारायण लोटे–खामगांव.
,, गंगाराम रामजी पाटील दळवी-उंबर्डे.
,, त्र्यंबक लक्ष्मण कोतवाल–चांदवड
,, नाना सखाराम गुंड–दोंडाइची.
,, परशराम भिकाजी उधार–अमदाबाद
,, पांडुरंग राजाराम पाटील–ओझर.
,, बाबूराव कडूजी पाटील–रेडगांव.
,, बापूसाहेब आनंदराव कदम–खेरवाडी.
,, भाऊराव साबाजीराव सावंत फुपेरकर-लष्कर–ग्वाल्हेर.
,, भीमराज सीताराम डेरले–निफाड.
,, विठोबा आनाजी पाटील जाधव–मु. कांदळस.
,, रावबा भाऊ पाटील थोरात–वणी.
,, रुंजाजी नाना पाटील–मात्ऱ्याची वाडी.
,, शंकरराव कहानजी डांगे–सुरत.
,, सांवळाराम त्रिंबक सोनार-पिंपळगांव बसवंत.

## मुंबई—मागाऊन आलेलीं नांवें.

रा. रा. झीलोबा बाबाजी दळवी.
,, आत्माराम विठ्ठल देसाई.
,, बी. एन्. सावंत
रा. रा. जी. के. पवार.
,, के. के. साळवी.
,, ए. एच. सावंत.

---

नांवें नोंदवा ! ] छापत आहेत ! [ नांवें नोंदवा !

श्रीयुत, कृष्णानुज-कालेकरकृत

# मनोरंजक व बोधपर पुस्तकें.

| नांवें. | किंमत रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| ( १ ) एक बोधपर गोष्ट. | ० | ४ | ० |
| ( २ ) दमयन्ती चरित्र. | ० | ४ | ० |
| ( ३ ) छात्रबोध ( काव्य. ) | ० | ६ | ० |
| ( ४ ) उद्यानांतील तरुणी. | ० | ८ | ० |
| ( ५ ) सिद्धनाथाची पेढी. | ० | १२ | ० |
| ( ६ ) संगीत सुकन्या नाटक. | १ | ० | ० |

अगाऊ नांवें नोंदविणारांस टपाल व व्ही. पी. खर्च माफ. पुढें पोष्ट खर्च निराळा द्यावा लागेल.

## ह्याच ग्रंथकाराचीं इतरत्र छापलेलीं पुस्तकें.

| नांवें. | किंमत रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| ( १ ) अनंग मोहिनी. | ० | १२ | ० |
| ( २ ) शेवटीं गोड तें सर्वच गोड. | ० | १ | ० |
| ( ३ ) नागेश. | ० | १ | ० |
| ( ४ ) मधुर-मीलन. | ० | ६ | ० |

कृष्णानुज-कालेकर,

हुसेनी बिल्डिंग, मुंबई नं. ११.

प्रमुख वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकांच्या संपादकांनीं व महा राष्ट्रांतल्या अनेक विद्वानांनीं अतिशय नावाजलेलें आणि आबालवृद्धांच्या आदरास पात्र झालेलें सचित्र मासिक

# मराठा.

( संपादक )—कृष्णानुज कालेकर.

एप्रिल १९१४ पासून सुरू झालें. यांत मनोरंजक व [illegible] गोष्टी हृदयंगम आणि रसपूर्ण कविता; सुविचारपरिप्लुत व माहितीचे निबंध मार्मिक रीतीनें प्रकट केलेले टीकात्मक प्रासंगिक विचार; इत्यादिक विषयांचा संग्रह अवकाशानुसार होत असतो.

## किंमत.

| | |
|---|---|
| वार्षिक आगाऊ वर्गणी ... ... ... ... ... | रु. २. |
| सहामाही आगाऊ वर्गणी ... ... . ... | रुपया १ |
| फुटकळ दर प्रतीस टपाल हांशीलासह ... ... | आणे [illegible] |

## सवलत.

सार्वजनिक संस्था; शाळा; लायब्ररीज वगैरे ... ... रु. १-१०

वर्षअखेर एक अति उत्कृष्ट पुस्तक बक्षीस !

पत्ता:—

मेसर्स साळवी, सावंत, कालेकर आणि मंडळी,

हुसेनी बिल्डिंग, [illegible]; मुंबई नं. ११

REFBK-0000984

श्री.

# मराठा समाजाच्या शिक्षणासंबंधीं व इतर विविध विषयांवरील निवडक निबंध.

## १.—मराठे लोकांतील शिक्षणविषयक जागृति.

[ मराठामित्र–ऑक्टोबर, १९१०. ]

" नीचैर्गच्छत्युपरी च दशा चक्रणेमिक्रमेण " ह्या न्यायानें म्हणा, किंवा पाश्चात्य शिक्षण, सुधारलेल्या व प्रगतिपर लोकांशीं होणारा रात्रंदिवस संबंध, इतर समाजांतील जागृति, जीवनकलहाची वाढती तीव्रता, इत्यादि अनेक कारणांमुळें म्हणा, आमच्या मराठे लोकांत शिक्षणाविषयक जागृति उत्पन्न झाली आहे, ही गोष्ट निर्विवाद सिद्ध आहे. या प्रशंसनीय जागृतीमुळें मराठे लोकांच्या परिस्थितींत स्थित्यंतर होत आहे, व सर्व समाजावर त्या प्रगतीच्या लाटा थोड्या-बहुत वेगानें आदळत आहेत. मराठे लोकांची निद्रितावस्था उत्तरोत्तर लय पावत असून, जागृतीच्या प्रभातकालाचीं स्पष्ट चिन्हें दृग्गोचर होत आहेत. व त्यामुळें जनतेचें आलस्य, पुराणप्रियता व चलनवलन करण्याविषयीं औदासीन्य, हे कालाच्या अतर्क्य प्रभावामुळें